



Three Days

Multidisciplinary National Conference on

# NEP-2020:

# Innovation in Teaching-Learning & Evaluation Process in Higher Education

24 to 26th February 2023 Calangute, Bardez, Goa

## Conference Proceedings

Print and Online Issue 2 Marathi

Published as per UGC (India) Guidelines

www.researchjournal.net.in www.indiramahavidyalaya.com

Chief Editor

Dr. Pavan Mandavkar

ISBN

978-81-953708-1-8








Organized and Published By

INDIRA MAHAVIDYALAYA

KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (INDIA)

in collaboration with RJI, DBMRC and

Sant Gadge Baba Amravaati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad

ISBN 978-81-953708-1-8

Indira Mahavidyalaya, Kalamb
Sant Gadge Baba Amravati University Marathi Pradhyapak Parishad,
Research Journal of India & Dr. Bhau Mandavkar Research Center
Sponsored **National Conference** on

# NEP-2020:
# INNOVATION IN TEACHING-LEARNING & EVALUATION PROCESS IN HIGHER EDUCATION

24, 25 and 26 Feb. 2023 at Calangute, Goa

## CONFERENCE PROCEEDINGS
### ISSUE II - MARATHI

**Chief Editor**
**© Dr. Pavan Mandavkar**
Principal, Indira Mahavidyalaya & Chairman, DBMRC
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati

**Associate Editor**
**Dr. Veera Mandavkar**
Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre (DBMRC)

**---- Editorial Board ----**
**Prof. Rekha Wath, Prof. Nilkantha Narule, Prof. Saroj Lakhadive**
**Dr. Madhuri Rakhunde, Prof. Prashant Jawade, Dr. Dashrath Chavhan**
**Dr. Pandurang Ingale, Dr. K.R. Nemade, Dr. Ved Patki, Prof. Sheetal Raut**

**Printer**
**Sewa Prakashan**
Vijay Colony, Rukmini Nagar, Amravati, Maharashtra 444 606

**Cover Page Design & Computer**
**Dr. Pavan Mandavkar**

**Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401(India)
E mail – marathipradhyapak@gmail.com, researchjournalofindia@gmail.com
Telephone: 07201-226147, 226129, Mob. Chief Editor: 9422867658, Director & Publisher: 9403014885
Websites: www.indiramahavidyalaya.com, www.researchjournal.net.in

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| | From the Bench of Editor | Dr. Pavan Mandavkar | 2 |
| | Index | | 3 |
| 1 | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यवसाय रोजगाराच्या संधी | प्रा. रेखा मा. वाठ | 4-8 |
| 2 | मराठी साहित्य व प्रसार माध्यमे | प्रा.डॉ. रिता वाळके (डंभाळे) | 9-12 |
| 3 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षक व विद्यार्थी भूमिका | स.प्रा. भावना तायडे | 13-20 |
| 4 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांची भूमिका | डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | 21-25 |
| 5 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२२ आणि त्याची उच्च शिक्षणातील गुणवत्तेबाबतची उत्प्रेरकीय भूमिका | प्रा.डॉ. दिनेश रामराव हंगे | 26-28 |
| 6 | नवीन शैक्षणिक धोरण आणि जनसाहित्य | प्रा.डॉ. दिनेशचंद्र राऊत | 29-36 |
| 7 | राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि ग्रामगीता | प्रा. डॉ. कल्पना त्र्यं. मेहरे | 37-42 |
| 8 | नवीन शैक्षणिक धोरण: उच्च शिक्षणाच्या संदर्भात चिंता आणि संभावना | प्रा. डॉ. सी.डी. पाखरे | 43-47 |
| 9 | नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणि त्यापुढील आव्हाने व संधी | प्रा. डॉ. माधुरी पंडितराव राखुंडे | 48-54 |
| 10 | नवीन शैक्षणिक धोरण 2020: एक आकलन | प्रा. डॉ. अरुण शेंडे | 55-60 |
| 11 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विद्‌यार्थी | प्रा. चरणदास सोळंके | 61-63 |
| 12 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (NEP- 2020) डिजिटल मीडियाची भूमिका आणि महत्व | प्रा. राजेंद्र पुंडलिक पवार | 64-70 |
| 13 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांची भूमिका | प्रा. एन. व्ही. नरुले | 71-73 |
| 14 | नवीन शैक्षणिक धोरण आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी | प्रो. डॉ. गजानन मुंधे | 74-76 |


(©All copyrights are reserved with the Chief Editor. The opinions expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed.)

# From the Bench of Editor

The higher education plays an extremely significant role in promoting the educational aspects and societal values for embodying India as envisioned in its Constitution. As India is moving towards, knowledgeable and skilled nation, young Indians are likely to aspire for higher education. To cope with requirements of 21st century and demands of global market the role of quality education at most important. It must enable an individual to study one or more specialized areas of interest at a deep level, and also develop character, ethical and Constitutional values, intellectual curiosity, scientific temper, creativity, spirit of service and new millennium capabilities across a range of disciplines including sciences, social sciences, arts, humanities, languages, as well as professional, technical, and vocational subjects. A quality higher education must enable personal accomplishment and enlightenment, constructive public engagement, and productive contribution to the society.

After independence, Jawaharlal Lal Nehru had a clear vision to modernize Indian education system. Hence University education commission (1948-49) and secondary education commission (1952-53) were set up. . IITs were setup to impart high-quality science education to students. NCERT was framed as an autonomous organization that would advise union and state government. The first national policy on education (1968) was based on recommendations of the Kothari commission. This talks about the focus on learning of regional language. And need of specialized training and qualification of teachers. Rajiv Gandhi had special mentoring attitude to reform the Indian education system. He had laid down many inclusive policies in the field of education for the betterment of unprivileged society. His government introduced a new education policy in 1986. With certain modifications, The 1986 National policy on education was introduced in 1992. It was called ‘program of action’. It stressed about common entrance examinations for professional and technical education. In October 2001, Atal Bihari Bajpai government introduced a common entrance exam for IITs and NITS called IITJEE and AIEEE respectively.

Now the scenario has been changed India is stepping as growing liberal country for educational reforms, currently has about 845 universities and approximately 40,000 higher education institutions (HIEs), reflecting the overall high fragmentation. Multidisciplinary style of higher education that is a major requirement for education reforms in the country for the 21st century. Well structured and futuristic education policy is essential for a country which leads to economic and social progress. The Union Cabinet of India on 29 July 2020 approved The National Education Policy 2020 (NEP 2020), lay-outs the vision of India's new education system. The currently introduced National Education Policy 2020 envisions India centered education system that contributes directly to transforming our nation sustainably into an equitable and vibrant knowledge society, by providing high quality education to all. Now our education system has shifted its focus towards producing employers/ entrepreneur rather than employees. NEP 2020 is successful step to revolutionize the Indian education to become Aatmanirbhar Bharat. It is predicted that India will be the third largest economy in the world by 2030-2032 with estimated GDP of ten trillion dollars.

This conference with the theme ‘NEP 2020: Innovation in Teaching-Learning & Evaluation Process in Higher Education’’ is the right platform to bring various stakeholders under one roof to discuss needs of its execution in a totality. Through this conference we will put all our effort to drive the national education policy in higher education. The thematic talks and the technical sessions will drive you through the multi dimensional emergence in the higher educational world. This could be the first tourist conference of its kind in the region where everyone could have opportunity to showcase and present their ideas, thoughts, developments that could lead to actual execution of national education policy from which every individual can be able to survive with meaningful aspect in community and to take India to new heights.

**- Dr. Pavan Mandavkar**
Chief Editor
and Editorial Board

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यवसाय रोजगाराच्या संधी

प्रा. रेखा मा. वाठ
सहयोगी प्राध्यापक
वाणिज्य विभाग प्रमुख
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जिल्हा यवतमाळ, महाराष्ट्र (India)
Email ID- rekhawath23@gmail.com Mobile No.- 9422153353

## सारांश

भारतात कोरोना काळात सन 2020 मध्ये केंद्र सरकारने 'नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ' जारी केले. हे धोरण भारतात 1984 सालीच घोषित झाली होती मात्र त्याची अंमलबजावणी 2020 मध्ये झाली. भारताने 1990 च्या दशकात नवीन आर्थिक धोरणाचा म्हणजेच जागतीकरण ,उदारीकरण आणि खाजगीकरणाचा स्वीकार केला. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात आमुलाग्र बदल झाला. परंतु भारतीय शिक्षण प्रणाली कुठेतरी कमी पडत होती. भारत देश शिक्षण प्रणालीतून अकुशल सुशिक्षित मनुष्यबळ निर्माण करीत होता. स्वतःच्या मूलभूत गरजांसाठी, कुटुंबासाठी समाजासाठी आणि भारत देशासाठी एक जबाबदार सुसंस्कृत युवा वर्ग तयार करीत नव्हता. डॉ.के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली 2017 साली नवीन शैक्षणिक धोरणाच्या निर्मितीसाठी एक समिती स्थापन केली. या समितीने 2019 मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. सन 2020 मध्ये केंद्र सरकारने नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची अंमलबजावणी घोषित केली.

## प्रस्तावना

माहिती तंत्रज्ञान व इंटरनेटच्या युगात 1990 नंतर खऱ्या अर्थाने नवीन क्रांती सुरू झाली .जग औद्योगिक क्रांतीपर्वात नव्या युगासाठी ,नव्या तंत्रज्ञानासाठी, पुढे चालला होता .सामाजिक आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून भारतीय संविधानिक मूल्य लक्षात घेऊन 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ' केंद्र सरकारने मंजूर केले. महाराष्ट्र शासनाने देखील समविचारी तज्ञ मंडळीच्या समित्या नेमल्या यात शिक्षण विभाग ,बाल शिक्षणनात काम करणारी संस्था, बालमजुरांचे पुनर्वसन करणारी संस्था, आयटी क्षेत्र, विज्ञान क्षेत्र, कौशल्य शिक्षण देणारी संस्था यांचा समावेश केला आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 महाराष्ट्र सरकारने मंजूर केला. नव्या शैक्षणिक धोरणात बदलत्या काळानुरूप विद्यार्थी युवकांच्या रोजगार विषयक वाढत्या गरजा लक्षात घेऊन त्यानुसार शालेय शिक्षणात कौशल्य विकासाची जोड दिली आहे .या नवीन शैक्षणिक धोरणाचा सर्वांगीण विद्यार्थी घडविण्यासाठी कसा व किती उपयोग होणार आहे. भारतात नवीन शैक्षणिक धोरणातून कुशल , कौशल्य पूर्ण, रोजगाराभिमुख शिक्षण प्रणाली कशी राहील या सर्वांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने संशोधनाचा विषय निवडण्यात आलेला आहे.

## शोधनिबंधासाठी वापरण्यात येणारी संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वापरण्यात येणारी माहिती व तथ्ये ही विषयाशी संबंधित विविध लेख व सांकेतिक स्थळावरून संकलित करण्यात आली आहे.

## उद्दिष्टे

नवे शैक्षणिक धोरण 2020 हे भारतात 1984 सालीच घोषित झाले होते .भारताने सन 1990 च्या दशकात जागतिकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाचा स्वीकार केल्यामुळे अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात आमुलाग्र बदल होणे महत्त्वाचे होते. परंतु भारतीय शिक्षण प्रणाली कुठेतरी कमी पडत होती .भारत देश हा तरुणांचा देश आहे .या मनुष्यबळ युवकांना कौशल्य विकसित शिक्षण देऊन राष्ट्रीय उत्पादकतेमध्ये वाढ करणे गरजेचे होते. शिक्षणासाठी आर्थिक तरतूद हा खर्च नाहीतर उत्पादक व राष्ट्र निर्मिती साठी केली जाणारी गुंतवणूक आहे. सरकारने कौशल्य विकास व व्यावसायिक शिक्षणाचा विचार करणे गरजेचे होते .जसे शिक्षण प्रणालीने विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास आणि राष्ट्राचे उत्तम सुजाण , विवेकी नागरिक होण्यासाठी आवश्यक असते तसेच रोजगारासाठी कौशल्यपूर्ण शिक्षणाची गरज असते .आज संगणक आणि यांत्रिकीकरणाच्या युगात औद्योगिक क्षेत्रात रोजगारविरहित  वाढ होत आहे. आज रोजगार निर्मिती शिक्षणाची गरज आहे .स्वयंरोजगार व कौशल्य विकास व्यवसायिक शिक्षणाची गरज आहे .पायाभूत सुविधा उपलब्ध करून तांत्रिक मनुष्यबळ व कारखान्यांना उपयोगी पडणारे शिक्षण स्वयंरोजगारातून निर्माण करणे गरजेचे आहे .भारतासारख्या अफाट लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून रोजगारनिर्मित शिक्षण प्रणाली अस्तित्वात आणुन असंख्य रोजगाराच्या संधी निर्माण करून युवकांची बेकारी नष्ट करणे ,100% तरुण आणि प्रौढ साक्षरता साध्य करणे हे या धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

## महत्त्व

नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये बदलत्या काळानुरूप विद्यार्थी युवकांच्या रोजगार विषयक वाढत्या गरजा लक्षात घेऊन कौशल्य विकास व रोजगार निर्मिती शिक्षण प्रणाली आहे. या नव्या शिक्षण धोरणातील सर्वात चांगला आणि उद्याचा समर्थ भारत घडविण्याची क्षमता आहे. या शिक्षण प्रणालीत अंगणवाडी, नर्सरी के .जी. च्या मुलांचा समावेश केला आहे .बालकांच्या मेंदूचा सुरुवातीला झपाट्याने विकास होतो. बालकांच्या बौद्धिक क्षमतेच्या विकासानुसार खेळ व क्रीडा निगडित बाबींनी त्यांना पुढील शिक्षणासाठी तयार करणे ही सर्वात महत्त्वाची क्रांतिकारी स्वरूपाची शिफारस आहे. डॉ. के कस्तुरीरंगन समितीने तरुणांची बौद्धिक, भावनिक, सामाजिक प्रगती होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयीन शिक्षणप्रणालीत बहुशाखीय शिक्षण प्रणाली प्रस्तावित केली आहे. विद्यार्थी आपल्या कला, आवड आणि करिअरचा विचार करून इतर शाखेचा विषय निवडू शकतात .त्यासाठी विद्यार्थ्यांना स्वतःच्या शाखेसोबतच करिअरच्या एकापेक्षा जास्त क्षेत्रात संधी उपलब्ध होऊ शकतात .तसेच महाविद्यालयीन शिक्षणात बहुविध प्रवेश बहुविध निर्गमनाच्या संधी पूर्ण केलेल्या कालावधीच्या शिक्षणाशी सुसंगत पदवी व पदविका मिळण्याची संधी निर्माण करणारी ही शिक्षण प्रणाली आहे. म्हणजेच विद्यार्थी महाविद्यालयातून बाहेर पडताना बहुविध

पदवी व पदविका घेऊन बाहेर पडेल की जेणेकरून त्यांना नोकरी करताना बहुविध पदवी व पदविकांचा उपयोग होईल. नव्या शिक्षण धोरणात शिक्षक व त्यांचे प्रशिक्षण देखील आहे .या धोरणात बहुशाखीय शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांनी चार वर्षाचा एकात्मिक बी.एड. अभ्यासक्रम सुरू करून चांगले शिक्षक निर्माण करणारी धोरणे आहेत .संशोधनावर भर देणारे हे नवशिक्षण धोरण असून त्यासाठी संशोधन पर विद्यापीठ स्थापन करून राष्ट्रीय संशोधन फंड निर्माण करण्याची शिफारस या नव्या शिक्षण प्रणालीत आहे .या धोरणात व्यापक आधारभूत बहुशाखीय लवचिक अभ्यासक्रमासह सर्व समावेशक पदवी शिक्षण अभ्यासक्रम निगडित करण्यात येईल .पदवी शिक्षण 3 किंवा 4 वर्षाचे असू शकते .या कालावधीत अनेक निर्गमन पर्याय आणि योग्य प्रमाणीकरण असू शकतात. उदाहरणार्थ 1 वर्षानंतर प्रमाणपत्र 2 वर्षानंतर प्रगत पदविका 3 वर्षानंतर बॅचलर डिग्री आणि 4 वर्षानंतर बॅचलर विथ रिसर्च डिग्री मिळेल .वेगवेगळ्या उच्च शिक्षण संस्थांकडून मिळवलेल्या शैक्षणिक उपलब्धी डिजिटल संग्रहित करण्यासाठी अकॅडमी बँक ऑफ क्रेडिट ची स्थापना केली जाईल. विद्यार्थी दरवर्षी वेगवेगळे कोर्सेस करून क्रेडिट जमा करतील .एखाद्या वर्षी एखाद्या विषयात विद्यार्थी नापास होत असेल तर असे जमा केलेले क्रेडिट त्या विषयात पास होण्यास मदत होईल. तसेच जमा केलेले क्रेडिट अंतिम पदवी मिळवल्यावर या क्रेडिटची गणना केली जाईल. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच कौशल्य विकास व रोजगारांना चालना मिळावी या उद्देशाने शैक्षणिक धोरण आहे. यासाठी शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थी -उमेदवार आणि औद्योगिक क्षेत्रात सक्रिय समन्वय साधता येणार आहे. शैक्षणिक अभ्यासक्रमात उद्योग - व्यवसायाच्या गरजानुरूप शिक्षण प्रणाली राहणार आहे .त्यामुळे कुशल कर्मचारी उद्योगांना मिळू शकेल .उद्योगांना आवश्यक अशा मूलभूत सुविधा, ज्ञान,तंत्रज्ञान, संसाधन इत्यादीची जोड दिली जाणार आहे हा बदल केवळ शैक्षणिक संदर्भातच नव्हे तर गुणात्मक संदर्भात सुद्धा राहणार आहे .यासाठी विद्यार्थ्यांच्या खऱ्या अर्थाने विकास साधण्यासाठी शैक्षणिक संस्थांच्या वास्तू ,इमारती, प्रयोगशाळा ,ग्रंथालय ,शिक्षक, प्राध्यापकांचे विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. भारत देशातील एकूण लोकसंख्येच्या 66 टक्के लोकसंख्या ही 25 वर्षाच्या आसपासच्या वयोगटातील आहे ही युवा पिढी पदवी - पदव्युत्तर संशोधनपर विशेष शिक्षण घेत असल्याने त्यांना त्यांच्या प्रगत शिक्षणाच्या जोडीला कौशल्याचे साथ लाभणार आहे .नव्याने पात्रता धारक असणाऱ्या कर्मचाऱ्यांना उद्योग - व्यवसायात मोठी मागणी मिळणार आहे .तेव्हा या शिक्षणासह असणाऱ्या कौशल्याचा सध्याच्या आणि नव्या पिढीला नक्कीच फायदा होईल.

## कौशल्य विकास शिक्षण आणि रोजगाराच्या संधी

लघु ,कुटीर व मोठ्या उद्योगांना ज्या पद्धतीने गती व चालना मिळत आहे ते पाहता प्रक्रिया प्रकल्प उद्योगापासून स्टार्टअप क्षेत्रापर्यंत कौशल्याची मागणी वाढणार आहे .नव्या शैक्षणिक अभ्यासक्रमाने कौशल्य विकास व रोजगार निर्मित शिक्षण प्रणालीचा फायदा होणार आहे. विकसित तंत्रज्ञान कार्यपद्धतीत कौशल्यबांधनी इ.

आधारित अशा या नव्या शिक्षण प्रणालीचे अनेक फायदे नजीकच्या भविष्यात मिळणार आहे .भारतातील कृषी क्षेत्रातील समस्या या प्रचंड गंभीर आहेत. आणि दिवसेंदिवस या समस्यांची तीव्रता वाढतच आहे .याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे उद्योग व्यापार व सेवा क्षेत्रात आवश्यक असणारे कुशल

मनुष्यबळ निर्माण करण्यात भारताची शिक्षण प्रणाली ही अपयशी ठरली आहे. त्यामुळे अकुशल सुशिक्षित मोठ्या वर्ग निर्माण होत आहे. आजच्या या शिक्षण प्रणालीमुळे 83% युवकांना शासकीय नोकरी अनुकूल वाटते 16% युवकांना व्यवसाय करावा वाटते. तर खाजगी क्षेत्राकडे वळण्याचे प्रमाण फक्त 6%आहे. या सर्व बाबींचा विचार करून तब्बल 34 वर्षानंतर नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे .नवीन शिक्षण प्रणाली व्यवहारिक शिक्षणासाठी व्यवसायिक अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थ्यांना इंटर्नशिप प्रदान करतील. 29 जुलै 2022 रोजी या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला दोन वर्षे पूर्ण होतील ती लागू केल्यानंतर 28 राज्ये आणि सहा केंद्रशासित प्रदेश मधील उच्च शिक्षण संस्थांमध्ये 2774 इनोव्हेशन कौन्सिलची स्थापना करण्यात आली. शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत प्रगती अहवालावरून असे दिसते की 2000 उच्च शिक्षण संस्था कौशल्य केंद्र सुरू करणार आहेत. त्यापैकी 700 संस्थांनी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सामान्य पोर्टलवर नोंदणी केली आहे. शिवाय 69.1 लाख विद्यार्थ्यांसह 5881 राष्ट्रीय ऑनलाईन इंटर्नशिप प्लॅटफॉर्म स्थापन करण्यात आले आहे. शिवाय नऊ लाख तरुणांना कव्हर करण्यासाठी राष्ट्रीय शिकाऊ प्रशिक्षण योजनेसाठी 3054 कोटी रुपयांचे बजेट देण्यात आले आहे. यावरून असे दिसते की भारतात औद्योगिक क्षेत्रात विकास झाल्याशिवाय राहणार नाही .21 व्या शतकातील प्रमुख कौशल्यासह सुसज्ज अभ्यासक्रमातील सामग्री कमी करून आवश्यक शिक्षण प्रणाली वाढविण्यासाठी अनुभवात्मक शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करून सर्वांगीण विद्यार्थ्यांचा विकास साधण्याचे उद्दिष्ट या धोरणात असेल .त्यामुळे विद्यार्थ्यांची लवचिकता आणि विषयाची निवड वाढेल. बहु-विद्याशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठे देशातील सर्वोत्तम जागतिक दर्जाच्या बहु-विद्याशाखीय शिक्षणाचे मॉडेल स्थापन केले जातील. उच्च शिक्षणात संशोधनक्षमता निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठानची सर्वोच्च संस्था म्हणून स्थापना केली जाईल .त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले जातील. शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण करून जागतिक क्रमवारीत सर्वोच्च विद्यापीठांना आपल्या देशात कॅम्पस उघडण्यासाठी प्रवेश दिला जाईल. याचा देखील परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेत वाढ होऊन रोजगार निर्मितीस मदत होईल .सरकारने शिक्षण क्षेत्रामध्ये सार्वजनिक गुंतवणूक वाढवून शिक्षण क्षेत्र लवकरात लवकर सहा टक्के जीडीपी पर्यंत पोहोचेल त्यामुळे आर्थिक, सामाजिक ,सांस्कृतिक, बौद्धिक आणि तांत्रिक प्रगती होईल .नवे शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य निर्माण करण्यावर अधिक भर दिला आहे .या धोरणाने विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचे ओझे कमी होऊन त्यांची शैक्षणिक क्षेत्रात खूप प्रगती होईल म्हणजेच आता विद्यार्थी रट्टा मारण्याऐवजी कुशल आणि सक्षम तयार होतील.

## निष्कर्ष

भारत सरकारने मंजूर केलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 याची अंमलबजावणी कशी होते यावर त्याचे यश अवलंबून आहे .जर शिक्षण व्यवस्थेत सर्व राज्य सरकार आणि केंद्र सरकारने गुंतवणूक केली आणि नमूद केलेली सर्व धोरणे राबविले तर भारत आपल्या तरुण लोकसंख्येचा फायदा घेऊन समाजाच्या आणि देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणु शकेल. यासाठी राष्ट्राने सर्व समावेशक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार केले आहे. विद्यार्थ्यांना उद्योग-व्यवसायाच्या गरजानुरूप कौशल्य विकास,

रोजगारयुक्त शिक्षण मिळत असल्यामुळे या योजनेद्वारे कुशल कर्मचारी तयार होतील.परंपरागत शिक्षण पद्धतीला बाजूला सारून विकसित तंत्रज्ञान, कौशल्य निर्मित नव्या शैक्षणिक प्रणालीचे बहुविध फायदे नजीकच्या भविष्यात मिळू शकतील .राष्ट्रीय शिक्षण धोरणात शहरी तसेच ग्रामीण भारतातील प्राथमिक आणि  विद्यापीठीय शिक्षणाचा समावेश आहे .या धोरणामध्ये भारताच्या शैक्षणिक व्यवस्थेची रोजगार निर्मिती,कौशल्य आणि सर्वांसाठी शिक्षणाचा समान संधी, राष्ट्रीय एकात्मता आणि उत्तम आर्थिक आणि सांस्कृतिक विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे .या धोरणात शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्व स्तरावर सुधारणा करण्याची तरतूद आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मजबूत करणे, व्यवसायिक आणि प्रौढ शिक्षणावर लक्ष केंद्रित करणे या सर्व तरतुदी या नव्या शिक्षण प्रणालीत आहे .भारतात येत्या काळात पाच कोटी व्यवसाय कौशल्य असणाऱ्या कुशल मनुष्यबळाची विविध क्षेत्रात गरज भासणार आहे .एकट्या महाराष्ट्रात 50 लाख व्यवसाय कौशल्य असणाऱ्या मनुष्यबळाची गरज आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण कौशल्यवर्धित शिक्षण प्रणाली आहे याचा फायदा नक्की विद्यार्थ्यांना होऊन त्यांना रोजगार प्राप्त होईल. येत्या काही वर्षात शैक्षणिक धोरणात आमुलाग्र बदल करण्यात येणारे आहे या बदलाचे आपण सर्वांनी स्वागत करायला हवे.

## सांकेतिक स्थळ

1. https://www.mahayojanaa.in/2022/11/national-education-policy-in-marathi-2022.html

2. https://www.mahamtb.com/Encyc/2020/8/6/Article-on-New-Education-Policy-2020-and-Skill-development.html

3. https://udyojak.org/new-education-policy-2020-and-entrepreneurship/

❖❖❖

# मराठी साहित्य व प्रसार माध्यमे

प्रा. डॉ. रिता वाळके (डंभाळे)
सहयोगी प्राध्यापिका (मराठी विभाग)
अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय
भारसिंगी, तह - नरखेड, जिल्हा - नागपूर, महाराष्ट्र (India)
मो. क्रमांक 7743899369, 9823943943

## सारांश

आधुनिक काळात प्रसारमाध्यमे अतिशय विकसित झालेले असून आजच्या जगात त्यांना अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे. मानवी जीवनासंबंधीत आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे, इंटरनेट,फोन, चित्रपट, नाटक, आणि लेखनग्रंथ ही सारी प्रसार माध्यमे शिक्षणाशी जुडलेली असून विद्यार्थ्यांच्या विचाराला आणि कृतीला ती जोडली गेलेली आहे. ही सर्व माध्यमे भाषेच्या कौशल्यावर उभी आहे. आजच्या शैक्षणिक क्षेत्रात वरील सर्व माध्यमांची मदत मोठ्या प्रमाणात नाविन्य पूर्णपणे होत आहे.

## प्रस्तावना

आजच्या युगाला माहिती तंत्रज्ञानाचे 'नेट' युग म्हणून ओळखल्या जाते. मानवा करिता प्रत्येक गोष्ट बिनचूक उपलब्ध होण्याकरीता मानव वेगवेगळ्या साधनांचा वापर करतो. त्यापैकी 'संगणक' हे एक साधन आहे. संगणक मानवनिर्मित असून संगणकाची कामे करण्याची क्षमता मानवी क्षमतापेक्षा मात्र जास्त आहे. माहितीचे संकलन, विश्लेषण, प्रक्रिया, सांख्यिकी, आकडेमोड माहितीचे जतन विभागणी- वहन इत्यादींसाठी वापर होतो. आज व्यवहारातील सर्वच क्षेत्रांमध्ये संगणक वेगवेगळ्या कामासाठी वापरला जाताना दिसतो. मराठी भाषेच्या माध्यमातून संगणकामुळे चालणाऱ्या संदेशन व्यवहारांचा या शैक्षणिक ज्ञान क्षेत्रात वापर व मराठी भाषेची वाटचाल कौतुकास्पद आहे.

नवे शैक्षणिक धोरण हे भविष्याचा वेध घेणारे आहे. या धोरणातून विषयाची निवड व शाखेची आवड यांना प्राधान्य देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेणे बंधनकारक असणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने एक तरी व्यावसायिक कौशल्य शिकावे, अशी अपेक्षा नवीन शैक्षणिक धोरणानुसार करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक शिक्षण धोरणावर उच्च शिक्षण अवलंबून आहे. विद्यार्थ्यांचे व्यावसायिक शिक्षण किंवा अभ्यासक्रम पूर्ण असेल तरच त्यांना पुढील उच्च शिक्षण घेता येईल. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे आहे. नवीन भारत व भविष्यासाठी तयार युवा पिढी घडविण्याच्या दृष्टीने हे धोरण महत्त्वाची भूमिका मांडताना दिसते. हे धोरण दूरदर्शी धोरण आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा योग्य वापर शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, क्षमता विकास आणि शिक्षणाच्या माध्यमांमध्ये परिवर्तन घडून येत असून या धोरणामुळे शिक्षण सर्व समावेशक, फायदेशीर व न्याय होण्यास मदत होईल. या धोरणा अंतर्गत विषयाची निवड करीत मराठी भाषा व साहित्य यांची माहिती विविध प्रसार माध्यमांच्या वापरण्याने विद्यार्थ्यांना समजून घेण्यास मदत झालेली आहे.मराठी साहित्याचे महत्वही कळलेले आहे.

संपूर्ण जगात हाहाकार माजविणाऱ्या कोरोना महामारी चा सामना करीत शैक्षणिक क्षेत्रात काही महत्त्वाचे धोरण पूर्ण करण्यात आलेले आहे. नव्या शैक्षणिक धोरणातील ध्येय आणि दृष्टीकोन,ज्यामध्ये जागरूकता दिसते पारंपरिक शिक्षणाकडून प्रयोगात्मक शिक्षणाची दृष्टी विद्यार्थ्यांना देण्यात आली. कोरोनाची लागण विद्यार्थ्यांना होऊ नये, म्हणून महाविद्यालय बंद ठेवून ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यात आली. 'वर्क फ्रॉम होम' या पद्धतीने महाविद्यालयीन वर्ग व कार्यालयीन कार्य घरूनच सुरू करण्यात आले, व शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या बदलाला सर्वांना सामोरे जावे लागून शिक्षण प्रणालीने नव्याने विचार करायला भाग पाडले. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी व स्थिर राहण्यासाठी तसेच त्यांचे वर्ष वाया जाऊ नये, या दृष्टीने विचार करून त्यांच्या कमी तासिकेत परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांचे समाधान करण्यात आले. यातून एक नवी कार्यप्रणाली काही प्रमाणात उदयास आलेली दिसते ते म्हणजे नवीन शैक्षणिक धोरण होय.

नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण ज्ञानसंपन्न भारत घडविण्याची क्षमता ठेवते. हे लक्षात घेता कोरोनाचा वाढता संसर्ग बघून शिक्षकांच्या अध्ययन अध्यापनाच्या समन्वयांमध्ये अंतर पडले त्यानुसार वेळापत्रक तयार होऊन कार्य सुरू झाले ऑनलाइन शिक्षण यासारख्या अनौपचारिक शिक्षणाचे मार्ग रूढ होऊ लागले. विद्यार्थ्यांना अध्ययनामध्ये रुची वाढेल अशा सोप्या पद्धतीने कार्यपद्धती तयार झाली. विद्यार्थ्यांचे गट व विद्यार्थ्यांची हजेरी तसेच विद्यार्थी अध्ययन सवयी मध्ये बदल झाले. शैक्षणिक धोरणात नाविन्यपूर्ण उपक्रम 'स्वयं अध्ययन' स्वीकारल्या गेले. विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक, बौद्धिक आणि सामाजिक विकास होण्यासाठी प्राध्यापकांनी ऑनलाइन शिक्षणाचा मार्ग अवलंबवीला. गुगलमेट, गुगल फॉर्म, झूम अॅप्स सारख्या व आणखी अॅपचा सुयोग्य वापर केला. आपल्या विषयातील घटकांचे व्हिडिओ बनवून विद्यार्थ्यांच्या समूहावर पाठवून विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या प्रवाहात बदल केला. गुगल व युट्युब चा वापर, ऑनलाइन 'स्वयंअध्ययन व्याख्यानमाला' पाठ्यपुस्तकातील नाट्य उताऱ्याचे नाट्यकीकरण करणे, कविता समजून सांगण्याकरिता किंवा सांगण्याचा व्हिडिओ तयार करणे, काही प्रकरणांची व पाठांची पीपीटीच्या माध्यमातून शिकवण, प्रश्नमंजुषा, पोस्टर तयार करणे इत्यादी प्रकार राबविण्यात आले. विद्यार्थी हा अशा प्रकारच्या अध्ययन कृतीला समोरा गेला. विविध मार्गदर्शन, जीवनकौशल्य बुद्धीला प्रोत्साहित करणे व विविध विषयाचे वाचन करणे, तसेच माहितींची देवाण-घेवाण. विविध विषयासंबंधित माहिती मिळत असल्याने नवीन शैक्षणिक धोरणातील मराठी भाषा साहित्य व अध्ययन व अध्यापन प्रक्रियेतील होणारा बदल याला मदत झाली ती प्रसारमाध्यमांची. विद्यार्थ्यांच्या जीवनातील अविभाज्य भाग बनलेल्या प्रसारमाध्यमांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आग्रहीपणा वाढला व स्वयंरोजगारची दिशा स्पष्ट होण्यास मदत झाली.

भाषा हे शिक्षणाचे माध्यम आहे, भाषेचे ज्ञान असणे अतिशय महत्त्वाचे आहे. जागतिकीकरणामुळे मराठी भाषा व साहित्य ध्येय दृष्टीने गतिमान झालेली आहे. मानवी जीवनासंबंधीत विविध प्रकारची माहिती विकार व विचारांचे आदान प्रदान करण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करण्याचे शास्त्र म्हणजे प्रसार माध्यमे होय. यामध्ये वृत्तपत्र आकाशवाणी व चित्रवाणी संगणक (इंटरनेट) ही महत्त्वपूर्ण प्रसार माध्यमे दिसतात. प्रसारमाध्यमे हे देशाच्या कानाकोपऱ्यात माहिती पाठविण्याचे लोकशिक्षण करण्याचे एक प्रभावी माध्यम ठरले आहे. माहिती देणे, शिक्षण देणे आणि करमणूक करणे या त्री सूत्रीवर प्रसारमाध्यमे काम करीत असतात. सर्व प्रसार माध्यमांच्या भाषेची स्वतंत्र ओळख असून भाषाशैली वेगळी वेगळी आहे.

आकाशवाणी, चित्रवाणीची भाषा ही बोलीभाषा व संबोधन भाषा असून वृत्तपत्राची भाषा ही प्रमाणभाषा आहे संवाद, भाषणे, मुलाखत,नभोनाट्य, चर्चा, रूपक बातम्या हे प्रभावी बोलीभाषेतून सहजतेने मांडल्या जाते. नाटिका, नभोनाट्य, संगीतिका,चर्चा, मराठी गाणी, प्रसंग नाट्यदर्शन, कथाकथन इत्यादी मराठी भाषेतील विविध प्रकाराचे कार्यक्रम या प्रसार माध्यमातून सादर होऊन तसेच शैक्षणिक पाठलेखन, कार्यशाळा,तज्ञांची भाषण,प्रश्नमंजुषा, अभ्यासक्रमावर आधारित लघु नाटिका, सामान्य ज्ञान,पर्यावरण, समाज प्रबोधन, करण्यात येते. सामाजिक सांस्कृतिक परिस्थितीमध्ये बदल असा आशावाद व आत्मविश्वास वाढावा मनातील शंका कुशंका दूर व्हाव्यात असा प्रयत्नही भाषेद्वारे प्रसार माध्यमातून होत आहे.

तंत्र विकसित झाल्यामुळे या माध्यमांसोबतच नवनवीन प्रसार माध्यमातून मनाच्या बदलास प्रवृत्त करणारी प्रवाहे प्रभावी होताना दिसतात. मराठी भाषा व साहित्याच्या दृष्टीने विचार करता इंटरनेटच्या विश्वात मराठी संकेतस्थळे सारखे प्रकार आपल्याला प्रसार माध्यमातून दिसून येतात. आजच्या काळात मराठी भाषेपुरता या क्षेत्राचा विचार केला तर असंख्य मराठी संकेतस्थळे निर्माण झालेली आहेत. विकिपीडिया,मायबोली या वेबसाईटमुळे जगाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या माणसांना एकत्र आणलेत. या मराठी भाषेचे विविध संकेत स्थळे आहे, मनोगत डॉट कॉम, उपक्रम डॉट कॉम, मराठी माती डॉट कॉम, मराठी मित्र, मराठी वर्ल्ड डॉट कॉम, लोकायत अशा विविध संकेतस्थळावर विविध विषयांवरील शेकडोलेख उपलब्ध आहे हे सर्व पाहता संकेतस्थळाच्या विश्वात प्रसार वाटचाल कौतुकास्पद आहे. मराठी पुस्तकाच्या विक्रीची दुकाने, पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रकिया, स्वप्रकाशन, ई-बुक, अनुवाद लेखन, डीजिटल साहित्य संमेलन प्रकिया इंटरनेटवर उपलब्ध आहे. संत तुकारामांची संपूर्ण गाथा त्यांचे अभंग तसेच तुकराम विषयी इतर भाषिकांना माहिती व्हावी यासाठी तुकाराम वरील विविध लेख उपलब्ध आहे. शिवाजी महाराज ते आधुनिक वाल्मिकी म्हणून ओळखले जाणारे 'गदिमा' यांची ही स्वतंत्र ओळख आपल्याला मराठी साहित्याच्या माध्यमातून इंटरनेटवर दिसते, बदलत्या काळाची स्पंदने टिपून वाचन संस्कृतीचा वापर करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या ग्रंथाली संकेतस्थळा द्वारे जगभरातील मराठी माणसांशी संवाद साधला जातो. यामुळे या ग्रंथाली संकेत स्थळास 'मराठी विद्यापीठ' ही म्हटले जाते. मुक्तांगण, आरोग्य डॉट कॉम, नाट्य संस्था सारख्या तसेच कृसुमाग्रज, पु.ल.देशपांडे, दिलीप प्रभावळकर आणि प्रशांत दामले यांची संकेतस्थळेही प्रभावशील आहे. प्रत्येक संकेतस्थळावर मराठी साहित्याशी संबधीत विविध विषयांवरील शेकडोलेख असून या संख्येत मराठी संकेत स्थळांमुळे बरेच मोठे मराठी विश्व एकत्र आलेले आहे. संकेतस्थळांच्या विश्वात मराठीची घोडदौड कौतुकास्पद आहे.

ई-मेल चॅटिंग इन्स्टंट मेसेजिंग व्हिडिओ कॉन्फरन्सीग, इंटरनेट कॉलिंग, या माध्यमातून अनेकांशी मराठीत संवाद साधता येतो. ट्विटर ब्लॉगर वर्डप्रेस ब्लॉग साईट फेसबुक सारख्या सोशल नेटवर्किंग यांच्या साईट्स youtube सारखी व्हिडिओ स्ट्रीमिंग साईट ही सारीज इंटरनेट वरील संवाद माध्यमे आहेत. सकाळ लोकसत्ता महाराष्ट्र टाइम्स पुढारी लोकमत सामना तरुण भारत अशी दैनिके इंटरनेटवर मराठी भाषेत वाचनासाठी उपलब्ध करून दिलेली आहे. अनेक संकेतस्थळावर गद्य,पद्य साहित्य कथा, कादंबरी, नाटक अशा लिंक आहेत या लिंक वरून आपल्याला बरेच साहित्य वाचण्यासाठी उपलब्ध होते तसेच लेखक व कवी यांच्या रचना वाचकांना या संकेतस्थळावरून वाचायला मिळतात. इंटरनेटवर विविध संकेतस्थळांच्या भटकंतीतून आपल्याला मराठी साहित्याचे वेगवेगळे विषय वाचायला मिळतात.

एकूणच इंटरनेटवरील मराठी भाषेची वाटचाल कौतुकास्पद असून आज अनेक बाबतीत मराठीने इंटरनेट संगणकाच्या क्षेत्रात आघाडी घेतलेली आहे. काही तांत्रिक व आर्थिक अडचणींवर मात करीत ही संकेतस्थळे स्वतःचे स्थान निर्माण करण्यात यशस्वी झालेली आहेत कविता कथा लेख यांच्या प्रसिद्धी साठी इंटरनेट हे एक महत्त्वाचे माध्यम ठरले आहे जुन्या लेखक कवी बरोबरच अनेक नवोदित लेखक कवी यांचे विपुल लेखन आपल्याला आज इंटरनेटवर सहज उपलब्ध होत आहे. प्रसार माध्यमांमुळे मराठी भाषा व साहित्य यातील आत्मविकासासाठी मोठा लाभ झालेला आहे.सोबतच विद्यार्थी हा शिक्षण प्रक्रियेतील केंद्रबिंदू असल्याने विद्यार्थांचा सर्वांगीण विकास होण्याकरिता, सर्जनशीलता आणण्याकरीता व त्याच्यातील सुप्तगुण ओळखण्याकरीता तसेच ज्ञान वाढविण्यासही मदत होत आहे.

## निष्कर्ष

1) नवे शैक्षणिक धोरण हे भविष्याचा वेध घेणारे आहे.

2) नव्या शैक्षणिक धोरणातील ध्येय आणि दृष्टिकोनामध्ये जागरूकता दिसते.

3) नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण ज्ञानसंपन्न भारत घडविण्याची क्षमता ठेवते.

4) प्रसार माध्यमे भाषेच्या कौशल्यावर उभी आहे.

5) शैक्षणिक धोरणात नाविन्यपूर्ण उपक्रम 'स्वयंअध्ययन' स्वीकारल्या गेले.

6) विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक, बौद्धिक आणि सामाजिक विकास होण्यासाठी प्राध्यापकांनी ऑनलाइन शिक्षणाचा मार्ग अवलंबविला.

7) प्रसार माध्यमांमुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आग्रहीपणा वाढला.

8) भाषा हे शिक्षणाचे माध्यम आहे. भाषेचे ज्ञान असणे अतिशय महत्त्वाचे आहे.

9) जागतिकीकरणामुळे मराठी भाषा ध्येय दृष्टीने गतिमान झालेली आहे.

10) प्रसारमाध्यमातून सामाजिक सांस्कृतिक परिस्थितीमध्ये बदल असा आशावाद व आत्मविश्वास वाढला.

11) इंटरनेटच्या विश्वात मराठी संकेतस्थळे आपल्याला प्रसार माध्यमातून दिसून येतात.

12) प्रसार माध्यमांमुळे मराठी भाषा व साहित्य यातील आत्मविकासासाठी मोठा लाभ झालेला आहे.

13) प्रसार माध्यमांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळालेला आहे.

## संदर्भ पुस्तके


1) व्यावहारिक मराठी, डॉ. लीला गोविंलकर, डॉ.जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस पुणे

2) कोरोनातील दुनिया विद्यार्थ्यांची, डॉ. मयूर लहाने, आकांक्षा पब्लिकेशन, मु- हिवरखेड, जिल्हा- अकोला

3) शब्दसाधना, प्रा. प्रदीप कुमार, यश पब्लिशर्स, महाल नागपूर

४) साहित्य संवाद, प्रा. चौघुले प्रतिमा प्रकाशन पुणे

५) संवाद विश्व, सुषमा दातार, संवाद विश्व प्रकाशन पुणे


❖❖❖

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षक व विद्यार्थी भूमिका

# Role of Teacher and Student in NEP 2020

स.प्रा. भावना तायडे
एम. ए. मराठी (सेट)
श्री विठ्ठल रूख्मिणी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सवना, ता. महागांव, जि.यवतमाळ, महाराष्ट्र (India)

## प्रस्तावना –

मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी, समान आणि न्याय्य समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता, शास्त्रीय प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन या क्षेत्रांमध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. व्यक्ती, समाज, देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृध्द प्रतिभा आणि संसाधनांचा पुरेपुर वापर करण्याकरता उच्च दर्जाचे सार्वभौमिक शिक्षण हा भविष्यासाठी सर्वात चांगला मार्ग आहे. पुढच्या दशकात जगातील सर्वात मोठी युवकांची लोकसंख्या भारतामध्ये असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या संधी पुरवण्याच्या आपल्या क्षमतेवर आपल्या देशाचे भवितव्य ठरेल.

भारताने २०१५ मध्ये स्वीकारलेल्या शाश्वत विकासाच्या २०३० च्या कृती कार्यक्रमाच्या उद्दिष्ट ४ (SDG4)मध्ये 'जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम' समाविष्ट असून हे उद्दिष्ट २०३० पर्यंत ''सर्वासाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि सर्वासाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधीना प्रोत्साहन देणे'' यासाठी प्रयत्न करण्याविषयी आहे. या उत्तुंग उद्दिष्टाकरता अध्ययनाला पाठिंबा देण्यासाठी आणि चालना देण्यासाठी संपूर्ण शिक्षण प्रणालीची नव्याने रचना करणे आवश्यक आहे म्हणजे शाश्वत विकास कृती कार्यक्रम २०३० ची सर्व महत्वाची लक्ष्ये आणि उद्दिष्टे साध्य करता येतील.

ज्ञानाच्या बाबतीत जगामध्ये वेगाने बदल होत आहेत. बिग डेटा, मशीन लर्निंग, कृत्रिम बुध्दिमत्ता यासारख्या विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांमधील वेगाने होत असलेल्या विकासामुळे जगभरातील अकुशल कामे आता माणसांऐवजी यंत्रे करू शकतील. त्याच वेळी, विशेषत: गणित, संगणक विज्ञान, आणि डेटा विज्ञान यातील कुशल कर्मचाऱ्यांना तसेच विज्ञान, समाजशास्त्र आणि मानव्यशास्त्रे यांच्यातील बहुशाखीय क्षमता असलेल्या कुशल कर्मचाऱ्यांना वाढती मागणी असेल. हवामान बदलाबरोबर, वाढते प्रदूषण आणि कमी होणारे नैसर्गिक स्त्रोत या परिणामांमुळे जगाची ऊर्जेची मागणी भागवण्यासाठी आता वेगळा दृष्टीकोन अंगीकारावा लागेल. वाढत्या साथी आणि महामारी यांच्या मुळे संसर्गजन्य रोगांच्या व्यवस्थापनात सहयोगाने संशोधन आणि लसींचा विकास करण्याची गरज निर्माण होईल. या साथींचा परिणाम म्हणून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या बहुशास्त्रीय शिक्षणाची गरज अधोरेखित करतात. भारत विकसित देश होण्याकडे वाटचाल करत असताना, तसेच जगातील सर्वात मोठया तीन अर्थव्यवस्थांपैकी एक होत असताना मानव्यशास्त्रे आणि कलेची मागणी वाढत जाईल.

खरोखर, रोजागाराची परिस्थिती आणि वैश्विक परिसंस्था वेगाने बदलत असताना, मुलांनी केवळ शिकणेच महत्वाचे ठरणार नाही तर कसे शिकायचे हे शिकणे जास्त महत्वाचे ठरणार आहे. त्यामुळे मजकूर कमी करून शिक्षण तार्किक विचार कसा करायचा आणि समस्या कशा सोडवायच्या, कल्पक आणि बहुशाखीय कसे व्हायचे, नाविन्यपूर्णता कशी आणायची, जुळवून कसे घ्यायचे आणि नवनविन आणि बदलणाऱ्या क्षेत्रातील नवीन सामग्री कशाप्रकारे आत्मसात करायची. या दिशेला वळले पाहिजे. शिक्षण अधिक अनुभवात्मक, सर्वसमावेशक, एकात्मिक, जिज्ञासू, संशोधनकेंद्रित, लवचिक आणि अर्थातच आनंददायक होण्यासाठी अध्यापनशास्त्र उत्क्रांत होण्याची गरज आहे. शिकणाऱ्यांचे सर्व पैलू आणि क्षमता विकसित होण्यासाठी; आणि शिक्षण, सर्व दिशांनी विकसित होण्यासाठी उपयुक्त आणि शिकणाऱ्यासाठी अधिक समाधानकारक होण्यासाठी, अभ्यासक्रमात विज्ञान आणि गणिताच्या बरोबरीनेच मूलभूत कला, हस्तकला, मानव्यशास्त्रे, खेळ, क्रीडा आणि स्वास्थ्य, भाषा, साहित्य, संस्कृती आणि मूल्ये

यांचा समावेश असणे अत्यावश्यक आहे. शिक्षणामुळे चारित्र्य घडले पाहिजे आणि ज्यायोगे शिकणारे नीतिवान, तर्कशुध्द, सहानुभूतीशील आणि सहद्दय बनतील आणि त्याच वेळी ते विद्यार्थी लाभदायी आणि समाधानकारक रोजगार मिळवण्यासाठीही तयार होतील.

नवीन शिक्षण धोरणाने सर्व विद्यार्थ्यांना ते कुठेही रहात असेल तरीही, चांगल्या गुणवत्तेची शिक्षण व्यवस्था पुरवली पाहिजे आणि उपेक्षित, वंचित आणि अल्प प्रतिनिधित्व असलेल्या गटांवर विशेष लक्ष केंद्रित केले पाहिजे. शिक्षण हे समानता सुनिश्चित करण्याचे मोठे माध्यम आहे आणि याद्वारे समाजात समानता, सर्व समावेशकता आणि सामाजिक—आर्थिक गतिशीलता साध्य करता येते. वरील गटातील विद्यार्थ्यांना, काही अडथळे असले तरीही, शिक्षण व्यवस्थेत प्रवेश घेण्यासाठी आणि त्यात त्यांना उत्कृष्ट कामगिरी करता येण्यासाठी सर्व प्रयत्न केले पाहिजेत.

भारताच्या समृध्द विविधतेचा आणि संस्कृतीचा मान ठेवत आणि त्याचवेळी देशाच्या स्थानिक आणि वैश्विक संदर्भातील गरजा लक्षात घेऊन या सगळ्या गोष्टीचा धोरणात समावेश केला पाहिजे. भारतातील युवकांना भारत देशाविषयी आणि इथल्या विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक गरजांबरोबरच येथील अद्वितीय कला, भाषा आणि ज्ञानाच्या परंपरांविषयी राष्ट्रीय अभिमान, आत्मविश्वास, आत्मज्ञान, परस्पर सहयोग व एकतेसाठी आणि भारताने सतत विकासाच्या पायऱ्या चढण्यासाठी ज्ञान होणे अतिशय आवश्यक आहे.

## आधीची धोरणे —

शिक्षणाच्या जुन्या धोरणांच्या अंमलबजावणीने, मुख्यतः प्रवेश आणि समानतेवर भर दिला होता. राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ चा कृती कार्यक्रम १९९२ मध्ये सुधारण्यात आला (NPE 1986/92) आधीच्या धोरणातील पूर्ण न झालेले काम या धोरणाद्वारे पूर्ण करण्याचा पुरेपुर प्रयत्न करण्यात आला आहे. १९८६/९२ च्या मागील धोरणानंतरचे एक मोठे पाऊल म्हणजे नि:शुल्क आणि अनिवार्य शिक्षण अधिनियम २००९ हे होते. याद्वारे सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण साध्य करण्यासाठी कायदेशीर आधार उपलब्ध करण्यात आला.

## या धोरणाची तत्वे —

या शिक्षण व्यवस्थेचा हेतू तार्किक विचार आणि कृती करण्यासाठी सक्षम असलेल्या आणि (सहद्‌यता) करूणा, सहानुभूती, धैर्य आणि चिकाटी, विज्ञानाधिष्टीत कल व रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक बांधिलकी आणि मूल्ये असलेल्या चांगल्या व्यक्ती विकसित करणे असा आहे. याचा उद्‌देश आपल्या घटनेद्वारे परिकल्पित न्याय्य, सर्वसमावेशक आणि बहुलतावादी समाजाच्या निर्मितीत सहभाग घेणारे, कार्यक्षम, आणि चांगल्याप्रकारे योगदान देणारे नागरिक तयार करणे, असा आहे.

ज्या संस्थेत प्रत्येक विदयार्थ्याला आपल्याला इथे आपुलकीने वागवले आपले स्वागत केले जाते असे वाटते आणि त्याची जिथे काळजी वाहिली जाते, तिथे एक सुरक्षित आणि प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण असते, तिथे सर्व विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विविध अनुभव प्रकार उपलब्ध करून दिले जातात आणि जिथे शिकण्यासाठी चांगल्या पायाभूत सुविधा आणि उपयोगी संसाधने उपलब्ध असतात, ती खरी चांगली शिक्षण संस्था असते. या सर्व गोष्टी साध्य करणे हे प्रत्येक शैक्षणिक संस्थेचे ध्येय असले पाहिजे. मात्र, त्याचवेळी विविध संस्था आणि शिक्षणाच्या विविध टप्प्यामध्ये सुलभ सहयोग आणि समन्वय असणे आवश्यक आहे.

सर्वसाधारणपणे शिक्षण व्यवस्था आणि त्याचबरोबरच स्वतंत्र संस्था, या दोन्हींना मार्गदर्शन करणारे मूलभूत सिध्दांत असे आहेत:

- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वैशिष्टयपूर्ण क्षमता शोधणे, ओळखणे आणि त्या विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे
- शिक्षक आणि पालकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास आणि अभ्यासेतर दोन्ही क्षेत्रांमध्ये चालना देणे.

## शिक्षक —

शिक्षक खऱ्या अर्थाने आपल्या मुलांचे भवितव्य घडवतात आणि म्हणून अपल्या राष्ट्राचेही भवितव्य घडवतात. शिक्षकांच्या उदात्त योगदानामुळेच भारतीय समाजात शिक्षक हे सर्वाधिक आदरास पात्र होते. सर्वोत्कृष्ट आणि सर्वाधिक शिकलेल्या व्यक्तीच केवळ शिक्षक बनत असत. शिक्षक किंवा गुरूंना त्यांचे ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे शिकण्यासाठी जे काही आवश्यक असेल ते समाज त्यांना पुरवत असे, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची गुणवत्ता, भरती, नेमणूक, सेवेच्या अटी आणि शिक्षकांचे सक्षमीकरण या बाबी जशा असायला हव्यात तशा नाहीत आणि त्यामुळे शिक्षकांची गुणवत्ता व प्रेरणा अपेक्षित निकषांपर्यत पोहोचत नाही. शिक्षकांबद्‌दलचा उच्च आदर आणि शिक्षकी पेशाचा उच्च दर्जा पूर्ववत व्हायला हवा जेणेकरून सर्वोत्कृष्ट व्यक्तीना शिक्षण मिळते.

आपल्या मुलांचे आणि आपल्या देशाचे सर्वोत्तम भविष्य सुनिश्चित करण्यासाठी शिक्षकासाठी त्यांचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे.

## भरती आणि नेमणूक —

उत्कृष्ट विद्यार्थी, विशेषतः ग्रामीण भागातील, शिक्षकी व्यवसायात प्रवेश घेतील हे सुनिश्चित करण्यासाठी, ४ वर्षाच्या दर्जेदार एकात्मिक बी.एड. कार्यक्रमांचा अभ्यास करण्यासाठी देशभरात मोठया प्रमाणात गुणवत्ता आधारित शिष्यवृत्या सुरू केल्या जातील. ग्रामीण भागात खास गुणवत्ता—आधारित शिष्यवृत्यांची स्थापना केली जाईल, ज्यामध्ये बी.एड. कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक क्षेत्रात प्राधान्याने नोकरी देण्याचादेखील समावेश असेल. अशा शिष्यवृत्या स्थानिक विद्यार्थ्यांना स्थानिक नोकरीच्या संधी उपलब्ध करून देतील, विशेषतः महिला विद्यार्थ्यांना, जेणेकरून हे विद्यार्थी स्थानिक भागातील रोल मॉडेल म्हणून आणि स्थानिक भाषा बोलणारे उच्च पात्रताधारक शिक्षक म्हणून काम करतील. ग्रामीण भागामध्ये विशेषतः गुणवत्तापूर्ण शिक्षकांची तीव्र कमतरता असलेल्या भागांमध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहन दिले जाईल. ग्रामीण शाळांमध्ये शिक्षक म्हणून काम करण्यासाठीचे प्रमुख प्रोत्साहन म्हणजे शाळेच्या जवळपास किवा शाळेच्या आवारात स्थानिक निवासाची सोय करणे किवा वाढीव घर भत्ता देणे.

शिक्षकांच्या वारंवार बदल्या करण्याची हानिकारक प्रथा थांबवली जाईल, जेणेकरून विद्यार्थ्यांचे रोल मॉडेल आणि शैक्षणिक वातावरण यात सातत्य राहील. शिक्षकांच्या बदल्या अगदी विशेष परिस्थितीत आणि राज्य/केंद्रशासित प्रदेशाच्या सरकारने योग्यपणे निर्धारित केलेल्या रचनात्मक पध्दतीनुसारच होतील. शिवाय, ऑनलाईन संगणकीय प्रणालीने बदल्या करण्यात येतील, ज्यामुळे पारदर्शकता सुनिश्चित होईल.

मजकूर आणि अध्यापनाच्या दृष्टीने अधिक चांगले चाचणी साहित्य बिंबवण्यासाठी शिक्षक पात्रता चाचण्या (टीचर्स एलिजीबिलिटी टेस्ट —टीईटी) सशक्त केल्या जातील. शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवरील (मूलभूत, पूर्वाध्ययन, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक) शिक्षकांनाही टीईटी मध्ये समाविष्ट करण्यात येईल. विषय शिक्षकांसाठी, संबंधित विषयांमधील योग्य टीईटी किवा एनटीए चाचणी गुणदेखील भरतीसाठी विचारात घेतले जातील. अध्यापनाची आवड आणि प्रेरणेचे मोजमाप करण्यासाठी, वर्गात एखादे प्रात्यक्षिक किवा मुलाखत हा शाळा आणि शाळा संकुलामध्ये शिक्षकभरती करण्याचा एक अविभाज्य भाग बनेल. या मुलाखतीचा उपयोग स्थानिक भाषेतून अध्यापन करण्यातील सहजता आणि प्राविण्य यांचे मूल्यांकन करण्यासाठी देखील केला जाईल. जेणेकरून प्रत्येक शाळा/शाळा संकुलात विद्यार्थ्यांशी स्थानिक भाषेतून आणि त्यांच्या घरच्या प्रचलित भाषेतून संवाद साधू शकणारे निदान काही शिक्षक असतील. खाजगी शाळांमधील शिक्षकदेखील याच प्रकारे टीईटी, प्रात्यक्षिक/मुलाखत आणि स्थानिक भाषेचे (भाषांचे) ज्ञान याद्वारे अर्हताप्राप्त असले पाहिजेत.

सर्व विषयांसाठी, विशेषतः कला, शारीरिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण आणि भाषा या विषयांसाठी पुरेसे शिक्षक असतील हे सुनिश्चित करण्यासाठी शाळा आणि शाळा संकुलात शिक्षकांची भरती केली जाईल आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश सरकारांनी स्वीकारलेल्या शाळा—गटांच्या अनुसार शाळांदरम्यान शिक्षकांचे शेअरिंग करण्याचा विचार केला जाऊ शकतो.

## शिक्षकांसाठी व्यावसायिक मानके

एनसीईआरटी, एसीईआरटी विविध स्तर आणि प्रदेशातील शिक्षक, शिक्षक तयारी आणि विकासात गुंतलेल्या तज्ञ संस्था, व्यावसायिक शिक्षणातील तज्ञ संस्था, आणि उच्च शैक्षणिक संस्था यांच्याशी सल्लामसलत करून, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेद्वारा (नॅशनल कौन्सिल फॉर टिचर एज्युकेशन), सामान्य शिक्षण परिषदेअंतर्गत (जनरल एज्युकेशन कौन्सिल —जीईसी) असलेल्या व्यावसायिक मानक स्थापना संस्था ( प्रोफेशनल स्टँडर्ड सेटिंग बॉडी — पीएसएसबी) या आपल्या पुनर्रचित नवीन स्वरूपात, २०२२ पर्यंत शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांचा (नॅशनल प्रोफेशनल स्टँडर्ड फॉर टीचर्स — एनपीएसटी) सर्वसामान्य मार्गदर्शक संच तयार करण्यात येईल. नैपुण्य/स्तर याच्या विविध टप्यावर मानकामध्ये केला जाईल. यामध्ये कामगिरीच्या मूल्यांकनासाठी, प्रत्येक स्तराकरता ठरवलेल्या मानकांचा समावेश असेल आणि हे मूल्यांकन वेळोवेळी केले जाईल. एनपीएसटी द्वारे सेवापूर्व शिक्षक—शिक्षण कार्यक्रमांच्या रचनेविषयीदेखील माहिती दिली जाईल. यानंतर राज्यांकडून याचा अवलंब केला जाईल आणि त्याच्या आधारावर शिक्षक करिअर व्यवस्थापनाचे सर्व पैलू ठरवले जातील ज्यामध्ये कार्यकाळ, व्यावसायिक विकासाचे प्रयत्न, वेतनवाढ, पदोन्नती आणि इतर मान्यता यांचादेखील समावेश असेल. कार्यकाळ आणि वरिष्ठता याच्या आधारावर पदोन्नती किवा पगारवाढ होणार नाही. तर ती फक्त अशा प्रकारच्या मूल्यांकनाच्या आधारावर केली

जाईल. यंत्रणेच्या परिणामकारतेचे काटेकोरपणे अनुभवजन्य विश्लेषण करून, त्याच्या आधारावर २०३० मध्ये व्यावसायिक मानकांचे परीक्षण आणि सुधारणा केल्या जातील. आणि त्यानंतर दर दहा वर्षानी असे केले जाईल.

## विशिष्ट कौशल्ये असलेले शिक्षक—

शालेय शिक्षणातील काही क्षेत्रामध्ये विशिष्ट कौशल्ये असलेल्या अतिरिक्त शिक्षकांची नितांत गरज आहे. अशा प्रकारच्या खास आवश्यकतांची उदाहरणे म्हणजे, पूर्वमाध्यमिक आणि माध्यमिक शाळेच्या स्तरावर दिव्यांग मुलांना विषय शिकवणे तसेच विशिष्ट अध्ययन विकलांगता असलेल्यांना शिकवणे. अशा शिक्षकांना फक्त विषय शिकवण्याचे ज्ञान आणि शिक्षणातील विषयाशी— संबंधित उद्दिष्टयांची समज असून चालत नाही. तर त्यांच्याकडे मुलांच्या विशेष गरजा समजून घेण्यासाठी योग्य कौशल्ये असण्याची देखील गरज आहे. म्हणूनच पूर्व—सेवा शिक्षक तयारी दरम्यान किंवा त्यानंतर, विषयाचे शिक्षक किवा सामान्य शिक्षक यांच्यासाठी अशी क्षेत्रे द्वितीय विशेषता म्हणून विकसित करता येतील. अशा प्रकारचे अभ्यासक्रम सर्टिफिकेट कोर्स म्हणून उपलब्ध करून दिले जातील. जे पूर्वसेवा किवा सेवेत असताना घेता येतील, पूर्ण वेळ किवा अर्ध वेळ/मिश्र असतील आणि बहुशाखीय महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असतील. एनसीटीई आणि आरसीआय कोर्सच्या अभ्यासक्रमांमध्ये अधिक सहकार्य असण्यावर भर दिला जाईल जेणेकरून अध्यापन चांगल्या प्रकारे हाताळू शकणारे विशिष्ट कौशल्ये असलेले पात्र शिक्षक पुरेशा प्रमाणात उपलब्ध असतील.

## शिक्षक शिक्षणाचा दृष्टिकोन—

उच्च गुणवत्ता असलेले आशय तसेच अध्यापनशास्त्र यामध्ये शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची गरज असल्याचे लक्षात घेऊन, २०३० पर्यंत शिक्षकांचे शिक्षण हळूहळू बहुशाखीय महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये हलवण्यात येईल. सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठे बहुशाखीय होण्याच्या दिशेने वाटचाल करणार असल्याचे शिक्षण क्षेत्रातील बी.एड., एम.एड, आणि पीएच.डी. पदवी देणारे चांगल्या दर्जाचे शिक्षण विभाग सुरू करण्याचा उद्‌देशदेखील त्यांच्यापुढे असेल.

२०३० पर्यत, अध्यापनासाठी लागणारी किमान पात्रता असेल ४ वर्षाची एकात्मीकृत बी.एड. ची पदवी, ज्यामध्ये ज्ञान सामग्री आणि अध्यापनशाखाविषयी विस्तारांने शिकवले जाईल आणि स्थानिक शाळेत विद्यार्थी—अध्यापनाच्या रूपात ठोस असे व्यावहारिक प्रशिक्षण दिले जाईल. ४ वर्षाची एकात्मीकत बी.एड. ची पदवी उपलब्ध करून देणाऱ्या नेतृत्व गुण आणि व्यवस्थापनाबरोबरच आशय आणि अध्यापनशास्त्राशी संबंधित कार्यक्रमाचादेखील समावेश असेल तसेच क्षमतेवर अधारित शिक्षण या विचाराचा आधार घेवून अध्यापनशास्त्रीय योजना तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे यावर भर दिला जाईल.

## करिअर व्यवस्थापन आणि प्रगती (सीएमपी) —

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक केले पाहिजे आणि त्यांना पदोन्नती दिली पाहिजे. तसेच, उत्तम कामगिरी करण्याकरता प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना पगार वाढ दिली पाहिजे, म्हणूनच कार्यकाळ, पदोन्नती, आणि वेतनमान यांचा समावेश असलेली, शिक्षकांच्या प्रत्येक टप्प्यावर एकाहून एक अधिक स्तर असलेली आणि उत्कृष्ट शिक्षकांना प्रोत्साहित आणि सन्मानित करणारी गुणवत्तेवर आधारित सशक्त व्यवस्था विकसित केली पाहिजे. याकरता कामगिरीचे योग्य मूल्यांकन करण्यासाठी अनेक मापदंडांची/पॅरामीटर्सची यंत्रणा राज्य/केंद्रशासित प्रदेशाच्या शासनांद्वारे विकसित केली जाईल. जी सहकाऱ्यांद्वारे केलेले परीक्षण, उपस्थिती, वचनबध्दता, सीपीडी चे तास, आणि श्व समाजासाठी केलेली इतर प्रकारची सेवा यावर आधारित असेल. या धोरणामध्ये करिअरच्या संदर्भात 'कार्यकाळ' किवा 'टेन्युर' म्हणजे कामगिरी आणि योगदानाच्या योग्य मूल्यांकनानंतर कायमस्वरूपी रोजगाराची निश्चिती आणि 'टेन्युर ट्रॅक' म्हणजे कार्यकाळाच्या आधीचा परिवीक्षेचा काळ (प्रोबेशन पिरियड).

याव्यतिरिक्त शिक्षकांना करिअर विकासाची संधी (कार्यकाळ, पदोन्नती, वेतनवाढ इ.च्या दृष्टीने) शाळेच्या एकाच स्तरावर असताना (म्हणजेच पायाभूत, पूर्वाध्ययन, पूर्वमाध्यमिक किवा माध्यमिक) उपलब्ध असेल याची सुनिश्चिती केली जाईल. तसेच, शिक्षकांना प्रारंभिक स्तरावरून वरच्या स्तरावर जाण्यासाठी किवा याच्या उलट करण्यासाठी करिअरशी संबंधित कोणतेही प्रोत्साहन नसेल, याचीदेखील सुनिश्चिती केली जाईल (पण शिक्षकाची इच्छा आणि पात्रता असल्यास अशा प्रकारे करिअरसाठी एका स्तरावरून दुसऱ्या स्तरावर जायची परवानगी आहे). असे करण्याचे कारण म्हणजे, शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरांवर उच्च गुणवत्ता असलेल्या शिक्षकांची गरज असते आणि कोणताही स्तर इतर कुठल्याही स्तरापेक्षा महत्वाचा समजला जाणार नाही. या वस्तुस्थितीला पाठिंबा देणे हे आहे.

शिक्षकांची गुणवत्तेवर आधारित वरच्या स्तरावर बढती होणे (व्हर्टिकल मोबिलिटी) अतिशय महत्वाचे आहे; नेतृत्वगुण आणि व्यवस्थापन कौशल्य दाखवणाऱ्या उत्कृष्ट शिक्षकांना कालांतराने प्रशिक्षण दिले जाईल, म्हणजे त्यांना शाळा, शाळेचे संकुल, बीआरसी, सीआरसी, बीआयटीई, डायट तसेच, संबंधित सरकारी विभागांमध्ये शिक्षणक्षेत्रात नेतृत्व करता येईल.

## शिक्षकांसाठी व्यावसायिक मानके—

एनसीईआरटी, एसीईआरटी विविध स्तर आणि प्रदेशातील शिक्षक, शिक्षक तयारी आणि विकासात गुंतलेल्या तज्ञ संस्था, व्यावसायिक शिक्षणातील तज्ञ संस्था, आणि उच्च शैक्षणिक संस्था यांच्याशी सल्लामसलत करून, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेद्वारा (नॅशनल कौन्सिल फॉर टिचर एज्युकेशन), सामान्य शिक्षण परिषदेअंतर्गत (जनरल एज्युकेशन कौन्सिल —जीईसी) असलेल्या व्यावसायिक मानक स्थापना संस्था ( प्रोफेशनल स्टँडर्ड सेटिंग बॉडी — पीएसएसबी) या आपल्या पुनर्रचित नवीन स्वरूपात, २०२२ पर्यंत शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांचा (नॅशनल प्रोफेशनल स्टँडर्ड फॉर टीचर्स — एनपीएसटी) सर्वसामान्य मार्गदर्शक संच तयार करण्यात येईल. नैपुण्य/स्तर याच्या विविध टप्यावर मानकामध्ये केला जाईल. यामध्ये कामगिरीच्या मूल्यांकनासाठी, प्रत्येक स्तराकरता ठरवलेल्या मानकांचा समावेश असेल आणि हे मूल्यांकन वेळोवेळी केले जाईल. एनपीएसटी द्वारे सेवापूर्व शिक्षक—शिक्षण कार्यक्रमांच्या रचनेविषयीदेखील माहिती दिली जाईल. यानंतर राज्यांकडून याचा अवलंब केला जाईल आणि त्याच्या आधारावर शिक्षक करिअर व्यवस्थापनाचे सर्व पैलू ठरवले जातील ज्यामध्ये कार्यकाळ, व्यावसायिक विकासाचे प्रयत्न, वेतनवाढ, पदोन्नती आणि इतर मान्यता यांचादेखील समावेश असेल. कार्यकाळ आणि वरिष्ठता याच्या आधारावर पदोन्नती किवा पगारवाढ होणार नाही. तर ती फक्त अशा प्रकारच्या मूल्यांकनाच्या आधारावर केली जाईल. यंत्रणेच्या परिणामकारतेचे काटेकोरपणे अनुभवजन्य विश्लेषण करून, त्याच्या आधारावर २०३० मध्ये व्यावसायिक मानकांचे परीक्षण आणि सुधारणा केल्या जातील. आणि त्यानंतर दर दहा वर्षानी असे केले जाईल.

## शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी करणे आणि शिक्षण सर्वत्र आणि सगळया स्तरांवर पोहोचेल, हे सुनिश्चित करणे —

मुलांनी शाळेत प्रवेश घेतला आहे आणि ती शाळेत उपस्थित राहत आहेत हे सुनिश्चित करणे हे शालेय व्यवस्थेचे एक उद्दिष्ट असणे आवश्यक आहे. सर्व शिक्षा अभियान (आता समग्र शिक्षा) आणि शिक्षण हक्क कायदा यासारख्या प्रयत्नांच्या माध्यमातून भारताने अलिकडच्या काही वर्षात प्राथमिक शिक्षणात जवळपास पूर्णपणे म्हणता येईल अशी शाळा नोंदणी साध्य करण्याच्या दृष्टीने उल्लेखनीय प्रगती केली आहे. नंतरच्या इयत्तांचा डेटा मात्र मुलांना शालेय शिक्षण व्यवस्थेत (सांभाळून ठेवण्यात) काही गंभीर समस्या असल्याचे दर्शवतो. इयत्ता ६—८ साठी Gross Enrollment Rario (GER) 90.9% होता, तर इयत्ता ९—१० आणि ११—१२ साठी तो अनुक्रमे फक्त 79.3% आणि 56.5% होता. यावरून हे दिसून येते की शाळेत प्रवेश घेतलेल्यांपैकी मोठया प्रमाणावर मुले इयत्ता ५ वी नंतर आणि विशेषत: इयत्ता ८ वी नंतर शाळा सोडतात. नासो ने २०१७—१८ मध्ये केलेल्या ७५ व्या फेरीतील घरगुती सर्वेक्षणानुसार ६ ते १७ वर्षे वयोगटातील शालाबाहय मुलांची संख्या ३.२२ कोटी आहे. या मुलांना लवकरात लवकर शिक्षणप्रवाहात परत आणणे आणि २०३० पर्यत शालापूर्व ते माध्यमिक स्तरापर्यत १०० टक्के एकूण शाळानोंदणी गुणोत्तराचे (ग्रॉस एनरोलमेंट रेशो) उद्दिष्ट ठेवून आणखीन मुलांची शाळागळती थांबवणे यांना सर्वोच्च प्राधान्य असेल. देशातील सर्व मुलांना शालापूर्व ते इयत्ता १२ वी पर्यतच्या, व्यावसायिक शिक्षणासह गुणवत्तापूर्ण सर्वांगीण शिक्षणाची सार्वत्रिक उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आणि तशी संधी देण्यासाठी सर्वसमावेशक देशव्यापी प्रयत्न केले जातील.

शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत आणण्यासाठी व आणखी विद्यार्थ्यांना शाळा सोडण्यापासून रोखण्यासाठी एकूण दोन उपक्रम हाती घेण्यात येतील. पहिला म्हणजे, प्रभावी आणि पुरेशा पायाभूत सुविधा पुरवणे जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना पूर्व—प्राथमिक शाळा ते इयत्ता १२ वी पर्यतच्या सर्व स्तरांवर सुरक्षित आणि रंजकपणे शालेय शिक्षण मिळू शकेल. प्रत्येक टप्प्यावर नियमित प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध करून देण्याबरोबरच कोणत्याही शाळेत पायाभूत सुविधाची कमतरता राहणार नाही याची विशेष काळजी घेतली जाईल. सरकारी शाळांची विश्वासार्हता पुनर्प्रस्थापित केली जाईल आणि आधीपासून अस्तित्वात असलेल्या शाळांची गुणवत्ता वाढ आणि विस्तार करून, जिथे शाळा अस्तित्वात नाही अशात ठिकाणी अतिरिक्त दर्जेदार शाळा बांधून आणि सुरक्षित व व्यवहार्य वाहतूक सुविधा आणि किवा वसतिगृहे पुरवून, विशेषत: मुलीसाठी हे साध्य केले जाईल, जेणेकरून सर्व मुलांना गुणवत्तापूर्ण शाळेत जाण्याची आणि योग्य स्तरावर शिकण्याची संधी मिळेल. स्थलांतरित मजुरांची मुले

आणि विविध परिस्थितीमुळे शाळा सोडणाऱ्या इतर मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात परत आणण्यासाठी नागरिकांच्या सहकार्याने पर्यायी आणि नाविण्यपूर्ण शिक्षणाची केंद्रे स्थापन केली जातील.

दुसरा उपक्रम म्हणजे, विद्यार्थ्यांवर तसेच त्यांच्या शिक्षण पातळीवर काळजीपूर्वक लक्ष ठेवून शाळेत सार्वत्रिक सहभाग साध्य करणे, जेणेकरून (a) त्यांनी शाळेत प्रवेश घेतला आहे व उपस्थित आहेत आणि (b) ते मागे पडले असल्यास किवा त्यांनी शाळा सोडली असल्यास पुन्हा अभ्यास भरून काढण्यासाठी आणि शाळेत पुन्हा प्रवेश घेण्यासाठी त्यांना योग्य संधी मिळतील, हे सुनिश्चित केले जाईल. १८ वर्षापर्यंतच्या सर्व मुलांना पायाभूत स्तर ते इयत्ता १२ वी पर्यंतचे यथायोग्य व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी योग्य सुविधा यंत्रणा स्थापन केल्या जातील, शाळा/शालेय संकुल आणि शिक्षकांशी जोडलेले समुपदेशक किवा सुयोग्य प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसोबत सतत कार्य करतील आणि सर्व शाळावयीन मुले शाळेत जात आहेत आणि शिकत आहेत हे सुनिश्चित करण्यासाठी समुदायांमध्ये फिरून त्यांच्याशी संवाद साधतील. नागरी समाजातील संस्थाचे/सामाजिक न्याय व सक्षमीकरण विभागाचे प्रशिखित व पात्र सामाजिक कार्यकर्ते आणि अपंग व्यक्तीच्या सशक्तीकरणाशी संबंधित राज्य व जिल्हा पातळीवरील सरकारी अधिकारी यांना या महत्वाच्या कार्यात त्यांची मदत घेण्यासाठी राज्य/केंद्रशासित प्रदेशाच्या सरकारांनी अवलंबलेल्या विविध नाविन्यपूर्ण यंत्रणाद्वारे शाळांशी जोडले जाऊ शकते.

कला–एकात्मीकरण हा एक बहु–अभ्यासक्रमीय अध्यापन दृष्टिकोन आहे ज्यामध्ये विविध विषयांच्या संकल्पना शिकण्यासाठी आधार म्हणून कला आणि संस्कृतीच्या विविध पैलूंचा आणि प्रकारांचा उपयोग केला जातो. अनुभवात्मक शिक्षणावर भर देण्याचा एक भाग म्हणून, केवळ वर्गात आनंदी वातावरण निर्मितीसाठीच नव्हे तर प्रत्येक स्तरावर अध्यापन व शिक्षण प्रक्रियेत भारतीय कला आणि संस्कृती एकत्रित करून भारतीय संस्कार बिंबवण्यासाठी, कलासक्त (कला अंतर्भूत केलेले) शिक्षण वर्गातील व्यवहारांमध्ये समाविष्ट केले जाईल.

क्रीडा–एकात्मीकरण हा आणखी एक बहु–अभ्यासक्रमीय अध्यापन दृष्टिकोन आहे, जो स्थानिक खेळांसह शारीरिक उपक्रमांचा वापर अध्यापन पध्दतीमध्ये करून, सहकार्य, स्वयं–पुढाकार, स्वत:ची दिशा, स्वयं–शिस्त, सांघिक कार्य, जबाबदारी, नागरिकत्व इत्यादि कौशल्ये विकसित करण्यात मदत करतो. शिक्षणामध्ये खेळांचे एकात्मीकरण करण्याची गरज सगळयांना माहितीच आहे कारण यामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ सुधारून सर्वकष विकासाला चालना मिळते, तसेच आकलनक्षमता वाढते.

## अभ्यासक्रम निवडीमध्ये लवचिकता देऊन विद्यार्थ्यांना सक्षम करा–

विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठीचे विषय निवडण्यासाठी जास्त लवचिकता आणि निवडीला वाव दिला जाईल, विशेषत: माध्यमिक शाळेत– यामध्ये शारीरिक शिक्षण, कला आणि हस्तकला आणि व्यावसायिक कौशल्यांचासुध्दा अंतर्भाव असेल, त्यामुळे विद्यार्थी त्यांच्या अभ्यासाच्या आणि जीवनाच्या योजनेचे मार्ग स्वत: ठरवू शकतील. एकात्मिक विकास आणि विषयांच्या तसेच अभ्यासक्रमाच्या निवडीला दरवर्षी मोठा वाव देणे, हे माध्यमिक शालेय शिक्षणाचे नवीन खास वैशिष्टये असेल. 'अभ्यासक्रम', 'अभ्यासक्रमेतर' किवा 'सह–अभ्यासक्रम' यामध्ये, कला, मानव्यशास्त्रे, आणि विज्ञान यामध्ये किवा व्यावसायिक किवा शैक्षणिक शाखामध्ये कोणतेही स्पष्ट विभाजन नसेल. विज्ञान, मानव्यशास्त्रे आणि गणित यांच्याबरोबरीने शारीरिक शिक्षण, कला आणि हस्तकला आणि व्यावसायिक कौशल्ये असे विषय शाळेच्या अभ्यासक्रमात सर्व वर्षामध्ये समाविष्ट केलेले असतील, यामध्ये प्रत्येक वयोगटासाठी काय रंजक आणि सुरक्षित आहे याचा विचार केलेला असेल.

## विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मूल्यमापनात परिवर्तन–

आपल्या शालेय व्यवस्थेच्या संस्कृतीमधील मूल्यमापन, सारांश (समेटीव्ह) पध्दतीचे आहे –जे मुख्यत्वे घोकंपट्टी करून लक्षात ठेवण्याच्या कौशल्याची पारख करते. या मूल्यमापनाच्या उद्दिष्टयात बदल करून ते अधिक नियमित आणि रचनात्मक (फॉर्मेटीव) केले जाईल. क्षमतेवर आधारित असेल, विद्यार्थ्यासाठी अध्ययन आणि विकासाला प्रोत्साहन देणारे आणि उच्च–स्तरावरील कौशल्ये उदा. विश्लेषण, तार्किक विचार आणि संकल्पनात्मक सुस्पष्टता, यांची पारख करणारे असेल, मूल्यमापनाचा प्रमुख उद्देश खरोखरीच अध्यापनासाठी असेल; याची शिक्षक, विद्यार्थी आणि संपूर्ण शालेय व्यवस्थेला अध्यापन–अध्ययन प्रक्रियेमध्ये सतत बदल करायला मदत होईल जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांकरता शिक्षण आणि विकास यांना चालना मिळेल. सर्व शैक्षणिक स्तरावरील मूल्यमापनाचे हे मूलभूत तत्व असेल.

शाळेकडून पालकांना कळवल्या जाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या शाळा–आधारित मूल्यमापनाच्या प्रगती पुस्तकाची संपूर्ण पुनर्रचना राज्ये/केंद्रशासित प्रदेशांतर्फे, प्रस्तावित राष्ट्रीय मूल्यमापन केंद्र, एनसीईआरटी, आणि

एससीईआरटी यांच्या मार्गदर्शनाखाली केली जाईल. हे प्रगती पुस्तक एक सर्वांगीण व्यापक (३६०—अंश), बहुआयामी अहवाल असेल व या अहवालामध्ये, शिकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची आकलनीय (कॉग्निटिव), भावात्मक (अफेक्टिव) आणि सायकोमोटर क्षेत्रातील प्रगती तसेच विशेषता अतिशय तपशीलवारपणे दर्शवली जाईल. यामध्ये शिक्षकाच्या मूल्यमापनासह स्व—मूल्यमापन, सहाध्यायी—मूल्यमापन तसेच प्रकल्प आणि अन्वेषणावर आधारित अध्ययन, प्रश्नमंजुषा, नाटयीकरण, सांघिक कार्य, पोर्टफोलिओज इ. मध्ये विद्यार्थ्याने केलेली प्रगती या सर्वाचा समावेश असेल. सर्वागीण प्रगती पुस्तक हे घर आणि शाळा यातील महत्वाचा दुवा असेल आणि त्याच्या जोडीने पालक—शिक्षक बैठकादेखील घेतल्या जातील जेणेकरून पालकांना आपल्या मुलांच्या सर्वागीण शिक्षणामध्ये आणि विकासामध्ये सक्रियपणे सहभागी करून घेता येईल. प्रत्येक विद्यार्थ्याला वर्गात आणि वर्गाच्या बाहेर कशा प्रकारे मदत करावी याविषयीची महत्वपूर्ण माहिती प्राप्त होईल.

## कुशाग्र बुध्दीच्या/विशेष प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यासाठी सहाय्य—

प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही अंगभूत प्रतिभा असतात. त्या शोधल्या पाहिजेत, त्यांचे संगोपन त्यांना उत्तेजन दिले पाहिजे आणि त्या विकसित केल्या पाहिजेत. विविध रूची, कल किवा क्षमता या प्रतिभांची अभिव्यक्ती होऊ शकते. जे विद्यार्थी एखाद्या क्षेत्रात विशेष रूची आणि क्षमता दर्शवतात त्यांना शालेय अभ्यासक्रमाच्या पलीकडेदेखील त्या क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. शिक्षकांच्या शिक्षणामध्ये अशा विद्यार्थ्याच्या प्रतिभा आणि आवडी ओळखण्याच्या आणि त्यांना उत्तेजन देण्याच्या पध्दतीचा समावेश असेल. एनसीईआरटी आणि एनसीटीई कुशाग्र बुध्दीच्या मुलांच्या शिक्षणासाठी मार्गदर्शक तत्वे विकसित करेल. बी.एड. कार्यक्रमदेखील विशेष प्रतिभासंपन्न मुलांच्या शिक्षणात विशेषज्ञता प्राप्त करण्याची परवानगी देऊ शकतात.

वर्गातील एकाच विषयात विशेष रूची आणि किवा प्रतिभा असलेल्या विद्यार्थ्याना पूरक संवर्धन साहित्य आणि मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देऊन प्रोत्साहित करणे हे शिक्षकांचे लक्ष्य असेल. विषय—केंद्रित आणि प्रकल्प आधारित क्लब आणि मंडळांना शाळा, शाळा संकुल, जिल्हा पातळीवर आणि त्याही पलिकडे प्रोत्साहन आणि साहाय्य केले जाईल. उदाहरणार्थ, विज्ञान मंडळे, गणित मंडळे, संगीत आणि नृत्य कलामंडळे, बुध्दीबळ मंडळे, कविता इत्यादी अनेक, या धर्तीवर माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यासाठी विविध विषयांच्या उच्च गुणवत्तेच्या राष्ट्रीय निवासी उन्हाळी कार्यक्रमांनाही प्रोत्साहन दिले जाईल, ज्यात सामाजिक—आर्थिकदृष्टया वंचित गटांसह उत्कृष्ट विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना आकर्षित करण्यासाठी कठोर गुणवत्ता—आधारित परंतु न्याय्य प्रवेशप्रक्रिया असेल.

देशभरात विविध विषयांमधील ऑलिम्पियाड आणि स्पर्धा घेण्यात येतील, ज्यामध्ये व्यवस्थित समन्वयाने शाळा ते स्थानिक ते राज्य देश पातळी अशी प्रगती होईल, जेणेकरून सर्व विद्यार्थी ते ज्या स्तरासाठी पात्र ठरतील त्यानुसार सहभाग घेऊ शकतील. मोठया प्रमाणावर सहभाग सुनिश्चित करण्यासाठी या स्पर्धा ग्रामीण भागांत आणि प्रादेशिक भाषांमध्ये घेण्याचे प्रयत्न केले जातील. आयआयटी आणि एनआयटी सारख्या प्रमुख संस्थांसह, सार्वजनिक आणि खाजगी विद्यापीठांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमधील गुणवत्ता—आधारित निकाल आणि इतर संबंधित राष्ट्रीय कार्यक्रमांचे निकाल त्यांच्या पदवीपूर्व कार्यक्रमांमध्ये प्रवेशाच्या निकषाचा भाग म्हणून वापरण्यास प्रोत्साहित केले जाईल.

एकदा का सर्व घरे आणि/किंवा शाळांमध्ये इंटरनेट—कनेक्शनयुक्त स्मार्टफोन किवा टॅब्लेट उपलब्ध झाले की, पालक आणि शिक्षकांच्या योग्य देखरेखीखाली विद्यार्थ्यासाठी गटांचे उपक्रम म्हणून प्रश्नमंजुषा, स्पर्धा, मूल्यांकन समृध्दी साहित्य असलेली ऑनलाईन ॲप आणि समान आवडी असलेल्यासाठी ऑनलाईन कम्युनिटीज विकसित केल्या जातील आणि उपरोक्त सर्व उपक्रम अधिक चांगले बनवण्यासाठी प्रयत्न केले जातील करतील. डिजिटल अध्यापनशास्त्र वापरण्यासाठी आणि त्याद्वारे ऑनलाईन संसाधने आणि सहयोगाद्वारे अध्यापन—अध्ययन प्रक्रिया अधिक समृध्द करण्यासाठी शाळा टप्प्याटप्प्याने स्मार्ट क्लासरूम्स विकसित करतील.

## शालेय अभ्यासक्रम आणि अध्यापनाची ५+३+३+४ या नवीन मांडणीत पुनर्रचना करणे—

शालेय शिक्षणाची अभ्यासक्रम व अध्यापन रचना, अनुक्रमे ३—८, ८—११, ११—१४ आणि १४—१८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्याच्या विकासाच्या वेगवेगळया टप्पावरील विकासात्मक गरजा आणि आवडीनिवडीबाबत प्रतिसादक्षम आणि सुसंगत बनवण्यासाठी तिची पुनर्रचना केली जाईल. म्हणूनच अभ्यासक्रम व अध्यापन रचना आणि शालेय शिक्षणासाठीचा अभ्यासक्रम आराखडा हे ५+३+३+४ रचनेनुसार असतील. ज्यामध्ये पायाभूत स्तर (दोन भागांमध्ये, म्हणजे अंगणवाडी/पूर्वप्राथमिक शाळेची ३ वर्षे +प्राथमिक शाळेतील इयत्ता १—२ ची २ वर्षे; एकत्रितपणे दोन्हीमध्ये ३—८ वयोगट समाविष्ट) पूर्वाध्ययन (प्रिपरेटरी) स्तर (इयत्ता ३—५, ८—११ वयोगट समाविष्ट),

पूर्वमाध्यमिक स्तर (इयत्ता ६–८, ११–१४ वयोगट समाविष्ट) आणि माध्यमिक स्तर (इयत्ता ९–१२, दोन टप्यांत म्हणजे ९ वी आणि १० वी पहिल्या आणि ११ वी आणि १२ वी दुसऱ्या, १४–१८ वयोगट समाविष्ट) यांचा समावेश असेल.

पायाभूत स्तरामध्ये पाच वर्षाचे लवचिक, बहुस्तरीय, खेळ/उपक्रम–आधारित शिक्षण आणि परिच्छेद १.२ मध्ये दिलेला ईसीसीई चा अभ्यासक्रम व अध्यापन समाविष्ट असेल. पूर्वाध्ययन स्तरामध्ये पायाभूत स्तरातील खेळ, शोध आणि उपक्रमावर आधारित अध्ययन आणि अभ्यासक्रमाच्या शैलीवर विकसित तीन वर्षाचे शिक्षण असेल. काही सोपा मजकूर असलेल्या पुस्तकांचा तसेच अधिक औपचारिक परंतु संवादात्मक पध्दतीने वर्गात शिकण्याच्या बाबीचादेखील समावेश करण्यास सुरूवात केली जाईल. जेणेकरून वाचन, लेखन, बोलणे, शारीरिक शिक्षण, कला, भाषा, विज्ञान आणि गणित यासारख्या विषयांचा भक्कम पाया तयार होईल. पूर्वमाध्यमिक स्तरामध्ये, पूर्वाध्ययन स्तराच्या अध्ययन आणि अभ्यासक्रमाच्या शैलीवर पुढे विकसित केलेले तीन वर्षाचे शिक्षण असेल, मात्र प्रत्येक विषयातील अधिक अमूर्त संकल्पना शिकण्यासाठी आणि त्याविषयीची चर्चेसाठी विषय शिक्षकांची सुरूवात झाल्यावर विद्यार्थी या टप्यावर विज्ञान, गणित, कला, सामाजिक शास्त्रे आणि मानवव्यशास्त्रांसाठी सज्ज असतील. अधिक विशिष्ट विषयांची आणि विषय शिक्षकांची ओळख करून दिली असली तरीही प्रत्येक विषयामधील कार्यात्मक शिक्षणास आणि वेगवेगळया विषयांमधील संबंध शोधण्यास प्रोत्साहन आणि विशेष महत्व दिले जाईल. माध्यमिक आणि अभ्यासक्रम शैलीवर पुढे विकसित केला असेल परंतु त्यात अधिक सखोलता, अधिक चिकित्सक विचार, आयुष्यातील इच्छा–आकांक्षांकडे अधिक लक्ष देणे आणि अधिक लवचिकता व विद्यार्थ्यांना विषयांची निवड करता येणे, या बाबी समाविष्ट असतील. विशेषत: विद्यार्थांना इयत्ता १० वी नंतर शिक्षण सोडवण्याचा आणि इयत्ता ११–१२ वी मधील व्यावसायिक किवा इतर कोणतेही अभ्यासक्रम करण्यासाठी पुढच्या स्तरामध्ये पुन्हा प्रवेश करण्याचा पर्याय उपलब्ध असेल. इच्छा असल्यास अधिक विशेषीकृत शाळेतदेखील प्रवेश घेता येईल.

वर वर्णन केलेले स्तर हे पूर्णपणे अभ्यासक्रम आणि अध्ययन विषयक आहेत, ज्याची रचना मुलांच्या आकलनात्मक विकासाच्या आधारे विद्यार्थ्यांसाठी शिक्षण जास्तीत जास्त परिणामकारक बनवण्यासाठी केलेली आहे. ते प्रत्येक स्तरावर राष्ट्रीय आणि राज्य अभ्यासक्रम आणि अध्यापन–अध्ययन धोरणांच्या विकासाची माहिती देतील, मात्र भौतिक पायाभूत सुविधामध्ये समांतर बदल करण्याची आवश्यकता नाही.

## या धोरणाची दूरदृष्टी–

या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दूरदृष्टी, ईप्सित भारतीय मूल्यांपासून विकसित केलेली, सर्वांना उच्च–गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देऊन, त्याद्वारे भारताला एक जागतिक ज्ञान–महासत्ता बनवून भारताचे एका न्याय्य आणि चैतन्यमय ज्ञान–समाजात शाश्वतपणे परिवर्तन करण्यात प्रत्यक्षपणे योगदान देणारी अशी शिक्षणव्यवस्था निर्माण करणे हे आहे. धोरणात असे संकल्पित आहे की, आपल्या शिक्षणसंस्थाचा अभ्यासक्रम आणि शिक्षणपध्दत विद्यार्थामध्ये मूलभूत कर्तव्ये आणि घटनात्मक मूल्यांविषयी तीव्र आदर, स्वत:च्या देशाशी दृढ नाते आणि बदलत्या जगातील स्वत:च्या भूमिका आणि जबाबदाऱ्याविषयी जाणीवपूर्ण जागरूकता निर्माण करणारे असायला हवेत. या धोरणाची दूरदृष्टी व्यवहारात, बुध्दीमध्ये आणि कृतीमध्येदेखील रूजवणे, तसेच मानवी हक्क, शाश्वत विकास आणि जीवनमान यांच्याशी जबाबदारीपूर्ण बांधिलकीचे समर्थन करणारे ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि स्वभाव विकसित करणे, जेणेकरून ते खऱ्या अर्थाने एक वैश्विक नागरिक बनतील.

## संदर्भ ग्रंथ–

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० – प्रा. डॉ. भालबा विभुते
राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० – शालेय शिक्षण मराठी सारांश
राष्ट्रीय शिक्षा निती २०२० – अजित प्रकाशन
Google – राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० – भारत सरकार

❖❖❖

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांची भूमिका

डॉ. दिनकर संतुकराव कळंबे
प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख
मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
भोकरदन, ता. भोकरदन, जि. जालना – ४३११४, महाराष्ट्र (India)
E-mail : kalambedinakar@gmail.com Mob : 9422219593

## गोषवारा :

मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी, समाज आणि न्याय समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. १९६८ मध्ये देशाचे पहिले शैक्षणिक धोरण मांडण्यात आले. हे शैक्षणिक धोरण १९६४ च्या कोठारी आयोगाच्या शिफारशीवर आधारीत होते. यामध्ये प्रथम भाषा मातृभाषा, द्वितीय भाषा राष्ट्रभाषा (हिंदी) तृतीय भाषा म्हणून इंग्रजीचा स्वीकार करण्यात आला होता. साधारणपणे याच शिफारशींवर आधारित १९८६ मध्ये दुसरे शैक्षणिक धोरण राजीव गांधी सरकारने मांडले. या धोरणामध्ये विशेषत: भारतीय महिला, अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती समुदायांसाठी असमानता दूर करण्यासाठी आणि शैक्षणिक संधी समान करण्यावर विशेष भर दिला गेला. या धोरणांमध्ये १९९२ च्या नरसिंहराव सरकारने बदल सुचविला आणि काही सुधारणा करण्यात आल्या.

भारतीय राज्यघटनेच्या राज्य धोरणाची दिशादर्शक तत्त्वे च्या भाग – ४, कलम ४५ आणि ३९ (एफ) मध्ये राज्य मान्य आणि सर्वांना न्याय व प्रवेश योग्य शिक्षणाची तरतूद आहे. १९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरुस्ती कायद्याने शिक्षणास राज्य यादीतून समवर्ती यादीमध्ये स्थानांतरित केले गेले.

२००२ मधील ८६ व्या घटनादुरुस्तीने मुलभूत अधिकारांच्या कलम–२१–ए अंतर्गत शिक्षणाला अंमलबजावणीचा हक्क बनविला. ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी राईट टू एज्युकेशन (आर टी ई) २००९ लागू करण्यात आले आहे. २०१५ मध्ये स्मृती इराणी मनुष्यबळ विकास मंत्री होत्या. त्यांनी नव्या शैक्षणिक सुधारणा मान्य करण्याच्या दृष्टीकोनातून ऑक्टोबर २०१६ मध्ये धोरण मांडले. या धोरण निर्मितीचे प्रमुख टी.एस.आर. सुब्रमण्यम होते. मात्र हे धोरण मंजूर होउ शकले नाही. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० साठी पुन्हा दुसरा प्रयत्न इस्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली समिती बनवून करण्यात आला.

बीजशब्द : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शिक्षक–विद्यार्थी

## संशोधनाची वैशिष्ट्ये :

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अभ्यासणे, त्यांचे स्वरुप व व्याप्तीचे ज्ञान विद्यार्थ्यांना माहिती करुन देणे.
२. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणाचा आकृतीबंध कसा असेल याविषयीचा अभ्यास करणे.
३. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा सविस्तर अभ्यास नवीन पिढीला माहिती करुन देणे.

## संशोधन पद्धत :

संशोधकाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – शिक्षक आणि विद्यार्थी यांची भूमिका हा शोधनिबंध लिहित असताना वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला आहे. त्यात प्राथमिक साधनात विविध शैक्षणिक आयोगांच्या अहवालाचा उपयोग केला आहे तर द्वितीय साधनात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा अहवाल हा जनतेसमोर ठेवून त्यावर ज्या शिफारशी व चर्चा झाल्या त्या वर्तमानपत्रांच्या बातम्या व विविध मासिकातून आलेल्या चर्चांचा वापर करण्यात आला.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० :

भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता शास्त्रीय प्रगती, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन या क्षेत्रांमध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्त्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देणे महत्त्वाचे आहे. व्यक्ती, समाज, देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधनांचा पूरेपूर वापर करण्याकरता उच्च दर्जाचे सार्वभौमिक शिक्षण हा भविष्यासाठी सर्वात चांगला मार्ग आहे. पुढील दशकात जगातील सर्वात मोठी युवकांची लोकसंख्या भारतात असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या संधी पुरवण्याच्या आपल्या क्षमतेवर आपल्या देशाचे भवितव्य ठरेल.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे २१ व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे आणि या धोरणाचे ध्येय आपल्या देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकतांवर उपाययोजना करणे हे आहे. या धोरणांमध्ये २१ व्या शतकातील शिक्षणाच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांशी सुसंगत अशी नवीन प्रणाली तयार करण्यासाठी, भारताच्या परंपरा आणि मूल्ये यावर भर देऊन शैक्षणिक रचनेचे नियमन आणि व्यवस्थापन यासह या रचनेच्या सर्व पैलूंमध्ये बदल आणि सुधारणा प्रस्तावित आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण विशेषत: प्रत्येक व्यक्तीच्या सृजन क्षमतेच्या विकासावर जास्त भर देते. शिक्षणाने केवळ आकलन क्षमता विकसित केल्या पाहिजेत असे नाही तर साक्षरता आणि संख्याज्ञान या मुलभूत क्षमता आणि उच्च दर्जाच्या तार्किक आणि समस्या निराकरण क्षमताच नव्हे तर सामाजिक, नैतिक आणि भावनिक क्षमतांचा विकाससुद्धा केला पाहिजे.

राष्ट्रीय शिक्षण आयोगाचे अध्यक्ष हे पंतप्रधान असतीत त्यांच्याच अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग किंवा नॅशनल एज्युकेशन कमिशनची स्थापना करण्यात येईल. हा आयोग भारतातील दूरदृष्टीचा परिक्षक असेल. नवीन शिक्षण प्रणाली ही ५+३+३+४ रचनेनुसार असेल. ही रचना अनुक्रमे ३–८, ८–११, ११–१४ आणि १४–१८ वर्षे वयोगटातील रचनेने असणार आहे.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची तत्त्वे :

या शिक्षण व्यवस्थेचा हेतू तार्किक विचार आणि कृती करण्यासाठी सक्षम असलेल्या आणि करुणा, सहानुभूती धैर्य आणि चिकाटी विज्ञानाधिष्ठित कल व रचनात्मक कल्पनाशक्ती नैतिक बांधिलकी आणि मूल्ये असलेल्या चांगल्या व्यक्ती विकसित करणे असा आहे. याचा उद्देश आपल्या घटनेद्वारे परिकल्पित न्याय सर्वसमावेशक आणि बहुलतावादी समाजाच्या निर्मितीत सहभाग घेणारे, कार्यक्षम आणि चांगल्या प्रकारे योगदान देणारे नागरिक तयार करणे.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरही शैक्षणिक प्रश्नांचा अभ्यास करुन योगय शिफारशी करण्याच्या संदर्भात .अनेक आयोग गठीत करण्यात आले आहेत. त्यातील काही आयोगांचा उल्लेख आपणास येथे करता येईल. महत्त्वपूर्ण आयोगाच्या शिफारशी संदर्भात काही आयोगाचा आढावा आपण घेऊ. त्यामध्ये प्रामुख्याने भारतीय शिक्षण आयोग (१९०२), कलकत्ता विद्यापीठ आयोग (१९१७), डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण आयोग (१९४८), मुरलियार आयोग (१९५२), कोठारी आयोग (१९६४–६६), डी.पी. चट्टोपाध्याय आयोग (१९८३) इत्यादी आयोगांनी आपले महत्त्वपूर्ण अहवाल सादर केले आहेत.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि शिक्षक :

शिक्षक खऱ्या अर्थाने आपल्या मुलांचे अस्तित्त्व घडवितात आणि म्हणून आपल्या राष्ट्राचेही भवितव्य घडवतात. शिक्षकांच्या उदात्त योगदानामुळेच भारतीय समाजात शिक्षक हे सर्वाधिक आदरास पात्र होते. सर्वोत्कृष्ट आणि सर्वाधिक शिकलेल्या व्यक्तिच केवळ शिक्षक बनत असत. शिक्षक किंवा गुरुंना त्यांचे ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे शिकविण्यासाठी जे काही आवश्यक असेल ते समाज त्यांना पुरवत असे.

## प्रेरित, उत्साही आणि सक्षम शिक्षक :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्पष्टपणे परिभाषित, स्वतंत्र, पारदर्शक भरती, अभ्यासक्रम / अध्यायन शास्त्र डिझाईन करण्याचे स्वातंत्र्य, उत्कृष्टतेला चालना देणे, शिक्षकांना संघटनात्मक नेतृत्वात जाण्यासाठी प्रेरणा देणारे, उत्साही आणि सक्षम बनविण्याची शिफारस करते. मूलभूत नियमांचे पालन करण्यात यावे.

## शिक्षकांचे शिक्षण :

शिक्षक घडविण्यासाठी एक नवीन आणि सर्वसमावेशक राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात येऊन शिक्षकांना नवनवीन व स्पर्धेच्या युगात टिकण्यासारखे शिक्षण व प्रशिक्षण देऊन त्यांना तयार करण्यात येईल. शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत सुधारणांच्या केंद्रस्थानी शिक्षक असला पाहिजे. नवीन शिक्षण धोरणाने शिक्षकाला सर्व पातळ्यांवर आपला समाजातील सर्वात आदरणीय व आवश्यक सदस्य म्हणून पुनर्स्थापित करण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे. कारण तो खरोखर आपल्या नागरिकांच्या पुढील पीढीला आकार देतो. शिक्षकांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांनी आपले काम शक्य तितक्या प्रभावीपणे करावे म्हणून या शैक्षणिक धोरणात शक्य त्या सर्व गोष्टी केल्या पाहिजे तसेच सर्वत्तोम आणि बुध्दीमान व्यक्तींना सर्व पातळीवर शिक्षकी पेशात सामावून घेण्यासाठी त्यांना सर्वतोपरी मदत केली पाहिजे. त्यासाठी त्यांची उपजिवीका, आदर, सम्मान आणि स्वायत्तता या सर्व गोष्टी सुनिश्चित करुन शिक्षण व्यवस्थेमध्ये गुणवत्ता नियंत्रणाच्या मुलभूत पद्धती आणि दायित्व या गोष्टी स्थापित केल्या पाहिजेत. शिक्षण संस्थेच्या यशाचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षकांची गुणवत्ता आणि त्यांचा सहभाग. शिक्षणाची उद्दीष्ट्ये साध्य करण्यात शिक्षकांची निर्णायक भूमीका असल्याची दखल घेऊन, त्यांच्या मदतीची आणि करिअर प्रगतिची व्यवस्था लावण्यासाठी आणि शिक्षकांच्या नियुक्तीमध्ये विविध गटांना योग्य प्रतिनिधीत्व मिळवून देण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणात विविध उपक्रम राबवले जात असून सार्वजनिक संस्थामधील कायमस्वरूपी शिक्षकांच्या मानधनाची पातळीही मोठ्या प्रमाणात वाढवली आहे. शिक्षकांना व्यावसायिक विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेनेही विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. अध्यापन कर्तव्याच्या बाबतीत अतिरेक देखील केला जाणार नाही आणि विद्यार्थी शिक्षकांचे गुणोत्तर खूप जास्त असणार नाही. जेणेकरून अध्यापनाची प्रक्रिया आनंददायी राहिल आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी संशोधन करण्यासाठी आणि इतर उपक्रमांसाठी त्यांना पुरेसा वेळ मिळेल. शिक्षकांना पाठ्यपुस्तके आणि वाचन सामूग्री निवडण्याचे व मूल्यांकन यांसह मंजूर चौकटीत राहून त्यांच्या स्वत:च्या अभ्यासक्रमाच्या आणि अध्यापन शास्त्रीय दृष्टीकोनांची रचना करण्याचे स्वातंत्र देण्यात येईल. शिक्षकांना, स्वत:ला योग्य वाटेल अशा नाविन्यपूर्ण पद्धतीने अध्यापन, संशोधन आणि सेवा करण्याचे अधिकार देणे, ही बाब खऱ्या अर्थाने उत्कृष्ट आणि कल्पक काम करण्यासाठी प्रेरक व सक्षम करणारी बाब आहे.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विद्यार्थी :

विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेतील प्रमुख हितसंबंधी घटक आहे. उच्च गुणवत्तेच्या अध्यापन अध्ययन प्रक्रियेसाठी उत्साही कॅम्पस असणे आवश्यक आहे. याबाबतीत, विद्यार्थ्यांनी क्रिडा, सांस्कृतिक, कला, पर्यावरण, ॲक्टीव्हीटी, समाजसेवा इत्यादी मध्ये सहभागी होण्याच्या भरपूर संधी दिल्या जातील. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वसतीग्रहासारख्या आवश्यक त्या सुविधा पुरवण्याकरता एक पध्दतशिर व्यवस्था निर्माण केली जाईल.

विद्यार्थ्यांना आपल्या वैयक्तीक अभ्यासक्रमाची निवड करताना त्यात वेगवेगळे पर्याय निवडण्याची मुभा असणे गरजेचे असले तरि, आजकालच्या वेगाने बदलणाऱ्या जगात एक चांगली, यशस्वी, नाविन्यपूर्ण बदलांशी जुळवून घेणारी आणि निर्माणक्षम व्यक्ती होण्यासाठी, सर्व विद्यार्थ्यांनी काही विशिष्ट विषय, कौशल्ये आणि क्षमता शिकणे आवश्यक आहे. वैज्ञानिक वृत्ती आणि पुराव्याधिष्ठीत विचारसरणी, कल्पकता आणि नाविन्यपूर्णता, सौंदर्यशास्त्र आणि कलेची समज, मौखिक आणि लेखी संवाद साधण्यानी कला, स्वास्थ आणि पोषण, व्यावसायिक अनुभव आणि कौशल्ये, डिजिटल ज्ञान आणि कोडींग आणि संगणकीय विचार अशा विविधांगी व कौशल्यावर आधारित शिक्षणाचा समावेश करण्यात आला आहे.

## नवीन शैक्षणिक धोरण आणि काही आव्हाने :

सध्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजाणीने जरी जोर धरलेला असला तरीही ते पूर्णत्वाला जाण्याच्या मार्गावर अनंत आव्हाने आहेत. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविधता आणि आकार लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी हे एक अवघड काम; असणार आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणांची अंमलबजावानी देशांच्या, राज्यांच्या सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून आहे. भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निधीची कमतरता आहे व नवीन कल्पना आणि वाढीच्या क्षमतेस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकुल वातावरण आहे असे के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने निदर्शनास आणून दिले आहे. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे धोरण मुख्यत्वे केंद्र आणि राज्यांमधील सहकार्यावर अवलंबून असणार आहे. या धोरणाचा मसुदा केंद्र सरकारने राज्य

सरकारांसह विविध भागधारकांच्या योगदानातून तयार केला असला तरी त्याची अंमलबजावणी मुख्यत्वे राज्यांच्या सक्रिय सहकार्यावर अवलंबून आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बहुतांश सेवांवर आधारित शैक्षणिक उपक्रम राज्य सरकारांकडून चालवले जातात.

चौथी महत्त्वाची बाब म्हणजे या धोरणाच्या दृष्टीने खाजगी क्षेत्राची भूमीका महत्त्वाची ठरणार आहे. भारतातील जवळपास ७० टक्के उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था या खाजगी आहेत. या धोरणाच्या प्रक्रियेसाठी खाजगी क्षेत्राचे योगदान मिळविणे व यातील एक महत्त्वाचा भागीदार म्हणून खाजगी क्षेत्राच्या योगदानाला मान्यता देणे ही एक महत्त्वाची बाब आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विविध उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी येत्या दशकात पुरेल अशा संसाधनांची गरज लागणार आहे. या संदर्भात या धोरणात म्हटल्याप्रमाणे नव्या धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाला शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्क्यापर्यंत वाढवावा लागेल. भूतकाळात देण्यात आलेली आश्वासने आणि त्यांची प्रत्यक्ष पूर्तता यांचा विचार केल्यास हे नक्कीच कठिण काम आहे.

नवे शैक्षणिक धोरण २०२० नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे. नव्या युगातील नवी आव्हाने लक्षात घेता विविध शैक्षणिक गरजा, संरचनात्मक असमानता आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यामध्ये येणाऱ्या समस्याचे निराकरण हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षण व्यवस्थेतील अनेक संकटांना तोंड देण्याचे सर्वात आव्हानात्मक कार्यही या धोरणाद्वारे पूर्ण करायचे आहे. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमजबजावणी काही राज्यांनी केली आहे तर काही राज्ये त्या प्रक्रियेतून जात आहेत तरीही अजून लांबचा पल्ला गाठायचा आहे.

राज्य, जिल्हा, तालूका पातळीवरील विविध भागधारकांना तसेच खाजगी क्षेत्राला या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेणे हे एक अवघड काम आहे. सोबतच समता, आर्थिक संसाधने तसेच नवीन कल्पना निर्मितीसाठीच्या अनुकूल वातावरणाची कमतरता ही आव्हानेही समोर आहेत. परंतु या सर्वांमध्ये विविध राज्यांमध्ये जनमत तयार करणे हे सर्वात कठिण काम आहे. थोडक्यात सांगायचे तर नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे यश सहकारी संघराज्य प्रणाली व सुधारणांमध्ये योगदान देण्याची राज्यांची क्षमता यांवर अवलंबून आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे यश सहकारी संघराज्य प्रणाली व सुधारणांमध्ये योगदान देण्याची राज्यांची क्षमता यांवर अवलंबून आहे.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील आव्हानांवर मात करण्यासाठी काही उपाययोजना :

१. उच्च शैक्षणिक व्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करणे, ज्यात प्रत्येक जिल्ह्यात किंवा जवळपास किमान एक मोठे बहुशाखीव विद्यापीठ आणि महाविद्यालयाचा समावेश असेल आणि त्यात शिकविण्याचे माध्यम स्थानिक/भारतीय भाषा असेल.

२. अधिक बहुशाखीय पदवीपूर्व शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणे.

३. अध्यापकीय आणि संस्थात्मक स्वायत्ततेच्या दिशेने वाटचाल.

४. विद्यार्थ्यांना अधिक चांगला अनुभव मिळण्यासाठी अभ्यासक्रम अध्यापनशास्त्र, मूल्यांकन आणि विद्यार्थी साहाय्य यामध्ये सुधारणा करणे.

५. अध्यापन, संशोधन आणि सेवा यांवर आधारित नेमणूक आणि करिअर प्रगतीद्वारे शिक्षकांच्या आणि संस्थात्मक नेतृत्वाच्या सचोटीची पूष्टी करणे.

६. अध्यापक आणि संशोधकांना त्यांच्या संशोधन कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य करणे आणि विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये संशोधन रूजवण्यासाठी राष्ट्रीय संशोधन संस्थेची स्थापना करणे.

७. उच्च शिक्षणासाठी एकाच नियमाद्वारे सुलभ पण परिणामकारक नियम.

८. सार्वजनिक शिक्षणाच्या संधी वेगवेगळ्या उपायांद्वारे अधिक उपलब्धता, समानता आणि सर्वसमावेशकता, उपेक्षित व वंचितांसाठी खाजगी/धर्मादाय विद्यापीठांद्वारे शिष्यवृत्या, ऑनलाईन शिक्षण व मुक्त दुरस्थ शिक्षण आणि सर्व पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

## समारोप :

कोणत्याही शैक्षणिक धोरणाचा प्रभावीपणा त्याच्या अंमलबजावणीवर अवलंबून असतो. शिक्षणाच्या व्यापारीकरणाची समस्या या धोरणात अनेक समर्पक आघाड्यांवर हाताळली आहे. आर्थिक व्यवहार, कार्यपद्धती, प्रदान केलेले अभ्यासक्रम व कार्यक्रम आणि शैक्षणिक निकालांचे संपूर्ण सार्वजनिक स्वयंप्रकाशित अनिवार्य करणारा सुलभपण परिणामकारक नियामक दृष्टिकोन, सार्वजनिक शिक्षणात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणि सार्वजनिक व खाजगी सर्व संस्थांच्या चांगल्या प्रशासनासाठी यंत्रणा त्याचप्रमाणे, गरजू किंवा पात्र घटकांवर परिणाम होऊ न देता अधिकाधिक खर्चावर पुनर्लाभ मिळविण्याच्या संधी देखील शोधल्या जातील. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे. हे गंभीर विचार, अनुभवात्मक शिक्षण परस्परवादी वर्ग, एकात्मिक अध्यापन शास्त्र आणि सक्षमतेवर आधारित शिक्षणावर लक्ष केंद्रीत करते. सर्वसमावेशक डिजिटल शिक्षण हे धोरणाचा एक मजबूत घटक आहे. जर शिक्षण व्यवस्थेत गुंतवणूक केली गेली आणि धोरणात नमूद केलेल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सर्व राज्यांनी सहकार्य केले तर भारत आपल्या तरूण लोकसंख्येचा फायदा घेऊ शकेल. सशक्त शिक्षण प्रणालीद्वारे भारत स्वत:ला प्रस्थापित करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलेल. एक ज्ञान महासत्ता संपूर्ण मानवी क्षमता प्राप्त करण्यासाठी, न्याय आणि न्याय्य समाजाच्या विकासासाठी आणि राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण ही मूलभूत आवश्यकता आहे.

संपूर्ण जग ज्ञानाच्या क्षेत्रात झपाट्याने बदल करत आहे. कोणत्याही समाजाच्या आणि देशाच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षण हा एक अत्यावश्यक आणि अपरिहार्य घटक आहे आणि ही गरज पूर्ण करण्यासाठी राष्ट्राने सर्वसमावेशक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार केले आहे. भारत सरकारने मंजूर केलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हा या दिशेने एक महत्त्वाचा उपक्रम आहे. त्याची अंमलबजावणी कशी होते यावर नव्या शैक्षणिक धोरणाचे यश अवलंबून असेल. त्यामुळे असे म्हणता येईल की, भारत हा सर्वात तरूण लोकसंख्या असलेला देश आहे आणि या तरूणांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यावर भारताचे भवितव्य अवलंबून असेल.

## संदर्भ :

१. राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२०, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार

२. राष्ट्रीय शिक्षा नीति – २०२०, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार.

३. National Educational Policy – 2022 शिक्षण मंत्रालय, भारत सरकार.

४. नवीन शैक्षणिक धोरण २०२० प्रा. डॉ. सुखदेव थोरात, अनुवाद, राज्यक्रांती वलसे / मारोती तेगमपुरे.हरिती पब्लिकेशन, पुणे – २०२२,

५. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आम्ही भारताचे लोक कुठे? – डॉ. मारोती तेगमपुरे, प्रा. राज्यक्रांती वलसे, शब्द वेध बुक हाऊस, औरंगाबाद.

❖❖❖

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२२ आणि त्याची उच्च शिक्षणातील गुणवत्तेबाबतची उत्प्रेरकीय भूमिका

प्रा.डॉ. दिनेश रामराव हंगे
मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविदयालय, भोकरदन
ता. भोकरदन, जि. जालना, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ८३७८९१०७४७

## उदिष्टे :–

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची पार्श्वभूमी,आवश्यकता अभ्यासणे.
२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे स्वरूप अभ्यासणे.
३. NEP- 2020 तील मुल्यांकन मानकांचा आढावा घेणे.
४. NEP- 2020 तील धोरणांचे विश्लेषण करून महत्त्व सांगणे व मुल्यमापन करणे.

## प्रस्तावना :–

भारतात एकविसाव्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण म्हणून NEP- 2020 ला ओळखण्यात येते.यापुर्वी ३४ वर्ष NEP-1986 या धोरणाअंतर्गत अमंलबजावणी होत होती मात्र २१ व्या शतकात शैक्षणिक क्षेत्रात गतीने होणारा बदल व आव्हाने याचा मुकाबला करण्यासाठी जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी आणि उच्च शिक्षणाची गुणवत्ता, दर्जा,स्तर वाढविण्यासाठी NEP- 2020 हे शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे.

उत्प्रेरक हा प्रत्यक्ष प्रक्रियेत सहभाग घेत नाही मात्र असे असले तरीही जी प्रक्रिया घडत आहे त्या प्रक्रियेचा वेग वाढविण्याचे सामर्थ उत्प्रेरकात असते. प्रवेश,समानता,गुणवत्ता क्षमतांचा विकास आणि उत्तरदायित्व या मुलभुत स्तंभावर आधारित ‘‘हे शैक्षणिक धोरण आहे. हे धोरण शाश्वत विकासासाठी 2035 च्या अजेंडाशी संरेखित आहे.”[१] महाविदयालयीन आणि शालेय शिक्षण अधिक समग्र लवचिक, बहुविदयाशाखीय, २१व्या शतकाच्या गरजांना अनुकूल बनवून भारताकरिता एक विव्दान समाज आणि जागतिक महासत्ता बनविणे हे या धोरणाचे उदिष्टय असेल. या दृष्टीने प्रत्येक विदयार्थ्याचि अव्दितीय क्षमता विकसित करण्याच्या उद्‌देशाने आणि कौशल्य विकासाकरीता NEP- 2020 हे धोरण तयार करण्यात आले आहे.

## पार्श्वभूमी :–

नवीन शतकातील नविन शैक्षणिक धोरण तयार करण्याची प्रक्रिया अनेक दशकापासून सुरू होती. प्रारंभी १९८६ मध्ये एक धोरण तयार करण्यात आले ते १९९२ मध्ये सुधारित करण्यात आले हे धोरण बनवून ३ दशकाहून अधिक काळ लोटला आहे.या काळात समाज आणि जगाच्या अर्थव्यवस्थेत अनेक बदल झाले आहे. हे लक्षात घेवून २१ व्या शतकातील मागण्या,गरजा आणि आव्हानास सामोरे जाण्यासाठी शिक्षण क्षेत्राकडून नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० तयार करण्यात आली व हे शैक्षणिक धोरण लागू करण्यात आले. NEP- 2020 तयार करतांना अनेक शिक्षण तज्ञांची मते, अभिप्राय अनुभव व सल्ला मसलत करून एका राष्ट्राकरिता एक धोरण तयार करण्यात आले व त्याव्दारे एक सर्वसमावेशक, सहभागात्मक, सर्वांगिणदृष्टीकोन स्विकारला जाउन हे लागू करण्यात आले आहे. तसेच महाविदयालये टप्या टप्याने स्वायत्त शिक्षण संस्था होतील असे ठरविण्यात आले.

NEP- 2020 धोरणांकरिता जानेवारी २०१५ पासून धोरण निर्मिती पक्रिया गतिमान करण्याचा निर्णय झाला त्या प्रमाणे मानव संसाधन विकास मंत्रालयाने केंद्र सरकार सोबत उच्च स्तरिय बैठक बोलवली. फेब्रुवारी मार्च २०१५ मध्ये राज्य शिक्षण मंडळ आणि सचिव यांची बैठक पार पडली २०१६ मध्ये कै.श्री टी.आर.एस सुब्रम्हण्यम यांच्या समितीने मंत्रालयात अहवाल सादर केला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१६ च्या मुसुदयावरील काही महिती संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात आली. दिनांक २४/०६/२०१७ रोजी डॉ.के.कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक धोरण मसुदा तयार करण्यात आला. समितीने ३१/०५/२०१९ रोजी आपला अहवाल मंत्रालयाला सुपुर्द केला. NEP-2019या मसुदयावर सूचना मागविण्यात आल्या ऑगष्ट/सटेंबर/नोव्हेंबर २०१९ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण

विभागाचे सचिव ACBE(CK) ची विशेष बैठक आणि मानव संसाधन विकास मंत्रालयाचे स्थायी सदस्यांची बैठक आयोजीत करण्यात येवून त्यानंतर NEP- 2020 लागू करण्यात आले.[२]

NEP- 2020अनुसार शिक्षण देणाऱ्या संस्था व शिक्षक, प्राध्यापक व विदयार्थी यांच्या शिक्षण पध्दतीत आमुलाग्र पुर्नरचना व सर्वाकरीता समान संधी देण्यात आलेली आहे. भारतीय संविधानात नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक मुलासाठी वयाच्या १४ वर्षापर्यंत सक्तिचे शिक्षण देण्याची तरतुद करण्यात आली आहे.सुधारित प्रशिक्षण देणे, शिक्षकांची पात्रता सुधारणे,व प्रत्येक विदयार्थ्याच्या सृजन क्षमतेच्या विकासावर भर दिला आहे तर प्राचीन भारतीय संस्कृतीतील चरक,सुश्रुत, आर्यभटट् ,भास्कराचार्य , चाणक्य, माधव, पतंजली, पाणिनी आणि तिरूवल्लूवर इत्यादी विव्दांनाच्या विचार कार्याचे अध्ययन व संशोधन करण्याची तरतुद करण्यात आली आहे. विशेषत: शिक्षक प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांची भरती एका मजबुत पारदर्शक प्रक्रियेव्दारे केली जाईल.पदोन्नती गुणवत्तेवर आधारीत असतील ज्यामध्ये बहुस्त्रोत नियतकालिक प्रदर्शन, वॉलपेपर, मुल्यमापन यांचा समावेश केलेला आहे.शिक्षको के लिए कार्यकाल, अवधि या वरिष्ठता के बजाय सिर्फ निर्धारित मानकों के आधार पर पदोन्नती और वेतनमे वृध्दि होंगी.[३]

NCERT, SCERT तील शिक्षक आणि तज्ञ यांच्याशी सल्लमसलत करून NEP- 2020 तयार करण्यात आली आहे.शिक्षण व्यवस्था मे किये जा रहे बुनियादी बदलावों के केंद्र मे अवश्य शिक्षक होने चाहिए.[४] २०२० प्रर्यंत शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानक NPST विकसित करण्याची तरतुद केलेली आहे. अंगणवाडी शिक्षिकांना ECCE अध्यापनशास्त्र अभासक्रमात प्रशिक्षित केले जात आहे. ५ वी ते ८ वी पर्यंतच्या विदयार्थ्यांना शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषा, स्थानिक भाषा, प्रादेशिक भाषा यावर जोर देण्यात आला आहे. या बरोबरच इयत्ता ६ वी पासून व्यावसायिक शिक्षण सुरू होत असून त्यात इंटर्नशिपचा समावेश करण्यात आला आहे. शालेय शिक्षणासाठी एक नविन व्यापक राष्ट्रीय अभासक्रम फ्रेमवर्क NEFSE 2020 -21 NCERT द्वारे विकसित करण्यात येईल. तसेच 10 वी 12 वी बोर्डची पुनरर्चना केली जाईल.जी PARKH नावाने सुरू करण्यात येईल व जी मानक सेटिंग संस्था म्हणून कार्य करील.

## नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२२ मूल्यांकन सुधारणा :—

१. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी अंतर्गत व्यापक व बहुअनुशासनात्मक, लवचिक अभ्यासक्रमासह प्रवेश निर्गमन बिंदु सह पदवी शिक्षण दिले जाईल.
२. UG एज्युकेशन मध्ये उदाहरणार्थ १ वर्षानंतर प्रमाणपत्र, २ वर्षानंतर प्रगत डिप्लोमा, ३ वर्षांनी संशोधनासह बॅचलर होता येईल.
३. वेगवेगळया HEI मधुन मिळवलेली शैक्षणिक क्रेडिट डिजिटली साठविण्यासाठी एक शैक्षणिक बॅक क्रेडिट ची स्थापना केली जाईल. DG Locker उघडले जाईल. जेणेकरून ते मिळविलेल्या अंतिम पदवीमध्ये मोजले जातील.
४. JITS व IIM सह बहुविदयाशाखीय शिक्षण आणि संशोधन विदयापिठे MERUS देशातील सवौत्तम जागतिक दर्जाच्या बहुविदयाशाखिय शिक्षणाचे मॉडल म्हणून स्थापन केली जातील.
५. तसचे महाविदयालयीन UG विदयार्थ्याकरीता Choice Based Credit System & Policy (CBCSP) लागू करण्यात आली आहे.
६. ''नॅशनल एज्युकेशन पॉलीसी २०२० अतर्गत जो GER वर्ष २०१८ मध्ये २६.३% होता तो २०३५ पर्यंत ५०% पर्यंत वाढविण्याचे उदिष्टय ठेवण्यात आले आहे.''(५)
७. ''भारतात शिक्षणावरील सर्व यार्च GDP खर्च ४.४३% आहे.(खर्च २०१७—२०१८ अंर्थसंकलित विश्लेषन)जो वाढवून GDP च्या ६% वाढविण्याचे उदिष्टे ठरविण्यात आलेले आह''(६)
८. नॅशनल एजुकेशन पॉलिसी अंतर्गत नियमन पदधत खालीलप्रमाणे असेल ती म्हणजे भारतीय उच्च शिक्षण आयेग (HCEI) हि संस्था वैदयकीय व कायदा शिक्षण वगळता सर्व उच्च शिक्षणासाठी एकच व्यापक संस्था म्हणुन स्थापन केली जाईल.
९. HCEI कडे स्वतंत्र NHRC मानक सेटिंगसाठी सामान्य शिक्षण परीषद GEC निधीसाठी उच्च शिक्षण अनुदान परिषद HEGC आणि मान्यतेसाठी राष्ट्रीय मुल्यांकन आणि प्रत्यायन परिषदेची (NACC) तरतुद करण्यात आलेली आहे.

## महत्व :–

१. NEP- 2020eध्ये अंगणवाडी शिक्षण १ ली ते ५ वी चे शिक्षण ६ वी चे शिक्षण, १० वी ते १२ वी बोर्डाचे शिक्षण व उच्च शिचण पध्दती यात मुलभूत इष्ट परिवर्तन करण्यात आलेले आहेत.
२. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढावा, शिक्षकाचा दर्जा वाढावा त्यांचा स्तर दिवसगणिक उंच उंच होत जाउन जागतिक स्तरावरील मानकबिंदु ठरावा यासाठी महाविदयालयीन विदयार्थ्यांकरीता choice Base Credit System Policy CBCSP निश्चित करण्यात आली आहे. तसेच उच्च शिक्षणाचे आंतराष्ट्रीयकरण करणे परदेशी शिक्षण पुरविणाऱ्यांना प्रोत्साहित करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे.(७)
३. ६ वी पासून व्यावसायिक शिक्षण हे प्रशिक्षणासह देण्याची तरतूद करण्यात आली आहे.
४. विदयार्थ्यांना स्थानिक/प्रादेशिक भाषेतुन शिक्षण देण्यासह ८ वी नंतर स्वतंत्र भाषा क्षेत्राची/माध्यम म्हणून निवड करण्यात येण्याची मुभा ठेवण्यात आलेली आहे.त्याच बरोबर विदयार्थ्यांना परदेशी भाषा शिकता येणार आहे.
५. शिक्षण पध्दतीला लवचिकता प्राप्त होणार आहे जेणेकरून एकाच क्षेत्रात, एकाच भाषेची निवड करण्याची सक्ती संपुष्टात येणार आहे. त्यामुळे साचेबंद शिक्षण क्षेत्राबाहेर नवे कसदार शिक्षण मिळण्याची नामी संधी विदयार्थ्यांना मिळणार आहे.
६. HEI कडे स्वतंत्र अनुलंब असतील.
   १.नियमनासाठी–राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद NHERC
   २.मानकांसाठी– मानक सेंटिग सामान्य परिषदGEC
   ३.निधीसाठी – उच्च शिक्षण अनुदान परिषद HEGC
   ४.मान्यतेसाठी– राष्ट्रीय मुल्यांकन आणि प्रत्यायन परिषद NACC

याव्दारे एकुण शिक्षणाचे,शिक्षण पध्दतीचे, विदयापीठीय शिक्षकांचे महाविदयालयीन शिक्षकांचे, संस्थांचे मुल्यांकण करून त्यांना ग्रेड देण्यात येईल.व त्यांची सक्षमता पाहून टप्याटप्याने स्वायत्ततेचा दर्जा प्रदान केला जाईल.

## मूल्यमापन :–

एकंदरीत NEP-2020 ही भारतीय एकूण शिक्षण व्यवस्थेसाठी मुलभुत परिवर्तन सुधारणा याची नांदी आहे जेणे करून एक सर्व समावेशक सार्वत्रिक समान शिक्षण दर्जेदार कसदार शिक्षण मिळेल. शिक्षक प्राध्यापक दर्जोत स्तरात वाढ होउन ते अधिक समर्पित होउन कार्य करतील विदयार्थ्यांच्या खऱ्या गुणांना कौशल्यांना वाव मिळून आतंरराष्ट्रीय जगतात ते भारत राष्ट्राचे नाव कमावतील यात शंका नाही.

## संदर्भसूची :–


१. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२२, संपुर्ण माहीती मराठी PDF लेख, पृष्ठ क्रमांक ०३
२. NEP- 2020,संपुर्ण माहीती PDF लेख, पृष्ठ क्रमांक ३१
३. राष्ट्रीय शिक्षा निती २०२०, मानव संसाधन विकास मंत्रालय भारत सरकार, पृष्ठ क्रमांक ३५
४. कित्ता पृष्ठ क्रमांक ०५
५. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२२, संपुर्ण माहीती मराठी PDF लेख, पृष्ठ क्रमांक ०९
६. कित्ता पृष्ठ क्रमांक २४
७. कार्यकारी अहवाल, विषय चौकट,जिल्हा,राज्य,विषय–१७,उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, पृष्ठ क्रमांक –१७


❖❖❖

# नवीन शैक्षणिक धोरण आणि जनसाहित्य

**प्रा.डॉ. दिनेशचंद्र राऊत**
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय,
अमरावती, महाराष्ट्र (India), मो.नं.- ९७६४६८८१५८

## नवीन शैक्षणिक धोरण २०२० -

तब्बल ३४ वर्षानंतर आपल्या देशात 'नवीन शैक्षणिक धोरण' जाहीर करण्यात आले आहे. इस्रोचे माजी - १) प्रमुख के. कस्तुरी रांगण यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या धोरणाचा मसुदा तयार केला आहे. या शैक्षणिक धोरणातील महत्वाच्या गोष्टी कोणत्या? येणाऱ्या काळात शिक्षण पद्धतीत कोणते अमुलाग्र बद्दल होणार आहे?

## शैक्षणिक धोरणाचा इतिहास -

१) आपल्या देशात सर्वात प्रथम पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात १९६८ साली पहिले राष्ट्रीय धोरणजाहीर करण्यात आले.
२) त्यानंतर राजीव गांधी यांच्या कार्यकाळात १९८६ साली दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले.
३) त्यानंतर १९९२ मध्ये आचार्य राममूर्ती यांच्या अध्यक्षतेखालील 'राष्ट्रीय शिक्षण धोरण कृती आराखडा' समिती स्थापना करण्यात आली. या समितीने दुसऱ्या शैक्षणिक धोरणाचा आढावा घेतला व काही शिफारशी केल्या.
४) अटल बिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात सन २००२ साली ८६ वी घटना दुरुस्ती करण्यात आली.
५) त्यानंतर सन २००९ साली शिक्षण हक्क कायदा मंजूर करण्यात आला. या कायदयाची अंमलबजावणी २०१३ पासून करण्यात आली.

## नवीन शैक्षणिक धोरण २०२० वैशिष्ट्ये -

नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शालेय व उच्च शिक्षणाचारचनेत आमुलाग्र बदल करण्यात आले आहेत. शिक्षण अभ्यासक्रमांना वेगवेगळ्या शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरशाखीय आणि समन्वयी करण्यात आले आहे. याचाच सोपा अर्थ असा आहे की आता, एकाचवेळी अभियांत्रिकी व संगीत हे दोन्ही विषय घेऊनही उच्च शिक्षण पूर्ण करता येईल. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित केला जाणार असून २१ व्या शतकाआठी आवश्यक कौशल्ये प्रदान करण्याला महत्व देण्यात आले आहे.

## शालेय शिक्षणाची रचना नवीन सूत्र-

या धोरणातील तरतुदीनुसार तीन ते चौदा वर्षे वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहेत. यापूर्वी हा वयोगट ६ ते ११ वर्षे होता - शालेय शिक्षणाची रचना आता ५+३+३+४

**५ वर्षे मुलभूत (Fundamental) -** १) नर्सरी २) ज्युनिअर केजी ३) सिनिअर केजी
४) इयत्ता पहिली ५) इयत्ता दुसरी

**३ वर्षे प्रारंभिक शाळा (Precatory) -** १) इयत्ता तिसरी २) इयत्ता चौथी ३) इयत्ता पाचवी

**३ वर्षे माध्यमिक शाळा (Middle) -** १) इयत्ता सहावी २) इयत्ता सातवी ३) इयत्ता आठवी

**४ वर्षे माध्यमिक शाळा (Secondary) -** १) इयत्ता नववी २) इयत्ता दहावी ३) एफ.वायजे.सी. ४) एस. वाय. जे. सी.

**कसे दिले जाणार शिक्षण -**

वरील शिक्षणाचा नवीन सूत्रानुसार आपल्या लक्षात आलेच असेल आता अंगणवाडी हि प्राथमिक शिक्षणाला जोडली गेली आहे. वयोगट ३ ते ८ मधील शिक्षण हे मुलभूत शिक्षण समजले जाईल आणि त्यासाठी बालसुलभ शिक्षण आणि अभ्यासक्रम विकसित केला जाईल. अंगणवाडीच्या शाळा पूर्वप्राथमिकच्या शाळा प्राथमिक शाळेशी जोडण्यासाठी प्रयत्न केले जातील. ज्या ठिकाणी सध्या अस्तित्वात असलेल्या अंगणवाडी आणि पूर्वप्राथमिक शाळा नवीन अभ्यासक्रम राबविण्यात अपयशी ठरतील त्याठिकाणी सर्व सोयींनी युक्त नवीन स्वतंत्र पूर्व प्राथमिक शाळा उभारल्या जातील आणि शिक्षणाबरोबर इतर वयोगटातील मुलांच्या बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक विकासासाठी आवश्यक सुविधा निर्माण केल्या जातील.

३ ते ८ या वयोगतातील मुलांसाठी उपक्रमाधरीत खेळांच्या माध्यमातून आणि लवचिकता असलेले शिक्षण दिले जाईल. पूर्व प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुलांमध्ये मुलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यावे यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

**भाषा व्यावसायिक शिक्षण आणि मुलांचे मानसशास्त्र -**

इयत्ता सहावी नंतर तीन भाषा शिक्षणपद्धती सुरु केली जाईल. ज्यात स्थानिक भाषेला प्राधान्य दिले जाईल. ज्या प्रदेशात हिंदी बोलली जात नाही त्या प्रदेशात हिंदी भाषा शिक्षणाला प्राधान्य दिले जाईल.

व्यावसायिक शिक्षण शालेय शिक्षणात समाविष्ट केले जाईल. शाळांमध्ये असलेल्या हुशार मुलांना अपेक्षित शिक्षण मिळावे म्हणून 'राष्ट्रीय शिक्षण कार्यक्रमा' अंतर्गत आठवड्याला पाच तासांचे अतिरिक्त शिक्षण पुरविले जाईल तसेच अपेक्षित क्षमतेपेक्षा मागे असलेल्या मुलांसाठी नियमित शाळेच्या वेळेत आणि वेळेनंतरही उपाययोजनात्मक शिक्षण पुरविले जाईल. प्रत्येक विद्यार्थ्यांकडे नीट लक्ष देता यावे यासाठी विद्यार्थी शिक्षक प्रमाण ३०:०१ असे ठेवणे. वाचनाला आणि त्यातून ज्ञानवृद्धीला प्राधान्य मिळावे म्हणून संपूर्ण देशात सार्वजनिक ठिकाणी आणि शाळांमध्ये ग्रंथालय आणि वाचनकक्ष उभारले जाईल.

**आंतरशास्त्रीय शिक्षण -**

९ वी ते १२ वी एकत्र करून चार वर्षांचा कोर्स प्रस्तावित आहे ज्यात कला, वाणिज्य आणि शास्त्र असा शाखानिहाय फरक रद्द केला असून एकुण ८ सेमिस्टर चा कोर्स असेल ज्यात भाषा, गणित आणि शास्त्र हे विषय बंधनकारक करून इतर कोणतेही विषय आपल्या आवडीनुसार निवडता येईल.

**परीक्षा कशा असणार...? -**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बोर्ड परीक्षांचे महत्व कमी करण्यात आले आहे. आता बोर्ड परीक्षा फक्त १२ वी मध्ये द्यावी लागेल. तर यापूर्वी दहावीची बोर्ड परीक्षा देणे बंधनकारक होते, ते आता होणार नाही. ९ ते १२ वीच्या सत्र परीक्षा असतील. विज्ञान व कला अशा वेगळ्या शाखांतील विषय एकत्र घेवून शिकता येतील. त्यामुळे आंतरशास्त्रीय शिक्षण सुरु ठेवता येतील.

**विद्यार्थ्यांना नवीन प्रगतीपुस्तक -**

नवीन शैक्षणिक धोरणामुळे जुने प्रगतीपुस्तक फक्त गुण व शिक्षकांचे शेरे न देता स्वत:विद्यार्थी, सहविद्यार्थी व शिक्षक यांनी मुल्यमापन करावयाचे आहे. त्या आधारावर विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्यांचा विकास करता येईल.

**शिक्षक होण्यासाठी काय करावे लागणार ...? -**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बी. एड रद्द करून चार वर्षाचा इंटिग्रेटेड पदवी कोर्स सुरु करण्यात येईल. बारावीनंतर थेट या कोर्सला प्रवेश घेता येईल आणि हे शिक्षक प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्येनियुक्तीसाठी पात्र ठरतील ज्यांनी इंटिग्रेटेड बी. एड केलेले नाही ते पदवीनंतर ज्या महाविद्यालयात एक वर्षाच्या बी. एड साठी प्रवेश घेऊ शकतील.

**आता थेट पी.एच.डी -**

उच्च शिक्षणातही लवचिकता आणली गेली असून महाविद्यालये तसेच विद्यापीठांमध्येही आंतरशाखीय विषय एकत्र शिकता येतील. कुठेल्याही शिक्षण थांबवता येईल. त्या शिक्षणाचे गुणांक राखून ठेवले जातील व काही काळाने पुढील शिक्षण घेता येईल. ज्या विद्यार्थ्यांना संशोधन करायचे असेल. त्याच्यासाठी चार वर्षांचा अभ्यासक्रम असेल त्यानंतर एम. फील करण्याची गरज उरणार नाही. थेट पी. एच. डी साठी प्रवेश घेता येईल.

**आता एकच नियामक मंडळ -**

हा एक मोठा निर्णय नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात घेण्यात आला आहे. सध्या उच्च शिक्षणातील विविध अभ्यासक्रमांसाठी वेगवेगळ्या नियामक संस्था कार्यरत आहे, त्याऐवजी एकच नियामक मंडळ सेल. अमेरिकेप्रमाणे भारतातही ही संशोधकाला महत्व देणे व त्याचा दर्जा सुधारण्यासाठी राष्ट्रीय संशोधक संस्था स्थापन केली जाईल. केवळ विज्ञानच नव्हे तर समाजशास्त्रातील संशोधनालाही वित्तिय मदत केली जाईल. देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला जाईल. त्यातून परदेशी दर्जेदार शिक्षण संस्थांतील विद्यार्थ्यांची संवाद वाढेल व शैक्षणिक देवानघेवानही होऊ शकेल. यामुळे सुसंगत शिकणपद्धती अस्तित्वात येणार आहे.

**शिक्षणासाठी वित्तपुरवठा -**

शैक्षणिक क्षेत्रामध्ये सार्वजनिक गुंतवणूक वृद्धीसाठी केंद्र आणि राज्य सरकारे एकत्रित काम करणार आहेत. शक्य तितक्या लवकर ही गुंतवणूक जीडीपीच्या ६ टक्क्यांपर्यंत पोहोचावी असा उद्देश यामागे आहे.

**शिक्षणामध्ये तंत्रज्ञान -**

**'नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम'** म्हणजेच **'राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच'** या स्वायत्त संस्थेची निर्मिती करण्यात येणार असून यद्वारे विचारांच्या देवानघेवाणीसाठी एक व्यासपीठ - मंच उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## जनसाहित्याचा उगम -

नागपूरच्या प्रा.या.वा. वडस्कर यांनी सामान्य बहुजनवादी' अशी व्यापक भूमिका घेऊन साहित्य निर्मात्यांची संघटना बांधण्याचा व त्याद्वारे शोषित बहुजनांचा आवाज साहित्यप्रांतात बुलंद करण्याचा प्रयत्न केला. या भूमिकेसंबंधी आपली विचारसरणी व मांडणी त्यांनी प्रकट केली ती जळगाव आकाशवाणीवरील त्यांच्या भाषणांनी व पुढे १९८८ मध्ये प्रसिद्ध केली- ती 'जनसाहित्याच्या दिशेने' या लेखसंग्रहाच्या माध्यमातून प्रा.या.वा.वडस्करांचीभूमिका निखळ माणुसतत्त्वाला मान्यता देणारी नव्हती; तर कष्टकरी, श्रमिक, शोषित वर्गाला समाविष्ट करण्याइतपतच उदार होती. त्यामुळे कधी मार्क्सवादी-जनवादी तर कधीबहुजनवादी अशा दोलायमान भूमिकेतून त्यांनी 'जन' साहित्याचा विचार केलेला दिसतो. मात्र या विचाराचा सर्वांगीण विकास करीत पुढचे गौरवास्पद पाऊल उचलले ते डॉ.सुभाष सावरकर यांनी. निखळ माणूस ततत्वाचाशोधघेणारी भूमिका त्यांनी मार्च १९८४ मध्ये मांडली.या व्यापक भूमिकेचा पाठपुरावा

करण्याच्या दृष्टीतून एप्रिल १९८४ मध्ये त्यांनी अक्षरवैदर्भी' या मासिकाचा प्रारंभ केला. या मासिकातून त्यांनी जनसाहित्य विषयक लेखन सातत्याने केले; निखळ माणुसकेन्द्री ती भूमिका विकसित केली व १९९३ मध्ये 'जनसाहित्य हा समीक्षा ग्रंथ चळवळीचा लेखाजोखा या रूपात प्रसिद्ध केला.

## जनसाहित्याची संकल्पना

जनसाहित्याची संकल्पना समजून घेताना प्रथम जन म्हणजे कोण? हे समजून घ्यावे लागेल. प्रा.या.वा.वडस्कर 'जन' या शब्दाची उत्पत्ती 'गण' या शब्दातून दाखवतात. त्यांच्या मते 'गण' म्हणजे शोषणाच्या प्रक्रियेत सहभागी न होणारा व समता, स्वातंत्र्याची पूजा करणारा लोकसमूह परंतु 'गण' हा सर्वसमावेशक व्यापक होत नाही; तर त्यात अनेक उणिवा शिल्लक राहातात. डॉ.सुभाष सावरकर मात्र हा 'जन' अतिशय सोप्या पद्धतीने व्यक्त करतात. ते म्हणतात, 'जन' म्हणजे भेदकारी उपाधिपलिकडचा निखळ माणूस असून जनतत्व म्हणजे असे निखळ माणूसपण किंवा मानवी सत्व (माणुसकी) होय.

डॉ.सुभाष सावरकर पुढे म्हणतात, 'जन ही संज्ञा विभाजनात्मक नसून साकल्यात्मक आहे. दलित, ग्रामीण, जनवादी (मार्क्सवादी), स्त्रीवादी, आदिवासी इ.च्या लक्षण-संज्ञांप्रमाणे ती केवळ विवक्षानिदर्शक (वर्णनात्मक) राहात नाही; तर साकल्यात्मकतेमुळे ती साहित्यमूल्यात्मकही होते. सकल जनांमधील 'जनतत्त्वा'ला आवाहन करणारे व सकलजनांना जिवाभावाने जपावेसे वाटणारे असे जनहितकर, जीवनाभिमुख साहित्य म्हणजे जनसाहित्य ठरते.'

थोडक्यात, जनसाहित्याचा सरळ संबंध जिवंत व प्रवाही अशा एतद्देशीय जनजीवनाशी व तत्सलग्न जाणिवांशी आहे. हा जाणिवांचा विचार पार २४ तीर्थंकर, लोकायत, उपनिषदकार व महात्मा बुद्धापासून करावा लागतो. या मार्गात विविधजननायक येतात. आधुनिक काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांपर्यंत ही श्रेयनामावली येऊन थडकते. या समस्त महामानवांनी वेळोवेळी येथील अवरोधाशी लढा दिला आणि येथील देशी संस्कृतीची अस्मिता टिकवून ठेवली अर्थात् जननिष्ठता जिवंत ठेवली.

कालौघात आपल्या संस्कृतीने आगतिकपणाने परकीय दृष्टीचा स्वीकार केला. पण आपली अस्मिता, आपली जाणीव, आपले स्वत्व टिकविण्याचा अटोकाट प्रयत्न येथील जनांनी केलेला दिसून येतो. यातूनच जनसाहित्याचे प्रयोजन आपण संस्कृतीच्या अनुरोधाने मांडू शकतो. जनसाहित्याचे प्रयोजन म्हणजे केवळ आल्हादप्राप्ती नाही. आल्हाद हा आनुषंगिक आहे. त्याच्या आहारी गेलेले, केवळ व्यापारी, राजकीय उपलब्धी हे ध्येय असलेले साहित्य आत्मघातकी ठरते आणि म्हणूनच हा भाऊसाहेब कोलते म्हणतात, 'साहित्याच्या कसोटीला उतरणारे कोणतेही साहित्य हे जनसाहित्य असते'- अर्थात् सर्वच श्रेष्ठ व कालजयी साहित्य हे जनसाहित्य असते.

ज्या वेळेसवाचकएखादी साहित्यकृती हाती घेतो, तेव्हा त्याची मानसिकता बरेचदा पूर्वग्रहदूषित असते, कारण त्याच्या जाणिवेवर विविध कलाकृतींचा प्रभाव असतो. अशा परिस्थितीत अस्सल कलाकृतीसमोरही एक आव्हान उभे ठाकले असते. जननिष्ठ आवाहन- संप्रेषण सामर्थ्याने हळुहळू हे पूर्वग्रह संपुष्टात येतात. याचाच अर्थ या नव्या साहित्यकृतीबाबत वाचकाची आस्था जागृत होण्यास त्यात उपस्थित असलेली जननिष्ठा हीच कारणीभूत ठरते. ही आस्वादकाची सर्जनशील अवस्था जनसाहित्यकृतीतील जाणिवांच्या अनुरोधाने पूर्वानुभवांची नव्याने रचना/पुनर्निर्मिती करते. येथे वाचकाच्या नेणिवेत (जाणीव) परिवर्तन घडत असते. यालाच 'जाणीव-प्रवर्तनातील जननिष्ठा' म्हणतात. या प्रकारे वाचकांद्वारे पुनर्निर्मिती झालेल्या अनुभवाची विशालत, सखोलता, प्रगाढता व जाणीवप्रवर्तनाची जननिष्ठता जोखावी लागते. जी साहित्यकृती निर्मिती,स्वरूपवआस्वाद यांत जननिष्ठ असेल, तिलाच जनसाहित्यकृतीचा दर्जा मिळतो. हा

दर्जा मिळवण्याकरिता प्रत्येक साहित्यकृतीस वरील समीक्षा सोपानास सामोरे जावे लागते आणि मगच त्या साहित्यकृतीची जननिष्ठता अर्थात् जनसाहित्य म्हणून तिचे स्थान व दर्जा निर्धारित होतो.

जनसाहित्य समीक्षेचा निकष 'जननिष्ठा' हा आहे. हे एक जीवनमूल्य आहे व साहित्यकृतीच्या संघटनेचे तत्त्वही आहे. थोडक्यात 'माणुसकीवरील अभंग निष्ठा'- असा त्याचा अर्थ आहे. मात्र शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या मानुषतेहून ते भिन्न आहे. 'मानुषता' ही भौतिक संकल्पना आहे व जनसाहित्यास अपेक्षित 'माणुसकी' मध्ये मानवाच्या नैतिक व आत्मिक विकासाचे पदर सुद्धा निहित आहेत. म्हणूनच ही संज्ञा अर्जित गुणसत्त्वाची बूज राखणारी प्रक्रिया आहे. जनसाहित्याची समीक्षा करून आपण अस्सल माणूसपण जपणाऱ्या जननिष्ठ कलाकृतींचा अभ्यास करू शकतो.

## जनसाहित्याची प्रकृती

प्रत्येक साहित्यकृतीची एक विशिष्ट प्रकृती असते. उपरोक्त परीक्षण व निरीक्षणानुसार त्या त्या प्रकृतीशी निगडित काही ठळक प्रवृत्तींचा विचार या ठिकाणी करावयाचा आहे.

जनसाहित्यातील ईश्वर विषयक कल्पना इहनिष्ठ असल्यामुळे (म्हणजेच पारलौकिक नसल्याने) जनांमध्येच ईश्वर स्थापित होतो. परिणामी सज्जनांची- विशेषतः संत महात्म्यांची पूजा करता येते वत्यांच्या गुणांचा उदो-उदो करणे विवेकसमत ठरते.

या ठिकाणी प्रयत्नवादाचा पुरस्कार करणे ही दसरी प्रवृत्ती होय.जे काही होते ते आपले नशीब, नियतीच्या हातात सर्वकाही असते, असे म्हणण्याची जी प्रवृत्ती आहे ती नाकारून पढे जाण्याची वृत्ती आपल्यात असावी. जनसाहित्य जीवन-संघर्षास वारंवार सामोरे जाण्याची वृत्ती व प्रवृत्ती वाचकमनात प्रवर्तित करते.

मानवी जीवनात सतत विविध विचारलहरी सुरू असतात. एकमेकांप्रति असणारे प्रेम, द्वेष हे साहित्यातही नजरेस पडतात. परंतुया द्वेषावर प्रेमाने सदैव मात होते. हे जनसाहित्य शिकवते.

एखादी गोष्ट अतिरेकी पद्धतीने मांडण्यापेक्षा सहजसरळ पद्धतीनेमांडून त्यातील चुकीची पद्धती मोडणे ही जनसाहित्याची प्रवृत्ती आहे.

आपण बोलण्यात एक सहज सुघट भाषा वापरतोयसाहित्यातसजवलेली किंवा अलंकारिक भाषा वापरत असतो. वस्तुतः मानवी भावभावनांचे चित्रण उत्स्फूर्त साध्या सहज भाषेतून-जनभाषेतून स्पष्टपणे होते, अशी जनसाहित्याची मान्यता आहे.

एकंदरीत, जनसाहित्याची सर्वसमावेशक संकल्पना एप्रिल १९८४ च्या 'अक्षरवैदर्भी च्या अंकात डॉ.सुभाष सावरकरांनी एकंदरीत, जनसाहित्याची परंपरा' या लेखाद्वारे मांडली असली तरी ही संकल्पना भारतीय विचारवंत व अभ्यासकांना पूर्वापर परिचित आहे. हजारो वर्षापासून ही संकल्पना भारतीय जनमानसात रुजलेली दिसते. नाट्यमहर्षी भरतमुनी, बौद्ध तत्त्वज्ञ दिग्नाग, धर्मकीर्ती, काश्मिरी शैव पंडित अभिनव गुप्त इत्यादि आचार्यापर्यंत तो धागा जाऊन पोहोचतो. त्यानंतर विविध कालखंडांतील विविध जनहितैषी विचारवंतांचे विचार आपणास दिसतात. या सर्वांच्या विचारांचे एकत्रित रसायन दिसते ते मध्ययुगीन महात्मा बसवेश्वर, महात्मा चक्रधर, संत सावता, संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत एकनाथ, संत तुकाराम या संतकवींपासून थेट आधुनिक कालखंडातील महात्मा फुले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यापर्यंत. या समस्त मान्यवरांच्या साहित्यात जनसाहित्याच्या व्यवस्था परिवर्तनक्षम प्रवृत्तींचा एकत्रित विचार आलेला दिसून येतो.

## जनसाहित्याचे वेगळेपण -

प्रचलित समस्त साहित्य प्रवाहांच्या पार्श्वभूमीवर जनसाहित्याचे वेगळेपण आपल्याला विचारात घ्यावे लागते. 'जनसाहित्यातील मूळ 'जन' ही संकल्पना आदर्शवत् आहे- व्यवहार्य नाही. उपाधिनिरपेक्ष माणूस अस्तित्वातच नाही'-असा आक्षेप त्यांवर घेतला जातो. शिवाय जनसाहित्य हे संहितारूपाने प्रत्यक्षात उपलब्धच नाही, असेही म्हटले जाते. अशा बिनबुडाच्या व अज्ञानजन्य आरोपांना उत्तर मात्र अभ्यासपूर्ण घ्यावे लागते, व तसे ते दिलेही गेले आहे. त्यातूनच आपणास जनसाहित्याचे वेगळेपण लक्षात येते.

राष्ट्रसंत संत तुकडोजी महाराजांनी त्यांच्या साहित्यातून-विशेषतः ग्रामगीतेतून समाजस्थितीचे, इतिहासाचे, धार्मिक संकल्पनांचे विश्लेषण केले. यातून स्वीकार, सामंजस्य व विज्ञाननिय ही त्रिसूत्री समाजास दिली व त्यातून परिवर्तनाचा मार्ग दाखवला. समाजातील काही अभ्यासकांना व समकालीन साहित्यिकांना तो मध्ययुगीन संतांच्या शिकवणुकीचा अतिदेश वाटला. याला त्यांनी धार्मिक कर्मकांड समजून त्याकडे दुर्लक्ष केले. परंतु जनसाहित्याच्या अभ्यासकांना मात्र त्यातले सत्च सापडलेले दिसते. त्यानुसार जनसाहित्य विधायक परिवर्तनवादी मांडणी येते. यातून निखळ मानवताधर्म, समता-बंधुता व सामाजन्याय, सामुदायिक जीवनशैली, आत्मबलसंवर्धन, सहकार भावना, विवेक-विज्ञाननिष्ठा, सर्वाभूती आत्मीयता आदि विधायक मूल्यांचे सत्त्व अधोरेखित केले गेले. या आधारे माणुसकीवरील श्रद्धा (जननिष्ठा) या जीवनमूल्यास जनसाहित्य विचारकांनी साहित्यमूल्य प्राप्त करून दिले आणि यामुळेच जनसाहित्य हे मृगजळ न ठरता समाजवास्तवाच्या इतिहासावर घट्ट पाय रोवून उभे राहाणारे साहित्य ठरते.

प्रत्येक साहित्यप्रवाह हा आपापल्या कक्षेतील सामाजिक विषमताविरोधी भूमिकेमुळे उठून दिसत असेल; पण जनसाहित्य त्यातील निखळ सत्त्व शोधत असल्याने प्रत्येक साहित्यप्रकाराच्या मुळाशी ते उपलब्धअसतच जरी जनसाहित्य प्रवाह ठळकपणे दिसत नसला तरी प्रचलित सर्व प्रवाहांच्या तळाशी झुळझुळणारी सत्त्वशील धारा ही जनसाहित्याचीच आहे, हे कुणासही नाकारता येणार नाही.

जनसाहित्य हे एकात्म पण त्रिमितीय निकषावर आधारित साहित्य आहे. ही जनजीवनाभिमुख साहित्याची वाङ्मयीन चळवळ आहे. या सर्व बाबींच्या आधारे जनसाहित्याचे वेगळेपण सहज ध्यानात येते.

## जनसाहित्याची पताका घेतलेले साहित्यिक

जनसाहित्याचे वेगळेपण अभ्यासताना या साहित्याची पताका कोणी कोणी समर्थपणे पेलली आहे याचाही विचार उद्‌बोधक ठरेल

जनसाहित्याची समीक्षासूत्रे लक्षात घेऊन व त्याचे महत्त्वाचे घटक लक्षात घेऊन विविध साहित्यदालनांमध्ये जन्मलेल्या काही साहित्यकृतींची चिकित्सा करण्यात आली असता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (ग्रामगीता), उद्धव शेळके (धग), मनोहर तल्हार (माणूस), सुदाम सावरकर (जीवनयोगी खंड १ ते ११), बाबुराव बागुल (सूड), डॉ.सुभाष सावरकर (आत्मा, व्हायरस, आहुती, आटपाट या कादंबऱ्या व प्रदूषण, जजमेंट, सुवर्णकमळ, म्हाताऱ्याची काठी, अज्ञाताचा वेध या कथा), सुधाकर गायधनी (देवदूत), तुळशीराम काजे (भ्रमिष्ठांचेशोकगीत), अँड,एकनाथ साळवे (एनकाऊन्टर), अशोक कौतिक कोळी (पाटा), शंकरसखाराम (सेझ), बाबाराव मुसळे (हाल्या हाल्या दुधू दे), डॉ. नीळकंठ मेंदे (उद्ध्वस्त धर्मशाळा), आशा बगे (सेतू), डॉ.रा.गो. चवरे (मराठी कथा...), इंद्राणी तेलगोटे, शरद गावंडे आदि अनेक नावे पुढे आली आहेत,

आजच्या पिढीतील डॉ.निरंजनमाधव, डॉ.योगिता पिंजूरकर प्रा.राजेंद्र राऊत अशी अनेक नवोदित मंडळी या चळवळीशी जोडली गेली असून ती आपल्या कथा-कवितांद्‌वारे जनसाहित्याची निर्मिती वा समीक्षा करताना दिसून येतात. मात्र त्यांच्यात समीक्षणाची प्रेरणा ही अधिक प्रबळ असल्याचे दिसून येते. त्यामुळे

प्रा.डॉ.अतुल वानखडे, प्रा.डॉ.कल्पना मेहरे, प्रा.डॉ.विनोद कोकणे, प्रा.डॉ.अविनाश धोबे, प्रा.डॉ.मीनाक्षी बहाटे, प्रा.डॉ.बाळकृष्ण जाधव , व प्रस्तुत निबंधकर्ता स्वतः चे लेखन सुरू आहे.

## जनसाहित्याची वैशिष्ट्ये -

**वरील संपूर्ण विवेचनाच्या आधारे जनसाहित्याची वैशिष्ट्ये मांडता येतील**

(१) जनसाहित्याचा पाया जनजीवनाच्या विकासोन्मुख प्रेरणेवर आधारलेला आहे.

(२)- जनसाहित्य हे अस्सल देशीय' साहित्य आहे.

(३) जनसाहित्याचे मूळ लोकायत, द्राविड संस्कृती, सिंधु संस्कृती तथा जैन विचार, बुद्ध विचारात आहे. मात्र जनसाहित्य विचारप्रणालीची मांडणी ही आधुनिकयुगातील आहे, सबब ती ज्ञानविज्ञाननिष्ठ आहे.

(४) जनसाहित्य लेखकाची जननिष्ठा ही सर्वाधिक महत्त्वाची ठरते. त्यातूनच साहित्यकृतीच्या स्वरूपात जननिष्ठा अवतरते व त्यामुळेच वाचकाच्या जाणिवेत परिवर्तन संभवते.

(५) जनसाहित्य वजनवादी साहित्य यांच्या दरम्यान महदंतर आहे. जनसाहित्य विचारात कुठलाही 'वाद' नसून 'संवाद' मात्र निहित आहे. तसाच 'प्रतिवाद' आहे तो फक्त जनविरोधी/ जनद्रोही व्यवस्थेला!

## समारोप-

आज समाजात वाढत जाणाऱ्या समस्या साहित्यिकास जनमानसाचा शोध घेण्यास प्रवृत्त करतात. विविध साहित्यप्रवाहांचे आजचे गोठलेपण वितळून ते परत प्रवाहित होणे गरजेचे आहे. परंतु त्यासाठी रूढ समीक्षेपलीकडे जाण्यास कुणीही तयार नाही. आजच्या नमीक्षेस नवे नेत्र देणारा जनसाहित्याचा विचार हा आज उपलब्धअसलेला एकमेव पुरोगामी विचार होय. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये साठोत्तरी प्रवाह कदाचित संपुष्टात येवू शकेल त्यांचे महत्व कमी होईल परंतु जनसाहित्याच्या रूपाने तेच साहित्य अक्षर वाङ्मय राहण्यासाठी त्याच प्रवाहांचा जनसाहित्य दृष्टीने संशोधन करण्याची गरज आहे आणि नवीन शैक्षणिक धोरणामध्ये ते सुरूही झालेले आहे.

## निष्कर्ष -

१) बोर्डाच्या परीक्षांचा बोजा कमी.

२) पाचवी पर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून (मराठी) दिले जाईल.

३) सहावी पासून - कौशल्य शिक्षण.

४) तिसरी पर्यंत मुलभूत अक्षर ओळख आणि गणन प्रक्रीयेवर भर.

५) मुल्यांकन पद्धतीत बदल.

६) स्थानिक भारतीय भाषेत अभ्यासक्रम.

७) सरकारी, खाजगी शिक्षण संस्थांसाठी एकच निकष.

८) विषय निवडीचे स्वातंत्र्य कला, वानिह्य, विज्ञान, अभियांत्रिकी विषय विभागणीतून तयार झालेली भीती मोडीत निघेल.

९) पदवी अभ्यासक्रम ३ किंवा ४ वर्षाचा **(३ टप्पे)**-

| | | | |
|---|---|---|---|
| टप्पा १ | - | पहिले वर्ष पूर्ण | - प्रमाणपत्र |
| टप्पा २ | - | दुसरे वर्ष पूर्ण | - पदविका |
| टप्पा ३ | - | तिसरे किंवा चौथे वर्षे पूर्ण ब | - पदवी |

१०) ४ वर्षात संशोधनासह पदवी घेतलेला विद्यार्थी पदवीसाठी पात्र ठरल्यामुळे विद्यार्थ्याचे 1 वर्ष वाचेल.

११) ॲकेडेमिक बॅक ऑफक्रेडीटस-उच्च शिक्षण श्रेयांक पद्धत-देशभर आवडीने, सवडीने, आवडेल तिथे शिक्षणाची मुभा. वेगवेगळ्या विषयात आणि वेगवेगळ्या संस्थात शिक्षण जमा श्रेयांकवरून पदवी.

१२) विद्यापीठातच नाहीतर प्रत्येक महाविद्यालयात बहुविश्वशाखा अभ्यासक्रम असणार, आणि सरकार / खाजगी संस्थांना समान शुल्क राहणार.

१३) परकीय देशातील १०० विद्यापीठांची स्थापना भारतात होणार आहे. त्यामुळे उच्च शिक्षण घेण्यासाठी भारतातील उच्च शिक्षित विद्यार्थ्यांना बाहेर देशात जाण्याची गरज भासणार नाही.

१४) साहित्य हे व्यापक जनाभिमुख असण्याचा ध्रुवात्मक निकष समीक्षकांना दिला.

१५) जनसाहित्याने साहित्यिकांना जनदृष्टी दिली.

१६) रसिक वाचकाच्या आस्वादाला जननिष्ठेची व्यापक बैठक दिली.

१७) समाजातील जाणीव परिवर्तनाच्या विचारस व प्रेरणेस जननिष्टेची दृष्टी दिली.

१८) समीक्षा करतांना अकसरावयाच्या पद्धतीचा सोपन उलंगडून दाखविला.

१९) एकांगी / एकदेशीय न रहात सवीत सर्वांना मिसळण्याचे निकोप सामुदायिक तत्व

२०) अक्षरवैदर्भी' मास्कोव्दारे समरन प्रस्थापित साहित्यीकांच्या गळी उतरविले.

२१) जनसाहित्य हे निखळ माणुसकी धारण करणारे साहित्य असल्यामुले आदिवासी, दलित, ग्रामीण, लोकसाहित्य स्त्रीवादी अभिजन साहित्य प्रवाहातील प्रत्येक प्रकारात जनसाहित्य शोधता येते.

२२) जनसाहित्य हे सर्वांसाठी निर्माण होते.

२३) जनसाहित्य हे सर्व वर्गातील वाचकांना आपले वातटतेल मौल्यवान ही वाटते.

२४) जनसाहित्य हे व्यक्ती समूह समाजगट यांच्या हितापुरते सीमित नसतेच तर ते सर्वजनहितेष्ठी असते.

## संदर्भ ग्रंथ-

(१) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, शिक्षण मंत्रालय (भारत सरकार)

(२) वडस्कर या.वा., 'जनसाहित्याच्या दिशेने', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ३० डिसेंबर १९८८.

(३) डॉ.सुभाष सावरकर, 'जनसाहित्य' (प्र.आ.१९९३), नवीन आवृत्ती २०१२, मित्र समाज प्रकाशन सालसे, गोवा.

(४) डॉ. सावरकर सुभाष, 'वैदर्भी रीती', मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, १९९३.

(५) सावरकर सुदाम, 'जनसंस्कृतीचे आधारस्तंभ', मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, ९ नोव्हेंबर २००१.

(६) पाटील गंगाधर, 'समीक्षेची नवी रूपे', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, जुलै २००१.

(७) डहाके वसंत आबाजी, 'मराठी समीक्षेची सद्यःस्थिती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०११.

(८) डॉ.सावरकर सुभाष, 'संतवाङ्मयाचे जनसाहित्यमूल्य', मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, २८ मार्च २०१५.

(९) अक्षरवैदर्भी रजत जयंती वर्ष (फेब्रुवारी २००९).

(१०)'जनसाहित्याच्या दिशेने' - या. वा. वडस्कर, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे डिसेंबर १९८८.

(११)'अक्षरवैदर्भी' : साहित्य संमेलन विशेषांक, ऑ. नो. डी. २००२ पृ. ४७ व ४६.

(१२)अक्षरवैदर्भी' दिवाळी विशेषांक, ऑ. नो. डी. २००७ पृ. ३०.

❖❖❖

# राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि ग्रामगीता

**प्रा. डॉ. कल्पना त्र्यं. मेहरे**
मराठी विभाग प्रमुख
नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेरा, जि. अमरावती, महाराष्ट्र (India)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे २१ व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. आपल्या देशातील वाढत्या विकासात्मक आवश्यकतावर उपाय योजना करणे हे या धोरणाचे ध्येय आहे. प्राचीन आणि सनातन भारतीय ज्ञान आणि विचारांची समृद्ध परंपरा लक्षात घेऊन हे धोरण तयार करण्यात आले आहे. प्राचीन भारतात शिक्षणाचे लक्ष्य शाळेनंतरच्या जीवनाची तयारी म्हणून ज्ञान मिळविणे एवढेच नव्हते तर पूर्ण आत्मज्ञान किंवा मोक्ष होते. प्राचीन भारतातील तक्षशीला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभी अशा जागतिक दर्जाच्या संस्थांनी बहुशाखीय शिक्षण आणि संशोधनाची उच्च मानके तयार केली होती आणि वेगवेगळी पार्श्वभूमी असलेले आणि वेगवेगळ्या देशातील विद्वान आणि विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत असत. भारतीय शिक्षण व्यवस्थेने चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, वराहमिहीर, भास्कराचार्य, ब्रम्हगुप्त, चाणक्य, चक्रपाणी, दत्त माधव, पाणिनी, पतंजली, नागार्जुन, गौतम, पिंगल, शंकरदेव, मैत्रेयी, गार्गी आणि थिरूलवल्लूर असे अनेक विद्वान निर्माण केले. ज्यांनी गणित, खगोलशास्त्र, धातुशास्त्र, वैदकशास्त्र आणि शल्यचिकित्सा, स्थापत्य अभियांत्रिकी, स्थापत्यविद्या, जहाजबांधणी आणि नौकानयन, योग, ललितकला, बुद्धिबळ आणि इतर अनेक क्षेत्रातील जागतिक ज्ञानात मोलाची भर घातली आहे. भारतीय संस्कृती आणि तत्वज्ञान यांचा जगावर फार मोठा प्रभाव आहे. पुढील पिढ्यांसाठी या वारशाचे केवळ संवर्धन आणिजतनच नव्हे तर त्यावर संशोधन करणे, त्यात वाढ करणे आणि आपल्या नवीन शिक्षण व्यवस्थेत त्यांचा नव्याने उपयोग करणे महत्वाचे आहे.

या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दूरदृष्टी ही इप्सित भारतीय मूल्यांपासून विकसित केलेली, सर्वांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण उपलब्ध करून देऊन, त्याद्वारे भारताला एक जागतिक ज्ञान महासत्ता बनवून भारताचे एका न्याय आणि चैतन्यमय ज्ञान-समाजात शाश्वतपणे परिवर्तन करण्यात प्रत्यक्षपणे योगदान देणारी अशी शिक्षणव्यवस्था निर्माण करणे हे आहे.

या शैक्षणिक धोरणात असे संकल्पित आहे की, आपल्या शिक्षण संस्थांचा अभ्यासक्रम आणि शिक्षण पद्धत विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत कर्तव्य आणि घटनात्मक मूल्यांविषयी तीव्र आदर, स्वतःच्या देशाशी दृढ नाते आणि बदलत्या जगातील स्वतःच्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांविषयी जाणीवपूर्ण जागरूकता निर्माण करणारे असायला हवेत. या धोरणाची दूरदृष्टी अशी आहे की, भारतीय असल्याचा सखोल अभिमान विद्यार्थ्यांच्या केवळ विचारांमध्येच नव्हे तर त्यांच्या व्यवहारात, बुद्धीमध्ये आणि कृतीमध्ये देखील रुजवणे तसेच मानवी हक्क शाश्वत विकास आणि जीवनमान यांच्याशी जबाबदारीपूर्ण बांधिलकीचे समर्थन करणारे ज्ञान, कौशल्य, मूल्ये आणि स्वभाव विकसित करणे जेणेकरून ते खऱ्या अर्थाने एक वैश्विक नागरिक बनेल.

या शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट हे शालेय शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लाक्षणिक वाढ करणे व नवनवीन उपक्रम राबविणे आहे. शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वावर आधारित अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे.

## या धोरणाचा सिद्धांत

- प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वैशिष्ट्यपूर्णता क्षमता शोधणे ओळखणे आणि त्या विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे.
- प्रत्येक विद्यार्थ्यासाठी मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान या गोष्टींना इयत्ता तिसरीपर्यंत सर्वोच्च स्थान देणे.
- विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनाचा मार्ग आणि कार्यक्रम निवडण्याची मुभा लवचिकता असावी.
- कला आणि विज्ञान अभ्यास आणि अभ्यासेत्तर इतर उपक्रम व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवाह यांच्यामध्ये कोणतेही स्पष्ट विभाजन नसले पाहिजे. यातून ज्ञानाच्या क्षेत्रातील हानिकारक उच्चनीचता आणि त्यांच्यात पडलेले अंतर दूर होईल.
- सगळ्या ज्ञानाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करून एका बहुआयामी जगासाठी विज्ञान समाजशास्त्र, कला, मानव्यशास्त्रे, खेळ यांच्यामध्ये बहुशाखीय आणि समग्र शिक्षणाचा विकास.
- संकल्पना समजून घेण्यावर भर यामुळे परीक्षेसाठीची घोकंपट्टी बंद.
- तर्कशुद्ध निर्णय घेण्यासाठी आणि नाविन्यपूर्ण प्रोत्साहन देण्यासाठी कल्पकता आणि तार्किक विचारांवर भर.
- नैतिकता आणि मानवी हक्क आणि घटनात्मक मूल्य. उदाहरणार्थ सहृदयता, इतरांबद्दल आदर, स्वच्छता, सौजन्य, लोकशाहीची भावना, सेवेची भावना, सार्वजनिक मालमत्तेबद्दल आदर, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्वातंत्र, जबाबदारी, बहुलताबाद, समता आणि न्याय.
- अध्यापनात आणि अध्ययनात बहुभाषिकत्व आणि भाषाशक्ती यांना प्रोत्साहन.
- संवाद, सहकार्य, सामूहिक कार्य आणि लवचिकता हे जीवनमूल्य.
- शिक्षणासाठी सातत्यपूर्ण मूल्यांकनावर भर कोचिंग संस्कृतीला आळा.
- अध्ययन अध्यापनात तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर भाषेचे अडथळे काढून टाकणे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुलभ बनवण्यासाठी शैक्षणिक नियोजन आणि व्यवस्थापन.
- शिक्षण हा समवर्ती विषय आहे हे लक्षात घेऊन सर्व अभ्यासक्रम अध्यापन शास्त्र आणि धोरण यात विविधतेबद्दल आणि स्थानिक संदर्भांबद्दल आदर.
- शिक्षण व्यवस्थेत सर्व विद्यार्थ्यांना प्रगती करता येईल हे सुनिश्चित करण्यासाठी सर्व शैक्षणिक निर्णयांमध्ये पूर्ण समानता आणि सर्वसमावेशता ही पायाभूत गोष्ट.
- प्रारंभिक बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षणापासून ते शालेय शिक्षण ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व पातळ्यांवरील शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुसूत्रता.
- शिक्षक आणि प्राध्यापक हे शिक्षण प्रक्रियेचे केंद्र मानने, त्यांची भरती आणि तयारीची उत्कृष्ट व्यवस्था, सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास आणि कामकाजाचे वातावरण व सेवेची स्थिती सकारात्मक असणे.

- शिक्षण प्रणालीची अखंडता पारदर्शकता आणि संसाधनाची कार्यक्षमता,ऑडिट आणि सार्वजनिक प्रकटीकरणाच्या माध्यमातून सुनिश्चित करण्यासाठी एक सुलभ पण परिणामकारक निर्णयाची चौकट देणे. त्याचबरोबर स्वायत्तता सुशासन आणि सशक्तिकरणाच्या माध्यमातून नाविन्यपूर्णता आणि चौकटी बाहेरच्या विचारांना प्रोत्साहित करणे.
- गुणवत्ता पूर्ण शिक्षण आणि विकासासाठी सह आवश्यकता म्हणून उत्कृष्ट दर्जाचे संशोधन.
- शिक्षण तज्ञांद्वारे सातत्यपूर्ण संशोधन आणि नियमित मूल्यांकनाद्वारे प्रगतीचा सातत्यपूर्ण आढावा.
- शिक्षण ही एक सार्वजनिक सेवा आहे गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध असणे हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क समजला पाहिजे.
- सशक्त जिवंत सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेत लाक्षणिक गुंतवणूक तसेच देणगीदार खाजगी आणि सामुदायिक संस्थांच्या भागीदारीला प्रोत्साहन आणि सुविधा

## उच्च शिक्षण :-

### नवीन संस्थात्मक पायाभूत सुविधा -

- अध्यापन व संशोधनासाठी विशाल सर्वसाधारण समृद्ध चैतन्यमय बहुविध शाखांनी सुसज्ज असलेल्या स्वायत्त संस्थांची उभारणी करेल
- तीन प्रकारच्या संस्था अस्तित्वात येतील

**प्रकार १** : यामध्ये जागतिक दर्जाचे संशोधन व सर्व शाखांसाठी उच्च दर्जाचे अध्यापन करण्यात येईल

**प्रकार २** : यामध्ये सर्व शाखांसाठी उच्च दर्जाचे अध्यापन करण्यासोबत संशोधनांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देण्यात येईल

**प्रकार ३** : यामध्ये सर्व शाखांसाठी उच्च दर्जाचे अध्यापन करताना पदवी पूर्ण शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यात येईल.

- विद्यमान संस्थांचे एकीकरण व पुनर्रचना करून आणि सोबत काही नवीन संस्था निर्माण करून सदरील पुनर्रचना अतिशय पद्धतशीरपणे व काळजीपूर्वक करण्यात येईल. नवीन संस्थात्मक शिक्षण पायाभूत सुविधेच्या उत्प्रेरणासाठी नालंदा अभियान, तक्षशिला अभियान सुरू करण्यात येईल. या अभियानाचा भाग म्हणून कार्यास गतिशीलता आणणाऱ्या काही संस्था इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ लिबरल आर्ट्स बहुशाखिय शिक्षण व संशोधन विद्यापीठे उभारण्यात येऊ शकतात.
- सर्व संस्था विद्यापीठे असतील किंवा पदवी प्रदान करणारी स्वायत्त महाविद्यालय असतील.
- सार्वजनिक क्षेत्रातील उच्च शिक्षणाचा विस्तार व पुनरुज्जीवन होण्याच्या दृष्टीने अतिशय रास्त व पारदर्शक प्रणालीद्वारे सार्वजनिक क्षेत्रातून मोठी गुंतवणूक करण्यात येईल.
- दुर्लक्षित किंवा वंचित भौगोलिक क्षेत्रांमध्ये उच्च दर्जाच्यासंस्थांची उभारणी प्राधान्यक्रमी असेल.
- ही नवीन संस्थात्मक पायाभूत सुविधा व्यावसायिक क्षेत्रांसह सर्व क्षेत्रांना सामावून घेईल.

### उच्च दर्जाचे उदारमतवादी शिक्षण

- उदारमतवादी शिक्षण
- बहुशाखिय शैक्षणिक व संशोधन विद्यापीठांची उभारणी

- अभ्यासक्रमाची कल्पक व लवचिक रचना
- अनेक बहिर्गमन मार्ग
- ४ वर्षाचा अभ्यासक्रम

**अध्ययनास पोषक वातावरण निर्माण करणे**

- राष्ट्रीय उच्च शिक्षण पात्रता आराखडा
- पसंतीनुरूप क्रेडिट प्रणाली
- शैक्षणिक आर्थिक व भावनिक सहाय्य
- खुले शिक्षण व दुरुस्त शिक्षणाच्या कक्षा रुंदावतील

**उत्साही सहभागी होणारे व सक्षम अध्यापक**

- सबळ अनुपालन व स्वायत्तता
- सर्व उच्च शिक्षण संस्था स्वायत्त स्वयंचलित संस्था असतील
- खाजगी व सरकारी संस्थांना एकसमान मानण्यात येईल.
- स्वायत्तता खोलवर रुजवली जाईल.

**विनियमनाच्या प्रणालीमध्ये अमुलाग्र बदल**

- प्रमाणन अर्थसाहाय्य मान्यताप्राप्ती व विनियमन ही कार्य वेगवेगळी करण्यात येतील.
- राष्ट्रीय उच्च शिक्षण नियंत्रण प्राधिकरण ही एक नियंत्रण संस्था असेल.
- या शासकीय व उच्च शिक्षण संस्थांसाठी एकच सामाजिक नियंत्रण पद्धती असेल. खाजगी क्षेत्रातून परोपकारी वृत्तीने पुढाकार घेणाऱ्या संस्थांना प्रोत्साहित केले जाईल.
- नियंत्रण प्रणालीमध्ये राज्य शासनातील उच्च शिक्षण विभागाचा धोरणस्तरावर समावेश असेल. राज्य उच्च शिक्षण परिषद सदर नियंत्रण प्रणालीला आवश्यक सहाय्य पुरवेल व स्वतःकडील सर्वोत्तम कार्यपद्धतींची देवाण-घेवाण करेल.

भारत हा खेड्यांचा देश आहे. आज जागतिकीकरणामुळे खेडे हे विश्वाचे एकक झाले आहे. गावातील जनतेचे अज्ञान, दारिद्र्य, नैराश्य, भोळ्या समजुती दूर करून जनतेला सक्षम बनविले तरच ग्राम स्वयंपूर्ण होईल व देश समृद्ध बनेल. यासाठी वंदनीय राष्ट्रसंतांनी अपार कष्ट घेऊन ग्रामगीतेसारख्या बुद्धग्रंथाची निर्मिती केली.

विदर्भाच्या भूमीत स्वातंत्रपूर्व काळात अमरावती जिल्ह्यातील यावली शहीद या गावी जन्माला आलेले वंदनीय राष्ट्रसंत हे थोर विचारवंत होते. त्यांनी ग्रामगीतेच्या 19 व्या अध्यायात आपले शिक्षण विषयक विचार मांडले आहेत. महाराज म्हणतात,

मुलांना शिकवाव्या नाना कला ।
चापल्य ध्येयनिष्ठादिसकला ।
गांवचि सांभाळू शकेल आपुला ।
ऐसे द्यावे शिक्षण ॥ ३१ ॥

ग्रामातील मुलांना शिक्षणामधूनच जीवनउपयोगी अशा विविध कला शिकवून स्वतःच्या पायावर उभे राहता येईल, स्वावलंबी बनता येईल. ग्रामाच्या गरजा ग्रामातच पूर्ण होतील. असे शिक्षण दिल्यास ग्रामाचा विकास साधता येईल. ग्राम पर्यायाने देश समृद्ध होईल.

गावांसि कैसे आदर्श करावे |
याचेही शिक्षण प्रामुख्याने घ्यावे |
सक्रियतेने करावयासि लावावे |
विद्यार्जनी ||३२||

गाव स्वयंपूर्ण बनून तिथले लोक उद्यमशील आणि निर्व्यसनी कसे होतील याचं प्रात्यक्षिक संत राष्ट्रसंत तुकडोजींनी करून दाखविले. गावागावातून शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितलं. त्याचबरोबर बलसंवर्धन,शिक्षण, आयुर्वेद आणि कृषी संवर्धनाचे धडे दिले. त्यांनी आदर्श समाज रचनेला सहाय्यभूत अशी संघटना निर्माण केली.

सहकार्याची प्रबलभावना |
हेंचि शिक्षणाचे मुख्य सूत्र जाणा|
सहकार्यावाचूनी शिक्षणा |
महत्त्व नाही || ३३ ||

आज माणूस अतिशय आत्मकेंद्री झाला आहे त्यामुळे आजचे शिक्षण फोल ठरत आहे.

गांवचे सर्वात मुख्य पुत्रधन |
त्याचे संरक्षावे चरित्रधन |
तेणे गावाचे वाढेल महिमान |
चारित्र्यापरि उज्वल || ३६ ||

चारित्र्यसंपन्न, शीलवान विद्यार्थी देशाच्या हितासाठी आवश्यक आहे.

बालपणींच शिक्षण होई |
वय झालीया त्रास जाई |
वळविल्या ही वळती काही |
इंद्रियेत्यांची || ३८ ||

मुलांना योग्य वळण लहानपणापासूनच लागतात. मोठे झाल्यावर नाही.

जरी आपल्याने व्यवस्था नव्हे |
तरी देशोद्धारक संस्थेसि सोपवावे |
परि मुलासपतीत न ठेवावे |
अशिक्षितपणे कधीही || ४३ ||

कुठल्याही परिस्थितीत मुलांना अशिक्षित ठेवू नका

असावे गावीच विद्याभुवन |
बालोद्यान शिशुसंगोपन |
मुलें बाळपणीच त्यांत ठेवोनि |
वळण द्यावे साजेसें || ४९ ||

मुलांना लहानपणापासून योग्य वळण लावण्यासाठी,संस्कार करण्यासाठी गावात शिशु संगोपन गृह असणे गरजेचे आहे.

शाळा विद्यार्थीकेंद्री असावी हा विचार तुकडोजींनी आपल्या विचारात मांडला. शाळेतील मुलांना मन लावून शिकवलं तर इतर कुठे देव शोधायला जायची गरज नाही. तुकडोजींनी कर्मयोग आचरायला सांगितला.

सच काम किया जिसने जग मे |
उसने प्रभू नाम लिया न लिया ||

आजच्या शिक्षकांनी हे लक्षात घेणे गरजेचे आहे. गावाला मंदिराचे रूप आणायचं असेल तर आपण आपले प्रयत्न वाढवायला हवे. गावातला प्रत्येक माणूस शिकला पाहिजे, शहाणा झाला पाहिजे. राष्ट्रसंत तुकडोजी म्हणतात, शिक्षण देऊनी केली दिवाळी म्हणजे आपण लाडू, पेढे, जिलेबी खाऊन, वाटून दिवाळी साजरी करतो मात्र गावाला शिक्षण देऊन साजरी होते ती खरी दिवाळी.

शिक्षण देऊनी केली दिवाळी |
अज्ञानाची करूणी होळी |
तुकड्या म्हणे मन रंगल |
आता खोटंनाटं नाही राहलं |
माझ गावच मंदिर शोभलं ||

जनसेवेतच ईश्वर सेवा आहे आणि ही मानवतेची उपासना आणि राष्ट्रसेवा आहे. अशी शिकवण त्यांनी जनतेला दिली. नवे शैक्षणिक धोरणही याच सर्व मूल्यांना धरून आहे. सत्वाचा शोध घेऊन त्याचा विकास साधनं महत्त्वाचं असतं.

आत दडलेलं हुडकून काढणं हाच आता शिक्षणाचा अर्थ आहे. सर्वांगीण विकासाचा तो पाया आहे. नवीन शैक्षणिक धोरणात याची अतिशय व्यवस्थित मांडणी केली आहे.जीवन शिक्षणाचा अर्थ संस्कारित शिक्षण आहे. पुस्तकं कितीही पाठ केली तरी जीवन शिक्षण आवश्यक आहे. आजच्या शिक्षणात श्रेष्ठत्व कागदावरून ठरतं. आजच्या शिक्षणात नैतिकतामोजता येत नाही. संस्काराची आज गरज आहे हा सर्व विचार नवीन शैक्षणिक धोरणात आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० - शिक्षण मंत्रालय भारत सरकार
२. ग्रामगीता - वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गुरुदेव सेवा मंडळ, मोझरी
३. ग्रामगीता रहस्य स्पंद १,२,३ - डॉ. सुभाष सावरकर, जनसाहित्य परिषद, अमरावती
४. राष्ट्रसंत तुकडोजी गौरव ग्रंथ - संपा. प्राचार्य रा. तु. भगत, सहसंपादक - डॉ. सुभाष सावरकर, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर
५. जीवन्योगी खंड १ ते १२ - जनसारस्वत सुदाम सावरकर, साहित्यप्रभा प्रकाशन, अमरावती
६. मानवतेचे महान पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी - रघुनाथ कडवे, संस्कार प्रकाशन, नागपूर

❖❖❖

# नवीन शैक्षणिक धोरण: उच्च शिक्षणाच्या संदर्भात चिंता आणि संभावना

प्रा. डॉ. सी.डी. पाखरे
महात्मा फुले महाविद्यालय, वरुड, जि. अमरावती, महाराष्ट्र (India)

## गोषवारा

नवीन शैक्षणिक धोरण 2020 ची सुरुवात विचारशील शिक्षण पद्धतीच्या दृष्टिकोनातून करण्यात येत आहे. त्याचे परिणाम फायदेशीर आणि देशाच्या हिताचे असतील, असा विश्वास आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली तर आपला देशही इतर देशांप्रमाणे अधिक प्रगत दर्जेदार शिक्षण आणि सुशिक्षित समाज प्रस्थापित करेल, ज्याचा आपल्या देशाच्या विकासात मोठा हातभार लागेल आणि या शैक्षणिक धोरणामुळे आपल्याला पूर्ण विश्वास आहे. यशस्वीरित्या अंमलात आणणे. त्याची अंमलबजावणी झाली तर आपल्या देशाला एका नव्या उंचीवर घेऊन जाईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) ने उच्च शिक्षण संस्थांना "उत्तराच्या शोधात समस्या सोडवण्याऐवजी" "समस्या सोडवण्यावर" कार्य करण्यास प्रवृत्त करून भारतातील उच्च शिक्षणाचे परिदृश्य बदलणे अपेक्षित आहे.

## परिचय

NEP 2020 प्रगत फ्रेमवर्क वैज्ञानिक शिक्षण आणि मूल्य-आधारित शिक्षणास समर्थन देईल. ते कालबाह्य "अभ्यासक्रम" ची जागा घेईल जे कठोर आहे आणि तसे करण्यासाठी आवश्यक असलेल्या अवजड नोकरशाही फ्रेमवर्कमुळे वेळेनुसार बदल करणे अशक्य आहे. NEP 2020 शैक्षणिक प्रणाली सर्वसमावेशक, जुळवून घेणारी आणि 21 व्या शतकातील शिक्षणाच्या मागणीनुसार बनविण्याच्या महत्त्वावर भर देते. परंतु ही सर्व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, आपण सातत्यपूर्ण आणि दीर्घकालीन अंमलबजावणीच्या सर्व अडथळ्यांवर मात केली पाहिजे. NEP 2020 मसुदा समितीने अनेक दृष्टिकोन, शिक्षणातील आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धती, व्यावहारिक अनुभव, आणि भागधारक अभिप्राय. उच्च शिक्षण - पदवी स्तर चार वर्षांचा असेल. तांत्रिक शिक्षणासोबतच तुम्हाला कला आणि मानवतेचाही अभ्यास करता येईल. औषध, अभियांत्रिकी, कायद्याचे शिक्षण गरजेनुसार शिस्तबद्ध पद्धतीने दिले जाईल. तीन वर्षांनंतरही पदवी दिली जाईल; आवश्यकतेनुसार संशोधन इत्यादींना प्रोत्साहन दिले जाईल.

देशात सध्या 1,000 हून अधिक उच्च शिक्षण संस्था (HEI) आहेत, ज्यात राष्ट्रीय महत्त्वाच्या 150 हून अधिक संस्थांचा समावेश आहे. कालांतराने ती वैज्ञानिक संशोधनाची केंद्रेही बनली आहेत. उच्च शिक्षणाच्या संस्थांनी संशोधनाचे प्रमाण आणि गुणवत्ता या दोन्ही बाबतीत गेल्या दशकात स्थिर वाढ दर्शविली आहे. सध्या एकूण संशोधन प्रकाशनांच्या बाबतीत भारताचा जागतिक स्तरावर तिसरा क्रमांक लागतो आणि एकूण संशोधन प्रकाशनांमध्ये 5.31 टक्के वाटा आहे. या तीन पैलूंपैकी पहिल्या दोन पैलूंमध्ये-शिक्षण, ज्ञाननिर्मिती (संशोधन आणि विकास) आणि नवकल्पना-भारतीय उच्च शिक्षण संस्थांनी तुलनेने चांगली कामगिरी केली आहे, परंतु नावीन्यपूर्णतेमध्ये त्या मागे आहेत. धोरणाची मुख्य तत्त्वे:

जाणून घेणे आणि ओळखणे, प्रत्येक विद्यार्थ्याचे शैक्षणिक आणि गैर-शैक्षणिक दोन्ही क्षेत्रांमध्ये सर्वांगीण पाठपुरावा करण्यास शिक्षकांना तसेच पालकांना संवेदनशील करून प्रत्येक विद्यार्थ्याची अद्वितीय क्षमता बाहेर आणणे. लवचिकता, जेणेकरुन शिकणाऱ्यांमध्ये त्यांचे शिक्षण मार्ग आणि कार्यक्रम निवडण्याची क्षमता असेल आणि अशा प्रकारे त्यांच्या शिक्षण आणि आवडीनुसार जीवनातील स्वतःचा मार्ग निवडता येईल; कला आणि विज्ञान यांच्यात कोणतेही कठोर पृथक्करण नाही, हानिकारक पदानुक्रम आणि अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रम मार्गदर्शक, व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवाह आणि शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमधील अडथळे दूर करणे. बहु-अनुशासनात्मक आणि एकात्मिक शिक्षण: बहु-अनुशासनात्मक जगासाठी विज्ञान, सामाजिक विज्ञान, कला, मानसशास्त्र आणि क्रीडा यांमधील ज्ञानाची एकता आणि अखंडता मजबूत करणे. नैतिकता, मानवी आणि तात्विक मूल्ये जसे की करुणा, अंतराचा आदर, स्वच्छता, सौजन्य, लोकशाही विचार, व्यावसायिक आत्म्याचा आदर, वैज्ञानिक स्वभाव, स्वातंत्र्य, जबाबदारी, बहुलवाद आणि न्याय. अध्यापन आणि शिकण्यात बहुभाषिकता आणि भाषेच्या सामर्थ्याला प्रोत्साहन देणे, सर्जनशीलता, सहयोग, टीमवर्क आणि लवचिकता यासारखी जीवन कौशल्ये; ऑटोमेशन, संशोधन आणि प्रमाणीकरणाद्वारे नावीन्य आणि आउट-ऑफ-द-बॉक्स कल्पनांना प्रोत्साहन देताना ऑडिट आणि व्यावसायिक प्रकटीकरणांद्वारे शैक्षणिक प्रणालीची अखंडता, पारदर्शकता आणि ऑपरेशनल कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी एक 'हलकी परंतु कार्यात्मक फ्रेमवर्क'; आणि मजबूत, दोलायमान, व्यावसायिक शिक्षण प्रणालीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देताना विद्यार्थी, परोपकारी, समुदाय भागीदारी वाढवणे आणि त्यांना शिक्षित करणे.

## भारतीय उच्च शिक्षण संस्थेच्या समस्या

उच्च शिक्षणावरील अखिल भारतीय सर्वेक्षण (AISHE) अहवाल 2019-20 नुसार, भारतातील उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रमाण (GER) केवळ 27.1% आहे जे विकसित देशांच्या तसेच इतर विकसनशील देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. शालेय स्तरावर पटसंख्या वाढल्याने, देशातील शिक्षणाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांचा पुरवठा अपुरा आहे.

उच्च शिक्षणातील गुणवत्ता सुनिश्चित करणे हे सध्याचे सर्वात मोठे आव्हान आहे. भारतातील मोठ्या संख्येने महाविद्यालये आणि विद्यापीठे UGC अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या किमान अटी पूर्ण करू शकत नाहीत. उच्च शिक्षणाच्या व्यवस्थापनात राजकारण्यांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे उच्च शिक्षण संस्थांची स्वायत्तता धोक्यात आली आहे. तसेच, विविध मोहिमांमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी आपली शैक्षणिक उद्दिष्टे विसरून राजकारणात आपली कारकीर्द घडवू लागतात.

भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेसाठी खराब पायाभूत सुविधा हे आणखी एक आव्हान आहे, विशेषत: सार्वजनिक क्षेत्राद्वारे चालवल्या जाणाऱ्या संस्थांमध्ये; पायाभूत सुविधा आणि भौतिक सुविधांची स्थिती चांगली नाही. शिक्षकांची कमतरता आणि पात्र शिक्षकांना आकर्षित करण्यात आणि टिकवून ठेवण्यास राज्य शिक्षण व्यवस्थेची असमर्थता यामुळे दर्जेदार शिक्षणाच्या मार्गात गेल्या काही वर्षांपासून आव्हाने निर्माण झाली आहेत. उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात रिक्त जागा असूनही, मोठ्या संख्येने NET/PhD उमेदवार बेरोजगार आहेत. उच्च शिक्षण संस्थांमध्ये संशोधनाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. साधनसामग्री आणि सुविधांचा अभाव असून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास सक्षम शिक्षकांची संख्याही मर्यादित आहे. बहुतेक संशोधन विद्वान फेलोशिपपासून वंचित आहेत किंवा त्यांना वेळेवर फेलोशिप दिली

जात नाही ज्यामुळे त्यांच्या संशोधनावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे परिणाम होतो. याव्यतिरिक्त, संशोधन केंद्रे आणि उद्योग यांच्याशी भारतीय उच्च शिक्षण संस्थांचा समन्वय कमकुवत आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थापनाला अति-केंद्रीकरण, नोकरशाही संरचना आणि जबाबदारी, पारदर्शकता आणि व्यावसायिकता या आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

## चिंता

कौशल्य विकासावर धोरणाचा भर, विशेषत: करिअर प्रशिक्षण आणि जीवन कौशल्ये, हे त्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे. जीवन कौशल्यांचे शिक्षण लागू करणे तुलनेने सोपे आहे आणि तरुणांना सामाजिक वर्तन आणि सामाजिक अनुकूलतेमध्ये पारंगत होण्यास मदत करते. तथापि, मुख्य अडथळा म्हणजे व्यावसायिक प्रशिक्षण देणे कारण विशिष्ट व्यवसायांना विशिष्ट व्यवसायांवर दीर्घकाळ अवलंबून असलेल्या विशिष्ट समुदायांशी जोडण्याचा धोका असतो. सुचविलेले व्यावसायिक प्रशिक्षण विद्यार्थ्यांच्या निर्धारित योग्यतेवर आधारित असावे. व्यावसायिक शिक्षणाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलण्याची गरज आहे आणि 1964-1966 मध्ये कोठारी आयोगाने स्थापन केलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यापासून भारत अजूनही का दूर आहे यावर धोरणकर्ते आणि प्रशासकांनी चिंतन केले पाहिजे. या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी नीरस नित्याचे मानसिक काम न करता झुकणे हे आकर्षक आणि आनंददायक क्रियाकलाप बनवायला हवे. प्रशिक्षित शिक्षक, सुविधा देणारे आणि सहाय्यक कर्मचारी देखील आवश्यक असतील, ज्यांना प्रेरणादायी मार्गदर्शकांच्या समूहाने पूरक केले जाईल. परिणामी, धोरणाला आपल्या अद्भुत देशाची सांस्कृतिक आणि भौगोलिक विविधता तसेच प्रत्येक विद्यार्थ्याच्या विविध शिक्षण दरांचा विचार करणारी शिक्षण व्यवस्था तयार करण्याची आवश्यकता असेल. तंत्रज्ञान जाणकार शिक्षकांची नवीन पिढी विद्यार्थ्यांसाठी आदर्श म्हणून काम करतील, त्यांना नवीन तंत्रज्ञानाबद्दल शिक्षित करतील आणि शाळांमध्ये IT अंमलबजावणीचे प्राथमिक चालक म्हणून काम करतील. NEP 2020 केवळ विद्यार्थ्यांमधील संज्ञानात्मक कौशल्ये सुधारण्यासाठी प्रयत्न करत आहे ज्यामध्ये साक्षरतेचा पाया तयार करण्याबरोबरच उच्च दर्जाचे विचार कौशल्य आणि क्रिटिकल थिंकिंग विकसित केले जाते तर जीवन कौशल्ये देखील विकसित होतील जी विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रौढ जीवनातील विविध आव्हानांसाठी तयार करतील. त्यामुळे नवीन धोरणाचा जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी अभ्यासक्रम आणि अध्यापन पद्धतीत बदल करणे ही काळाची गरज आहे. NEP शैक्षणिक आणि अभ्यासक्रमातील बदलांसह मूल्य-आधारित शिक्षण प्रणालीची मागणी करते. त्यामुळे, पॉलिसीच्या यशस्वी वापरासाठी नवीन पद्धती सुधारणे आणि नावीन्यपूर्ण करणे आवश्यक आहे.

कोणतेही धोरण आचरणात आणण्यासाठी विविध कायदे आणि कृतींशी सुसंगत असणे आवश्यक आहे. 2009 चा शिक्षण हक्क कायदा वयाच्या संदर्भात या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कायदेशीर आव्हान प्रस्तुत करतो. कायदा आणि अलीकडे जाहीर केलेल्या धोरणामधील कोणत्याही समस्यांचे दीर्घकाळात निराकरण करण्यासाठी, शालेय शिक्षण कोणत्या वयापासून सुरू होते यासारख्या काही कलमांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विषयांचा अभ्यास करण्याचे स्वातंत्र्य देणारी एक उत्कृष्ट संकल्पना म्हणजे आंतरविद्याशाखीय शैक्षणिक प्रणाली. भारतीय महाविद्यालये ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत विभागली गेली आहेत, प्राध्यापक आणि शिक्षणतज्ञ आपापल्या अभ्यासाच्या क्षेत्रांचे कठोरपणे रक्षण करतात. फारच काही अपवाद वगळता, ही संस्कृती खोलवर रुजलेली आहे आणि नवीन धोरणात त्यात

सुधारणा करण्याची गरज आहे. आंतरविद्याशाखीय उच्च शिक्षण नमुना अंमलात आणण्यासाठी अध्यापन शिक्षकांना त्यांच्या स्वतःच्या व्यतिरिक्त इतर क्षेत्रात कौशल्य असणे आवश्यक आहे, जो एक कठीण प्रयत्न आहे. पुढील दहा वर्षांच्या कालावधीत, प्रणाली यशस्वी होण्यासाठी विघटनकारी सांस्कृतिक परिवर्तन आवश्यक आहे. या प्रमाणपत्रे आणि पदवींच्या मूल्याबाबत चिंता कायम आहे, जरी वैकल्पिक एक्झिटच्या संकल्पनेद्वारे उच्च शिक्षणाच्या मॉडेलमध्ये लवचिकता हे गळतीची संख्या कमी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. पदव्या मिळवण्याचा भारतीय मानसिकतेतील नोकऱ्यांशी मजबूत संबंध आहे. त्यामुळे, नवीन प्रणाली प्रत्यक्षात आणण्यासाठी, पदवी मिळवणे ही नोकरीसाठी आवश्यक आहे ही कालबाह्य धारणा प्रथम आपण नष्ट केली पाहिजे. हे एक धोकादायक जागतिक दृष्टिकोन आहे जे एखाद्या व्यक्तीच्या इतर नैसर्गिक क्षमतांना बदनाम करते आणि परावृत्त करते.

## उच्च शिक्षण संस्थांच्या संदर्भात नवीन शैक्षणिक धोरणाची शक्यता

नॅशनल रिसर्च फाउंडेशन (NRF): भारतीय शैक्षणिक संस्था पारंपारिकपणे प्रासंगिकता आणि वितरणावर जास्त भर न देता संशोधन आणि विकासावर लक्ष केंद्रित करते. नॅशनल रिसर्च फाऊंडेशनच्या स्थापनेमुळे स्थानिक गरजांशी संबंधित संशोधनाला निधी देण्यासाठी मंत्रालये आणि उद्योगांना एकत्र आणणे अपेक्षित आहे. NRF च्या फ्रेमवर्क अंतर्गत, प्रत्येक सरकारी मंत्रालयाने (मग केंद्र किंवा राज्य मंत्रालय) संशोधनासाठी स्वतंत्र निधी वाटप करणे आवश्यक आहे. त्यामुळे NRF, संशोधकांसमोर चांगल्या-परिभाषित समस्या मांडणे अपेक्षित आहे, जेणेकरून ते ध्येय-देणारं आणि कालबद्ध पद्धतीने उपाय शोधू शकतील. आमच्या संस्थांना त्यांच्या कार्यक्षेत्रात आणि ऑफरमध्ये केवळ बहुविद्याशाखीय असण्याची गरज नाही, तर उच्च शिक्षण संस्थांच्या तंत्रज्ञान विकासाची क्षमता उघड करण्यासाठी एकमेकांशी सहयोग देखील आवश्यक आहे. शिस्त, संस्कृती (आंतरराष्ट्रीय कार्यक्रम) आणि दृष्टीकोन (शैक्षणिक-उद्योग सहयोग) या संदर्भात "विभेदित" कल्पना एकत्र आणणे ही काळाची गरज आहे. NEP मध्ये कल्पना केल्यानुसार बहुविद्याशाखीय विद्यापीठे संशोधकांच्या सर्जनशील क्षमतेवर लक्ष केंद्रित करतील.

## निष्कर्ष

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे फायदे औपचारिक शिक्षण, पोस्ट-डॉक्टरेट संशोधन अभ्यास आणि करिअर प्रशिक्षण कार्यक्रमांसह शिक्षणाच्या सर्व पैलूंचा विस्तार करतात. राष्ट्रीय शिक्षण मार्गदर्शक तत्त्वे प्रदान करते आणि महाविद्यालये, विद्यापीठे आणि शाळांना त्यांच्या स्वतःच्या संस्थांचे मूल्यांकन करण्याची परवानगी देते. हे धोरण संरचनात्मक असमानता आणि इतर शैक्षणिक समस्या दूर करण्यात मदत करते. जरी धोरणात स्पर्धेचे महत्त्वपूर्ण घटक समाविष्ट केले असले तरीही, व्यावहारिक अंमलबजावणीची अजूनही तातडीने गरज आहे. मागणी करणारे धोरण सर्व सरकारांच्या सहाय्याने आणि शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने लागू केले पाहिजे. बाबत आर्थिक, धोरणाची अंमलबजावणी केवळ सरकारी निधीवर अवलंबून आहे, जी जीडीपीच्या 6% आहे आणि सध्याच्या वातावरणात पुन्हा एकदा कठीण आव्हान आहे. त्यामुळे, सध्याच्या सर्व अडथळ्यांवर मात करण्यासाठी काळाची एकमेव गरज म्हणजे प्रभावी अंमलबजावणी.

## संदर्भ


1. डॉ. रुची राणी "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०: समस्या आणि आव्हाने" क्वेस्ट जर्नल्स जर्नल ऑफ रिसर्च इन ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्स खंड १० ~ अंक २ (२०२२)pp: ०६-०९
2. गुप्ता, स्तुती (२०२०). राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या संदर्भात शिक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञानाची भूमिका आणि दृष्टीकोन योगदान.
3. https://www.hindustantimes.com/education/ugc-ask-varsities-to-create-awareness-about-new-education-policy-among-students-teachers/story-XjDXDw978SXD0VUPUmxhvL.html.
4. https://timesofindia.indiatimes.com/india/gender-inclusion-fund-spl-edu-zones-in policy/article show/77252728.cms


❖❖❖

# नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणि त्यापुढील आव्हाने व संधी

प्रा. डॉ. माधुरी पंडितराव राखुंडे
(वाणिज्य विभाग)
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)

## सारांश-

२०२० मध्ये भारतात करोनाकाळात केंद्र सरकारने जे अनेक निर्णय घेतले, त्यातले बरेचसे वादग्रस्त व घाईघाईत घेतले होते. त्याला अपवाद होता- 'नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०'चा. १९८६ नंतर जवळपास ३४ वर्षांनी देशाचं 'नवं राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' हे इस्रोचे माजी संचालक व विख्यात अंतराळशास्त्रज्ञ के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील एका तज्ज्ञ समितीनं तीन वर्षं परिश्रम करून, तसंच शैक्षणिक क्षेत्रातील सर्व संबंधितांशी व्यापक विचारविनिमय आणि सल्ला-मसलत करून तयार केलं आहे. जग चौथ्या औद्योगिक क्रांतिपर्वात पुढे चाललं आहे. अशा वेळी नव्या युगासाठी, तंत्रज्ञानाधिष्ठित जागतिक बदलांना देशाला सज्ज करण्यासाठी आणि त्याच वेळी भारताची सामाजिक-आर्थिक परिस्थिती पाहता व भारतीय संविधानिक मूल्ये लक्षात घेऊन 'नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०'ला केंद्रानं मंजुरी दिली. महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन शिक्षणात के. कस्तुरीरंगन समितीनं मूलभूत बदल सुचवले आहेत. प्रत्येक तरुणाची बौद्धिक, भावनिक, सामाजिक प्रगती होण्याच्या दृष्टीनं बहुशाखीय शिक्षणप्रणाली त्यांनी प्रस्तावित केली आहे. कला, वाणिज्य व विज्ञान हे आजचे परस्परांत भिंती असणारे फरक नष्ट करत विद्यार्थी आपल्या कला, आवड आणि करिअरचा विचार करून विषय निवडू शकतात, त्यामागे त्याला किंवा तिला करिअरच्या एकापेक्षा जास्त क्षेत्रात संधी उपलब्ध होऊ शकेल, हा या मागचा स्वागतार्ह विचार आहे. तसंच कॉलेज शिक्षणात बहुविध प्रवेश व बहुविध निर्गमनाच्या संधी पूर्ण केलेल्या कालावधीच्या शिक्षणाशी सुसंगत पदवी वा पदविका मिळण्याची व्यवस्था निर्माण करण्याची शिफारस पण महत्त्वाची आहे. नव्या शिक्षण धोरणाचा केंद्रबिंदू, शिक्षक व त्याचं प्रशिक्षण आहे. त्यामुळे ही शिफारस खूप अर्थपूर्ण व शिक्षण क्षेत्रात नवं 'मन्वंतर' घडवून आणणाऱ्या क्षमतेची आहे.

**बीजशब्द-** शिक्षण, प्रशिक्षण ,धोरण, राष्ट्रीय, संधी, शिक्षक, विद्यापीठ

## प्रस्तावना-

1947 मध्ये या देशात केवळ वीस विद्यापीठे व 294 महाविद्यालय होती. आज 75 वर्षांनंतर ही संख्या जवळपास 1000 विद्यापीठे व 39931 महाविद्यालय आणि 10625 स्वायत्त संस्था मिळून 3.74 करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून उच्च शिक्षणावर अनेक समित्या नेमण्यात आल्या. अनेक अहवालही देण्यात आले. आम्हाला अपेक्षित असलेले उच्च शिक्षण अपेक्षित असलेला सुशिक्षित माणूस एखादा महाविद्यालय किंवा एखादे विद्यापीठाला निर्माण करता आला नाही. हेच आमचे आज सर्वात मोठे अपयश आहे. माणसाचे व्यक्तिमत्व घडविणे हा शिक्षणाचा मूळ उद्देश असतो. उच्च शिक्षणाबद्दल राधाकृष्णन यांच्या अहवालानुसार असे सांगण्यात आले की, उच्च शिक्षण हे

महाविद्यालयात मिळाले पाहिजे व त्यावर विद्यापीठाची देखरेख असली पाहिजे. विद्यापीठातील शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हे तेथील अधिकाऱ्यांच्या हातात असले पाहिजे. शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात पक्षपाती राजकारण किंवा समाजकारण आणणे अनिष्ट ठरेल. आजचे विदारक चित्र पाहता असे दिसून येते की, याउलट आज विद्यापीठे व महाविद्यालय राजकारण्यांचे अड्डे निर्माण झाले आहेत. शिक्षण संस्थांना व्यापारी व बाजारू स्वरूप आल्यामुळे गुणवान बुद्धिवान विद्यार्थी निर्माण करणे ऐवजी व्यापारी व बाजारू विचारसरणीच्या नव्या पिढ्या निर्माण होत आहेत. प्रचंड पैसा देऊन शिक्षण खरेदी करणारे ग्राहक प्रवृत्तीचे विद्यार्थी आज निर्माण होत आहेत. देणगी वर आधारित आपले शिक्षण पद्धतीने मानवत असल्यामुळे भ्रष्टाचार राष्ट्रद्रोह व विध्वंसक अशा प्रकारची एक नवीन शैक्षणिक संस्कृती नव्याने निर्माण होत आहे हे चित्र निश्चितच भयावह व विदारक आहे.

आमची विद्यापीठे व महाविद्यालय ज्ञानाचे केंद्र होण्याऐवजी केवळ परीक्षा घेण्याचे केंद्र होऊन बसले आहेत. कालबाह्य व विदेशात जे 50 ते 60 वर्षांपूर्वी शिकवले गेले तेच तेच व जुनाट अनावश्यक असे अभ्यासक्रम राबविले जात आहेत. त्याच अभ्यासक्रमावर वर्षांवर्षी तेच तेच प्रश्न विचारून तोंडपाठ उत्तरे लिहिणाऱ्या पोपटपंची व बौद्धिक दृष्ट्या अपंग पिढ्या निर्माण करीत आहोत. मानवी विकास प्रक्रियेतील शिक्षण हा एक अतिशय महत्त्वाचा घटक आहे. सुसंस्कृत नागरिक घडविणे हा शिक्षणाचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. परंतु शिक्षण घेणे म्हणजे फक्त पदव्या मिळविणे या अर्थानेच शिक्षणाकडे केवळ पाहिले गेल्यामुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेलाच वेगळे वळण लागले आहे. नोकरी मिळविण्यासाठी किंवा रोजगार मिळविण्यासाठी पदवी महत्त्वाची आहे. त्यातही सरकारी नोकरीसाठी तर पदवी फारच महत्त्वाची आहे. तेव्हा काहीही करून पदवी मिळवायचीच असा दृष्टिकोन बळावला गेला आहे. व्यावसायिक शिक्षणासाठी ही चांगले गुण मिळाले पाहिजेत या दृष्टीने परीक्षांना महत्त्व प्राप्त झाले. त्यासाठी अभ्यास करणे ट्युशन लावणे यासारख्या प्रयत्नांबरोबरच परीक्षांमधील गैरमार्गाचे प्रकारे वाढू लागले. शासन, शाळा, महाविद्यालय, बोर्ड किंवा विद्यापीठांनी हे प्रकार रोखण्यासाठी अनेक वेगवेगळ्या उपाययोजना केल्यात. नवनिर्माण कार्यासाठी समाजाच्या व देशाच्या प्रगतीसाठी आणि स्वतःच्याही प्रगतीसाठी, स्वतःची व्यक्तिमत्व घडविण्यासाठी ही पिढी खरोखरच सक्षम होईल काय? दहावी बारावीच्या परीक्षा म्हंटल्या की दोन भिन्न पातळ्यांवरील लढाई सुरू होते. एक म्हणजे अधिकाधिक गुण मिळवून यशाची शिखरे पादक्रांत करणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि दुसरी किमान पास होण्यासाठी काहीही करण्याची तयारी असलेल्यांची. परीक्षांमध्ये होणारे प्रकार रोखण्यासाठी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ आहे. गेल्या काही वर्षापासून युद्ध पातळीवर उपाययोजना करत आहेत. बारकोड पद्धतीच्या माध्यमातून उत्तर पत्रिका तपासण्याचे प्रक्रिया सुधारण्यात आली आहे. त्यामध्ये होणाऱ्या मानवी चुका टाळून अचूक निकाल लावण्यासाठी बारकोड उपयुक्त आहे. आता बहुसंख्य प्रश्नपत्रिकांच्या माध्यमातून वर्गांमध्ये होणारी कॉपी रोखण्यासाठी पावले उचलण्यात आली आहे. बैठकी पथके, भरारी पथके, व्हिडिओ चित्रीकरण करणारी पथके, अशा उपाययोजना करून गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांना रंगी हात पकडण्यासाठी मोठ्या संख्येने अधिकारी नेमण्यात येत आहे. याही परिस्थितीत उच्च महाविद्यालयात मोठमोठ्या कंपन्यांना बोलावून आपल्या विद्यार्थ्यांचे करिअर साठी प्रयत्न करीत आहे. त्यांना हव्या असलेल्या उमेदवारांची निवड करण्यासाठी महाविद्यालयांमध्ये किंवा मोठ मोठ्या शिक्षण संस्थांमध्ये कॅप्स इंटरव्यू आयोजन करू लागलेले आहेत. या उमेदवारानी आपली गुणवत्ता चांगल्या प्रकारे सिद्ध करू शकेल, त्यालाच चांगल्या रोजगाराची संधी मिळू शकेल.

## गृहितकृत्ये-

**1)** नविन शैक्षणिक धोरणामुळे शैक्षणिक क्षेत्रात आमुलाग्र परिवर्तन होत आहे.

2) या धोरणामुळे शिक्षकांवर कामाचा व्याप वाढला आहे.

3) नविन शैक्षणिक धोरण बेरोजगारी कमी करण्यास सहायभूत ठरणार ठरते

4) नविन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळते

## संशोधन पद्धती-

प्रस्तूत शोध प्रबंध कार्यासाठी प्रामुख्याने द्वितियक सामुग्री संग्रहन पध्दतीचा वापर केला आहे. यामध्ये विषयावर लिहलेले लेख, मासिके व वेब पेज चा वापर करण्यात आला आहे.

## विषय विवेचन-

शिक्षण आणि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मागच्या 40-50 वर्षात जेवढा शिक्षणाचा तथाकथित विकास झाला, तेवढा इतर कोणत्या क्षेत्राचा विकास झालेला नाही हे खरे आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा खालावतो आहे. आज आपली जी शिक्षण व्यवस्था आहे त्यात खूपच सुधारणा करण्याची गरज आहे. कालबाह्य झालेला अभ्यासक्रम मूल्यमापनासाठी केवळ परीक्षा व परीक्षांमध्ये मिळणारे गुण एवढेच घटक आजच्या शिक्षणात दिसून येतात. आजची व्यवस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवू शकणार नाही. आजच्या जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या युगात हे शिक्षण टिकाव धरू शकेल काय? रोजगाराच्या संधी यापुढील काळात व पदवीच्या प्रमाणपत्रावर किती प्रमाणात मिळू शकणार आहेत? आता सरकारी नोकरीच्या रूपाने मिळणारा रोजगार ही संकल्पना कालबाह्य होत आहे. सुरक्षित नोकरी हा प्रकार यापुढील काळात टिकणारा नाही. रोजगार आता स्वप्रयत्नाने मिळवावा लागणार आहे, व तो मिळविण्यासाठी वशीला हा घटक उपयुक्त ठरणार नाही. तर त्यासाठी गुणवत्ता आणि कार्यक्षमता हेच घटक सर्वात महत्त्वाचे ठरणार आहेत. म्हणून गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढविण्याचेच शिक्षण यापुढील काळात द्यावे लागणार आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवनाचे संदर्भ बदलू लागलेले आहेत. एक नवी समाज व्यवस्था आकार घेत आहे. शिक्षणासारख्या क्षेत्रातही परिवर्तन होत आहे. प्रचलित शिक्षण व्यवस्थेत अनेक त्रुटी आहेत. शिक्षण जागतिकीकरणाच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांना सक्षम बनवू शकेल का? या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या त्रुटी पुढे आलेल्या आहेत. आपण एका बाजूला देशाला आर्थिक महासत्ता बनविण्याची भाषा बोलतो. त्यासाठी मानवी विकासाच्या शिक्षणासह सर्व अंगांचा विकास होणे आवश्यक आहे. आज घडीला भारतातील शिक्षण पद्धती ही जगातील सर्वात मोठी शिक्षण यंत्रणा आहे असे निदर्शनास आले आहेत. त्याचबरोबर जगातील संपूर्ण निरक्षरांपैकी 50% निरक्षर लोक याच देशात आहेत. असेही एका पाहणी वरून आढळून आले आहे. अशा परिस्थितीत भारतातील उच्च शिक्षणाचा झालेला तथाकथित विकास हा फोल ठरणार आहे. असेच म्हणावे लागेल. भारतात मात्र एका बाजूने शिक्षणाचा तथाकथित विकास झाला आणि दुसऱ्या बाजूने आजही विकसनशील राष्ट्र म्हणूनच आपली गणना होते. गॅट करारानुसार आता जगाची वार्षिक उलाढाल जागतिक पातळीवर होत आहे, आणि हे आर्थिक उलाढाल उत्पादकाशी व उद्योजकतेची जोडलेल्या त्या त्या देशातील ज्ञान व तंत्रज्ञानाच्या कसोटीवर अवलंबून आहे. जपान सारखी घड्याळे व दूरदर्शन संच किंवा कोरिया सारखे कॅमेरे व सूक्ष्मदर्शक यंत्र आणि दुर्बिनी या भारतीय उद्योजकांकडून निर्माण केल्याशिवाय त्यांना भारतीय बाजारपेठेत सुद्धा आपला माल विकता येईल की नाही हा प्रश्न आज उद्योजकांसमोर आहे. त्यामुळेच आज प्रत्येक उद्योजक

व खाजगी कंपन्या अनेक बहुउद्देशी व विदेशी कंपन्यांकडून सहकार्याचा हात मागत आहेत. शिक्षण विकासापासून किंवा उद्योजकता व उत्पादन क्षमतेपासून वेगळी करता येत नाही. अमेरिका व जपान सारख्या देशाचा उद्योग विकासच मुळी शिक्षणातून झाला आहे. उत्पादनाचा दर्जा ही त्या त्या देशातील तंत्रज्ञ व कुशल कामगारांवर अवलंबून असतो. असे जपानने अमेरिकेतील बाजारपेठ काबीज करताना दाखवून दिले आहे. अशा परिस्थितीत भारतात आता खऱ्या अर्थाने बाजारपेठ आणि भारतातील उत्पादित मालांबरोबर स्पर्धा करायची असेल तर त्याला जागतिक पातळीवर लागणारे तंत्रज्ञान व कौशल्य निर्माण करणे अपरिहार्य ठरते. विकसित देशाच्या तुलनेत या स्पर्धेत भारतासारख्या विकसनशील देशाचा टिकाव लागणे कठीण आहे. भारतातील एकूण जनता व मनुष्यबळ लक्षात घेऊन केवळ व्यापार हाच उद्देश ठेवून उद्योजकता, उत्पादकता अशा एका व्यापारी शिक्षणाची नवी पद्धती जगातील उद्योजकांना भारतात निर्माण करावयाची आहे. उत्कृष्ट माल, स्वस्त वस्तू व जास्त नफा असे व्यापाराचे तत्व असते. आणि हेच तत्व त्यांना भारतात व्यापारासाठी लागू करावयाचे आहे. केवळ याच उद्देशाने भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रातील संबंधितांशी व विद्यापीठ अनुदान आयोगाबरोबर जगातील काही खाजगी कंपन्या शिक्षणाच्या जागतिकीकरणावर विचार करीत आहेत. शिक्षणाचा व विकासाचा कधी थेट सांधा न जोडल्याने विदेशी कंपन्यांबरोबर शिक्षणाचे खाजगीकरण व जागतिकीकरण हे पर्याय आले आहेत. मात्र अशा शिक्षण पद्धतीत भारताला हस्तक्षेय सूचना करण्याचे किती अधिकार राहणार आहेत. हा संविधानात्मक प्रश्न निर्माण झाला आहे. आजच्या भारतातील शिक्षण पद्धतीतील पारंपारिकता किती उपयोगी आहे. चार भिंतीच्या आत खूपच भरलेल्या विद्यार्थ्यांसमोर पुस्तकी ज्ञानाचे केवळ डोज पाजायचे नंतर तीन तासात पोपटपंची करून मिळालेल्या माहितीवर प्रश्नपत्रिका देऊन गुणवत्तेचे दाखले देणे बंद केले पाहिजे. शिक्षण हे संपूर्ण शिक्षण ज्यात बुद्धी, हात, आणि हृदय याचा विकास होईल असे शिक्षण देणे गरजेचे आहे. बुद्धीच्या विकासाने विद्वत्ता, हाताच्या कौशल्याने कुशलता आणि हृदयाच्या विकासाने मानसिकता अशा त्रिस्तरीय शिक्षणाची आज आवश्यकता आहे. ज्ञानाच्या व तंत्रज्ञानाच्या कक्षा वाढत आहे. कालचे विशेष ज्ञान आजचे सामान्य ज्ञान म्हणत आहे. भारतीय मातीच्या गरजा लक्षात घेऊन शिक्षणाची उद्दिष्टे ठरवून शिक्षणाला गुंतवणूक म्हणून त्याचा उपयोग आर्थिक विकासासाठी आणि एकंदर राष्ट्र उभारणीसाठी करायला हवा. त्यासाठी विद्यापीठाने अभ्यासक्रमातील आमुलाग्र बदल, अध्यापन पद्धतीतील आवश्यक परिवर्तन, शिक्षकांचे वेळोवेळी मूल्यमापन, महाविद्यालयाचे अत्याधुनिकीकरण, अनुदानाची सोय व व्यवस्थापकीय सोयी सुविधांचा विचार करणे गरजेचे आहे. पाश्चात्य देशांच्या धरतीवर आता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून देशातील सर्वच विद्यापीठातून गुणवत्तेच्या संदर्भात असे पाऊल उचलले गेले, तर देशाच्या विकासाला वेळ लागणार नाही हे निश्चित. अर्थातच त्याच अनुषंगाने आज नवीन शैक्षणिक धोरण 2020 होऊ घातली आहे.

## नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-

नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांना एकांगी शिक्षणाकडून बहुमुखी शिक्षणाकडे नेणारे आहे. हे धोरण म्हणजे शिक्षण क्षेत्राला नवे वळण देणारा मैलाचा दगड ठरणार आहे. सुमारे ३५ वर्षांनंतर हे नवे धोरण तयार करण्यात आले आहे. देशातील युवा पिढीच्या आकांक्षा आणि त्यांचे हित लक्षात घेऊन, जग चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या उंबरठ्यावर असताना, वेगाने बदलत असलेली जागतिक आर्थिक रचना आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संधी यांना तत्परतेने प्रतिसाद देणारे हे धोरण असल्याने त्याकडे वेगळ्या दृष्टीने बघितले पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञानात्मक प्रगतीबरोबरच त्यांच्या बौद्धिक, सामाजिक, भावनिक प्रगतीचा देखील विचार नव्या धोरणात करण्यात आला आहे. या धोरणानुसार बहुशाखीय शिक्षण हे महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षण रचनेचे वैशिष्ट्य आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन हा विद्यापीठाच्या कामाचा मूळ गाभा राहील. त्यामुळे संशोधन, शिक्षण व सर्वसाधारण अभ्यासक्रम अशा विषयांसाठी स्वतंत्र विद्यापीठे अस्तित्वात येणार आहेत. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांऐवजी यापुढे पदवी देण्याचे अधिकार असलेली महाविद्यालये अस्तित्वात येतील अशी नवी रचना या शिक्षण धोरणात समाविष्ट आहे. केंद्र सरकारच्या कायद्याद्वारे 'नॅशनल रिसर्च फाऊंडेशन' स्थापन करण्यात येणार आहे. त्या माध्यमातून प्राध्यापक वर्गाला संशोधनासाठी प्रोत्साहन देण्यात येणार असून आर्थिक पाठबळदेखील दिले जाईल.

सर्व आव्हानात्मक परिस्थितीत काम करू शकणारे विद्यार्थी घडावेत असे परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण आयोग स्थापन करण्यात येणार आहे. या आयोगाच्या धर्तीवर राज्य सरकारे राज्य शिक्षण आयोग स्थापन करु शकतील. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच देण्यावर नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात भर देण्यात आला आहे. तसेच भाषांच्या शिक्षणासाठी मातृभाषा, इंग्रजी आणि प्रादेशिक भाषा असे त्रिभाषिय सूत्र तयार करण्यात आले आहे.

## महत्त्वाचे टप्पे-

1) हे धोरण जाहीर झाल्यापासून गेल्या १६ महिन्यांमध्ये कोरोना महामारीचा सामना करत या धोरणामधील काही महत्त्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणातील ध्येये आणि दृष्टीकोन याबाबत विविध भागधारकांमध्ये जागरूकता आणि हितसंबंध निर्माण करण्याच्या दृष्टीने सरकारने चांगली कामगिरी बजावली आहे.

2) पंतप्रधान आणि इतर प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती असलेल्या दहा दिवसीय शिक्षक पर्वातून ही बाब प्रकर्षाने दिसून आली. याही पुढे जाऊन सरकारने मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय असे केले आहे. ऊर्जा मंत्रालयात मोठे परिवर्तन घडून आणणा-या धर्मेंद्र प्रधान यांना शिक्षण मंत्रालयात आणल्यामुळे या मंत्रालयाला एक वेगळीच ऊर्जा प्राप्त झाली आहे.

3) नव्या शैक्षणिक धोरणानुसार नव्या आर्थिक धोरणामध्ये मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. काही राज्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. तसेच शिक्षण मंत्रालयाने बहुचर्चित अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट हा उपक्रम आणला आहे. या उपक्रमाद्वारे उच्च शिक्षणातील अनेक पर्याय विद्यार्थ्यांसाठी खुले होऊ शकतील.

4) या उपक्रमांची अंमलबजावणी सत्ताधारी पक्षांची ज्या राज्यांत सत्ता आहे अशा मूठभर राज्यांतच करण्यात आली आहे. २४ ऑगस्टला नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणारे कर्नाटक हे पहिले राज्य ठरले आहे. अलीकडेच नव्या शैक्षणिक धोरणातील काही उपक्रमांची अंमलबजावणी मध्यप्रदेश आणि हिमाचल प्रदेश या राज्यांनी करून या मेगा पॉलिसीच्या अंमलबजावणीला हातभार लावलेला आहे. आता खऱ्या अर्थाने नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जोर धरला आहे असे म्हणता येईल.

## महत्त्वाची आव्हाने-

सध्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जरी जोर धरलेला असला तरीही ते पूर्णत्वाला जाण्याच्या मार्गावर अनंत आव्हाने आहेत. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविधता आणि आकार लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी हे एक अवघड काम असणार आहे.

उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे. एआयएसएचई २०१९ च्या अहवालानुसार, भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जवळपास १००० विद्यापीठे, ३९,९३१ महाविद्यालये आणि १०,७२५ स्वायत्त संस्थांमध्ये मिळून ३.७४ करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावरील सर्व भागधारकांना एकत्र आणून या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे ही एक अत्यंत कठीण बाब ठरणार आहे. विलक्षण विविधता असलेल्या राज्यांमधील तसेच जिल्हास्तरावरील विविध भागधारकांमध्ये सामायिक जबाबदारी व मालकीची भावना निर्माण करणे हे शिक्षण मंत्रालयासाठी मोठे आव्हान असणार आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी देशांच्या, राज्यांच्या आणि सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून आहे. भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निधीची कमतरता आहे, संपूर्ण व्यवस्था ही नोकरशाहीवर आधारलेली आहे व नवीन कल्पना आणि वाढीच्या क्षमतेस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे असे के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने निदर्शनास आणून दिले आहे. नव्या शैक्षणिक धोरणामध्ये कल्पना केलेल्या परिवर्तनांच्या विशालतेला चालना देण्यासाठी शिक्षण मंत्रालये (केंद्र आणि राज्ये) आणि इतर नियामक संस्थांमधील अंतर्गत क्षमता अत्यंत अपुरी आहेत. उदाहरणार्थ, पारंपरिक शिक्षणाकडून प्रयोगात्मक शिक्षण व टिकात्मक विचारापर्यंत जाण्यासाठी ही शिक्षण व्यवस्था चालवणाऱ्या लोकांच्या व सोबतच शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या दृष्टिकोनात बदल होणे गरजेचे आहे.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या दस्तऐवजामध्ये विद्यमान नियामक व्यवस्थेत सर्वसमावेशक व आमुलाग्र बदल घडवून आणण्याचा मार्ग आखण्यात आला आहे ही एक आशादायक बाब आहे. शिक्षण मंत्रालय सध्या भारत उच्च शिक्षण आयोगाच्या स्थापनेसाठी एक कायदा आणण्याच्या प्रयत्नात आहे. यूजीसी, एआयसीटीई आणि राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषदेच्या जागी भारत उच्च शिक्षण आयोग स्थापन करण्याचा विचारात सरकार आहे.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे धोरण मुख्यत्वे केंद्र आणि राज्यांमधील सहकार्यावर अवलंबून असणार आहे. या धोरणाचा मसुदा केंद्र सरकारने राज्य सरकारांसह विविध भागधारकांच्या योगदानातून तयार केला असला तरी त्याची अंमलबजावणी मुख्यत्वे राज्यांच्या सक्रिय सहकार्यावर अवलंबून आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बहुतांश सेवांवर आधारित शैक्षणिक उपक्रम राज्य सरकारांकडून चालवले जातात.

तामिळनाडू राज्याने नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी न करण्याची भूमिका अनुसरली आहे. अशीच भूमिका जर इतर राज्यांनीही घेतली तर केंद्राच्या चिंतेत वाढ होऊ शकते. त्यामुळे केंद्राकडून संघराज्याची समीकरणे कशाप्रकारे हाताळण्यात येत आहेत यावर नव्या शैक्षणिक धोरणाचे भवितव्य ठरणार आहे.

चौथी महत्त्वाची बाब म्हणजे या धोरणाच्या दृष्टीने खाजगी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. भारतातील जवळपास ७० टक्के उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था या खाजगी आहेत. तसेच एकूण संख्येच्या जवळपास ६० ते ७० टक्के विद्यार्थी खाजगी संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेत आहेत. खाजगी क्षेत्र आर्थिक संसाधने व नावीन्यपूर्ण कल्पना प्रदान करतात याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या धोरणाच्या प्रक्रियेसाठी खाजगी क्षेत्राचे योगदान मिळवणे व यातील एक महत्त्वाचा भागीदार म्हणून खाजगी क्षेत्राच्या योगदानाला मान्यता देणे ही एक महत्त्वाची बाब आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विविध उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी येत्या दशकात पुरेल अशा संसाधनांची गरज लागणार आहे. नव्या धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाला शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण उत्पन्नाच्या ६ टक्क्यांपर्यंत वाढवावा लागेल. भूतकाळात देण्यात आलेली आश्वासने आणि त्यांची प्रत्यक्ष पूर्तता हे नक्कीच कठीण काम आहे. शिवाय शिक्षणावरील खर्चात वाढ होणे अपेक्षित आहे. परंतु असे निदर्शनास आले की, हे नवे शैक्षणिक धोरण आले त्यावर्षी शिक्षणावरील खर्च हा सर्वात कमी होता. २०२०-२१ मध्ये शिक्षणावरील खर्च ९९,३११ कोटींवरून २०२१-२२ मध्ये ९३,२२४ कोटी इतका कमी झाला. कोरोना आणि आर्थिक संकटामुळे सरकारने आरोग्य क्षेत्रात अधिक खर्च करणे पसंत केले, त्यामुळे शिक्षण क्षेत्रावरील खर्चात कपात झाली याबाबत दुमत नाही. पण येत्या काळात शिक्षणावरील खर्च कसा वाढवता येईल यासाठी कोणतीही योजना सरकारकडे नाही.

## निष्कर्ष व मूल्यमापन-

नवे शैक्षणिक धोरण २०२० हा नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे. नव्या युगातील नवी आव्हाने लक्षात घेता विविध शैक्षणिक गरजा, संरचनात्मक असमानता आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यामध्ये येणाऱ्या समस्यांचे निराकरण हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षण व्यवस्थेतील अनेक संकटांना तोंड देण्याचे सर्वात आव्हानात्मक कार्यही या धोरणाद्वारे पूर्ण करायचे आहे. भारताच्या अफाट लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्याद्वारे असंख्य रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या धोरणाच्या अंमलबजावणीवर ठरणार आहे. कोविड महामारीच्या काळात जलद पावले उचलून अवघड निर्णय घेऊन ते पूर्तीस नेण्याचे कौशल्य केंद्राने दाखवले आहे. याच कौशल्याचा फायदा शिक्षण क्षेत्रातही होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी काही राज्यांनी केली आहे तर काही राज्ये त्या प्रक्रियेतून जात आहेत. तरीही अजून लांबचा पल्ला गाठायचा बाकी आहे.

राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील विविध भागधारकांना तसेच खाजगी क्षेत्राला या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेणे हे एक अवघड काम आहे. सोबतच क्षमता, आर्थिक संसाधने तसेच नवीन कल्पना निर्मितीसाठीच्या अनुकूल वातावरणाची कमतरता ही आव्हानेही समोर आहेत. परंतु या सर्वांमध्ये विविध राज्यांमध्ये जनमत तयार करणे हे सर्वात कठीण काम आहे. थोडक्यात सांगायचे तर नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे यश सहकारी संघराज्य प्रणाली व सुधारणांमध्ये योगदान देण्याची राज्यांची क्षमता यांवर अवलंबून आहे. त्याचबरोबर नविन शैक्षणिक धोरणामुळे शैक्षणिक क्षेत्रात आमुलाग्र परिवर्तन होत आहे. हे गृहित बरोबर असल्याचे दिसते. व या धोरणामुळे शिक्षकांवर कामाचा व्याप वाढला आहे. पण तो सकारात्मक आहे. या धोरणामुळे विद्यार्थ्यांना आपल्या विषयासोबतच नविन विषय निवडण्याची मुभा असल्याने, किंवा व्यावसायिक विषयाची निवड करण्याची संधी उपलब्ध् झाल्याने, कौशल्याचा विकास झाल्याने विद्यार्थ्यांना मध्ये असलेले निराशेचे वातावरण् संपुष्टात येवून शैक्षणिक धोरण बेरोजगारी कमी करण्यास सहायभूत ठरणार आहे.

## संदर्भ-

1) मासिक योजना

2) वेब पेज

3) दैनिक - लोकसत्ता

❖❖❖

# नवीन शैक्षणिक धोरण 2020: एक आकलन

**प्रा. डॉ. अरुण शेंडे**
सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ, महाराष्ट्र (India)
Email- arundshende@gmail.com Mob. 9623433438

भारताला शिक्षणाची प्राचीन परंपरा आहे. गुरुकुलाच्या माध्यमातून त्यावेळी शिक्षण दिले जायचे. ऋषीमुनींच्या आश्रमातून मुले वेदांचा अभ्यास करायचे, याबरोबरच नीतीशास्त्र, युद्धकला व राजनीतीचे देखील धडे गुरुच्या आश्रमातून दिले जायचे. त्याकाळी गुरुला फार महत्वाचे स्थान होते राजदरबारात देखील गुरुंचा सल्ला हा महत्वाचा मानला जायचा त्यामुळे गुरु आज्ञा न पाळणे म्हणजे पाप असे समजले जाई.

भारतात नालंदा, तक्षशीला अशी प्राचीन विद्यापीठे होती. या विद्यापीठातून प्राचीन इतिहासाचे शिक्षण दिले जायचे. अनेक विदवानांचे ग्रंथदेखील येथील ग्रंथालयात संग्रही होते. काळाच्या ओघात ही विद्यापीठे ही नष्ट झाली. परंतु भारताला पारंपारीक शिक्षणाचा वारसा आहे हे मान्य करावे लागेल.

## भारतातील शैक्षणिक सुधारणा:

भारत स्वतंत्र झाल्यानंतर शैक्षणिक सुधारणा करणे गरजेचे होते. शिक्षणामध्ये आधुनिकता आणने गरजेचे होते, म्हणुन भारत सरकारने वेळोवेळी वेगवेगळ्या अभ्यासगटाच्या माध्यमातून अभ्यास केला व शैक्षणीक सुधारणा केल्या. शैक्षणिक सुधारणेच्या अनुषगांने खालील आयोगाचे वा समित्यांचे गठन करण्यात आले.

विद्यापीठ शिक्षण आयोग (1948) भारत स्वतंत्र झाल्यानंतर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तुत आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगाने आपला अहवाल 1949 मध्ये सादर केला. स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील उच्च शिक्षणाला दिशा देण्याचे काम या आयोगाने केले.

- **मुदलीयार आयोग (1952)**

माध्यमीक शिक्षणाची पुन:रचना करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने आपला अहवाल 1953 ला शिफारसीसह शासनाला सादर केला.

- **भारतीय शिक्षण आयोग (कोठारी आयोग):** 1964 डॉ. डी. एच. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तुत आयोगाची स्थापना 16 फेब्रुवारी 1983 ला करण्यात आली. म्हणजेच भारताने वेगवेगळ्या आयोगांची स्थापना करुन कालसाक्षेप शिक्षणव्यवस्थेमध्ये सुधारणा करुन शिक्षणाचा आकृतीबंध देखील मांडला.

- **नवीन शैक्षणिक धोरण:2020**

शिक्षण व्यवस्था अधिक लवचिक बनवण्याच्या दृष्टीने आवश्यक ते बदल करत केंद्र सरकारने नव्या शिक्षण धोरणाला मंजुरी दिली आहे. यात शिक्षण व्यवस्था बहुविविध, बहुभाषीक करण्याकडे अधिक भर देण्यात आला आहे. जीडीपीचा 6 टक्के इतका निधी शिक्षणासाठी देण्याची व्यवस्था या नव्या धोरणात

नमूद करण्यात आली आहे. या नवीन शैक्षणीक धोरणाच्या निमीत्ताने शिक्षण धोरण अद्ययावत करण्याच काम केंद्र सरकारने केल आहे. केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर व मनुष्यबळ विकासमंत्री रमेश पोखरियाल यांनी कॅबिनेटसमोर ह्या धोरणाचा मसुदा मांडला. इस्त्रोचे माजी प्रमुख के कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली समितीने या धोरणाचा मसुदा तयार केला.

- **नविन शैक्षणिक धोरणाची ठळक वैशिष्टये:**

1. तीन ते चौदा वर्षे वयोगटाचे विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आले आहेत.
2. बोर्ड ची परीक्षा फक्त 12 वी च्या वर्गाला असेल
3. महाविद्यालयीन पदवी चार वर्षाची असेल
4. दहावी मंडळ रद्द एस. एस. सी. ची परीक्षा होणार नाही.
5. संशोधन करु इच्छिणाऱ्याकरीता तीन वर्षाची पदवी अधिक एक वर्षाचा मास्टर्स अभ्यासक्रम अशी चार वर्षाची पदवी असेल. यानंतर ते थेट पी. एच. डी. करु शकतील.
6. एकाचवेळी वेगवेगळे विषय एकत्रीतपणे शिकता येणार आहे.
7. आवडीचा विषय शिकण्याची संधी या शैक्षणीक धोरणाने दिली आहे.
8. लॉ आणि मेडीकल शिक्षण वगळता उच्च शिक्षण एका छताखाली येणार

- **नवीन शैक्षणिक धोरणानुसार आकृतीबंध**

**5 वर्षे मुलभूत शिक्षण (Fundamental)**

| | | |
|---|---|---|
| 1. नर्सरी -4 वर्षे | 2. ज्यु. के. जी-5 वर्षे | 3. सिनी. के. जी. -6 वर्षे |
| 4. इयत्ता 1 ली - 7 वर्षे | 5. इयत्ता 2 री -8 वर्षे 3 वर्षे पूर्वतयारी (preparatory) | |
| 6. इयत्ता 6वी : 12 वर्षे | 7. इयत्ता 10वी:13 वर्षे | 8. इयत्ता 8 वी: 14 वर्षे 3 वर्षे |

**माध्यमिक (middle)**

| | | |
|---|---|---|
| 9. 6 वा वर्ग :12 वर्षे | 10. 7वा वर्ग :13 वर्षे | 11. 8 वा वर्ग : 14 वर्षे |

**4 वर्षे उच्च माध्यमीक**

| | | |
|---|---|---|
| 12. इयत्ता 9 वी -15 वर्षे | 13. इयत्ता 10 वी - 16 वर्षे | 14. एफ. वाय. जे. सी. 18 वर्षे |
| 15. एफ. वाय. जे. सी. 19 वर्षे | | |

## विश्लेषण :

नवीन शिक्षण धोरण 2020 हे भारतीय इतिहासामध्ये महत्वपुर्ण क्रांती आहे, असे म्हणावे लागेल कारण 34 वर्षानंतर अशा प्रकारचे धोरण तयार होण व ते लागु होण त्यामुळे ते स्वागतार्ह आहे. कारण परिस्थिती सापेक्षा धोरणांमध्ये बदल करणे देखील गरजेचे आहे. जग आता माहिती तंत्रज्ञानाच्या उंबरठ्यावर पोहोचल आहे. माणुस आता विश्वात्मक झाला आहे. शिक्षण हे माणसाला दिशा देणार आहे. शिक्षणाने माणुस सर्जनशील होतो. त्याच्यामध्ये वेगवेगळे कौशल्ये देखील वृद्धींगत होतात. भारत हा जगात महासत्ता होणार हे विद्वानांचे भाकीत आहे. अशा स्थितीत नवीन शैक्षणीक धोरण 2020

जागतीक समाजासमोर, विज्ञान,तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने मजबूत राहील या दृष्टीने विद्यापीठ, शिक्षणसंस्था व शासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे. नवीन शिक्षण धोरणामधील खालील मुद्यांच्या अनुषंगाने देखील चर्चा करणे गरजेचे आहे.

### 1) प्राचीन भारतीय भाषांना प्रतिष्ठा

नवीन शिक्षण धोरणाने भारतातील प्राचीन भारतीय भाषांना प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली अस म्हणायला हरकत नाही, खरेतर जागतीकीकरणाच्या प्रवाहात आपण आपल स्वत्व विसरुन गेलो होतो. जगा सोबत स्पर्धा करायची असेल तर इंग्रजी भाषा गरजेची आहे. त्यामुळे मुलगा 3 वर्षाचा झाला की, त्याला प्ले स्कूलमध्ये दाखल केले जाते, इंग्रजीचा भाडीमार सुरु केला जातो. ज्या प्रदेशात ते बाळ जन्मले. ज्या प्रादेशीक भाषेतून त्या मुलांवर संस्कार झाले. पुढे पुढे ते संस्कार खोडले जातात. शाळांमधून त्याला इंग्रजी बोलण्याची सक्ती केली जाते. तो मातृभाषेपासून पारखा होतो. आपल्या आश्रम पध्दतीतून शिक्षणाचे जे प्रयोग केल्या गेले त्याआधारे राष्ट्रपीता महात्मा गांधी म्हणतात. " जो मुलगा मातृभाषेतून शिक्षण घेतो, त्याला आकलन चांगले होते व कुठलीही ऐत देशीय भाषा शिकायची असेल तर, त्याचे मुळ हे मातृभाषेत आहे. उदा. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी व मग मातृभाषा ज्याला चांगली जमते, तो इंग्रजी भाषेवर देखील आपले प्रभुत्व निर्माण करतो.

नशैधो 2020 ने अशा भारतातील प्राचीन भाषांना प्रतिष्ठा प्राप्त होणार आहे. संस्कृत ही भारताची प्राचीन भाषा आहे. तेव्हा ह्या भाषेला देखील अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न या शैक्षणीक धोरणांमधुन केला जाणार आहे. असे जरी असले तरी कोरीयन, जपानी, थाई, फ्रेंच, जर्मन, स्पॅनीश, पोर्तुगीज आणि रशीयन भाषा देखील भारतीय विद्यार्थ्यांना शिकता येणार आहे.

### 2) पाश्चात्य प्रभावापासुन थोडे दूर :

विद्यार्थ्यांना पाश्चात्यांच्या प्रभावापासून दूर ठेवणे ह्याचा अर्थ सर्वच पाश्चात्य विचारापासून किंवा पाश्चात्य तंत्रज्ञान किंवा पाश्चात्यांच्या प्रभावापासुन दूर ठेवणे असा त्याचा अर्थ नसुन ज्या चांगल्या गोष्टी भारतामध्ये उपलब्ध आहे. त्याचे अनुसरण करणे म्हणजे मुलांना जॅक जील अशा गोष्टी न सांगता जातक कथा, हितोपदेश अशा गोष्टी सांगणे.

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अभ्यासक्रमाची पुन:रर्चना करण्यात येत असुन भारतीय संस्कृती, परंपरा, प्राचीन तत्वज्ञान ह्याची सांगड घालण्याचा प्रयत्न केला जाईल.

### 3) रोजगाराभिमुखता :

प्रामुख्याने नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविणे हा एक उद्देश या धोरणाचा आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार शिक्षण घेणे वा आवडीनुसार विषय निवडणे, ह्याला विशेष महत्व देण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थी आतापर्यंत ज्या एक सुरी अनुसरणातुन शिक्षण घेत होते, तसे आता होणार नाही. चॉईस मोठ्या प्रमाणात असल्यामुळे विद्यार्थ्यांवर ताण येणार नाही. आंतर विद्या शाखा हा पर्याय असल्यामुळे कला शाखेचा विद्यार्थी आपल्या आवडीने एखाद्या संगीत विषयाची देखील निवड करु शकतो. त्यामुळे निवडीला या शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून मोठा वाव आहे.

यासोबतच नवीन शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्य विकासाला प्राधान्य दिले आहे. जैव शास्त्र व मानसशास्त्रीय दृष्टीने विचार करायचा झाला तर प्रत्येक व्यक्ती ही परस्परांहून भिन्न असते. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही अंगभूत क्षमता व कौशल्ये असतात. या शिक्षणपद्धतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगभूत क्षमता व कौशल्ये विकासाला चालना मिळणार आहे. उपजत कौशल्यांना चालना देत शिक्षण विद्यार्थ्यांला दिले तर त्याचा विद्यार्थ्यांना लाभ होईल. म्हणजेच प्रत्येकच विद्यार्थी भविष्यात इंजिनियर होईल असे नाही तर इंजिनियरिंगचे शिक्षण घेत असताना त्याला संगीत विषय निवडण्याचा चॉईस असेल कदाचित भविष्यात तो संगीत विषयात करीयर करु शकेल. म्हणजेच भारतीय परिप्रेक्षातून रोजगारनिर्मीती ही या शिक्षणपद्धतीतून साध्य होणार आहे.

जागतीकीकरण व जागतीक मंदीच्या या टप्प्यात रोजगार आता दुर्मीळ झाला असे म्हणायला हरकत नाही. अनेक तरुण बेरोजगार आहेत. अशा स्थितीत चांगले उद्योजक घडविणे असे प्रयत्न झाले तर निश्चितच क्रांती झाल्या शिवाय राहणार नाही.

असा एक आशावादी विचार असला तरी जागतीक उद्योजकतेच्या स्पर्धेत भारत तग धरेल काय? कारण बहुराष्ट्रीय कंपन्यांच्याच समोर छोटे व कुटीर उद्योग तग धरु शकत नाही. अशा स्थितीत भारतीय व्यवसाय व उद्योग उभे करण्यासाठीची क्षमता नवीन शैक्षणीक धोरणामध्ये असली पाहीजे, तरच भारतामध्ये उपलब्ध असलेली गंगाजळी, व संसाधने, तंत्रज्ञानाचा वापर करुन भारतामध्ये रोजगार निर्मिती होऊ शकते. व नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांकरीता कौशल्य विकास कार्यक्रम राबविल्या जाऊ शकतो.

## 4) संशोधनातील गतीशिलता-

नव्या शैक्षणिक धोरणामध्ये "संशोधनाला महत्वाचे स्थान आहे. संशोधन म्हणजे काही प्रश्नांची शास्त्रीयपद्धतीने उत्तरे शोधणे होय." संशोधनामुळे विद्यार्थ्यांची चिकीत्सावृत्ती वाढते. सोबतच संशोधनाच्या माध्यमातून समाजातले जे वेगवेगळे प्रश्न असतात. त्या प्रश्नानुषंगाने निष्कर्ष समोर येतात.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना सहज संशोधन करता येईल. या दृष्टीने एन. ई. पी. 2020 मध्ये तरतुदी केलेल्या आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार खालीलप्रकारे संशोधक विद्यार्थ्यांचा कार्यभार निश्चित करण्यात आला आहे.

पी. एच. डी. विद्यार्थ्यामागे पर्यवेक्षक संख्या

| शिक्षक पद | विद्यार्थी |
|---|---|
| सहाय्यक प्राध्यापक | 04 |
| सहयोगी प्राध्यापक | 08 |
| प्रोफेसर | 12 |

वरिल तालीका ही सगळ्याच संस्थासाठी लागु होत नाही. भारतातील प्रत्येक राज्यांनी विद्यापीठ कायदे तयार केले आहेत.

5. दूरस्थ माध्यमांद्वारे अध्ययन व अध्यापन आता माहीतीच्या माध्यमांद्वारा जवळ येत आहे. आता आपले विद्यार्थी परदेशी विद्यापीठातून देखील शिक्षण घेतात व ती आजची गरज देखील आहे. कारण कोवीड 2019 मध्ये माणस जवळ येण शक्य नव्हते, अशा स्थितीत ऑनलाईन पद्धतीने शिक्षण घेणे

गरजेचे राहीलेले आहे. सद्यस्थितीत दूरस्थ पद्धतीने अध्ययन व अध्यापनाचे अनेक डीजीटल प्लॅटफार्म उपलब्ध झालेले आहे.

नवीन शैक्षणीक धोरणामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (NETF) ने अनेक निशुल्क प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयात न जाता अनेक अभ्यासक्रम उपलब्ध होतील. खालीलप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने शिक्षण दूरवर पोहोचविण्याचा प्रयत्न होत आहे.

**ऑनलाईन पद्धतीने शिक्षण देण्याचा प्रयोग-**

NETF, CIET, IGNO ह्या संस्थाद्वारा ऑनलाईन पद्धतीने शिक्षण देण्याचा प्रयत्न होत आहे.

**डीजीटल यंत्रणा:-**

अद्ययावत ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे या दृष्टीने डीजीटल यंत्रणा तयार करण्यात येत आहे.

**विविध प्रकारचे साधने:-**

'स्वयम' दिक्षा या प्रकारचे विविध अभ्यासाच्या पद्धती व अभ्यासक्रम आयोजीत करण्यात येत आहे. त्यासाठी ऑनलाईन नोंदणी केल्यास विद्यार्थी हे छोटे छोटे पण अत्यंत उपयोगी अभ्यासक्रम करु शकतात.

**आभासी प्रयोगशाळा-**

दिक्षा, स्वयंम, स्वयंमप्रभा या माध्यमांद्वारा अशा प्रकारच्या आभासी प्रयोगशाळा तयार केल्या जात आहे. विद्यार्थी अशा प्रयोगशाळांच्या माध्यमातून अनुभूती घेऊ शकतात.

**शिक्षकांना प्रशिक्षण व प्रोत्साहन:**

ऑनलाईन अध्यापनानुषंगाने शिक्षकांना उच्च प्रतीचे अध्यापनाचे घटक तयार करण्याकरीता प्रशिक्षण व प्रोत्साहन दिले जाते.

**ऑनलाईन मूल्यमापन व परीक्षा:**

पारख, स्कूल बोर्डस, एन.टी.ए. या संस्थाच्या माध्यमातून स्वाध्याय तयार करण्याच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले जाते.

**अध्ययन अध्यापनामध्ये संमिश्र तंत्राचा वापर:**

अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रीयेमध्ये माहिती माध्यमांचा उपयोग चांगल्या प्रकारे होऊ शकतो. समोरा समोर अध्ययन अध्यापनाची प्रक्रीया जास्त परिणामकारक असु शकते. म्हणून संमिश्र स्वरुपाचा वापर करण्यावर देखील मार्गदर्शन केले जाते.

**आदिवासी मुलांना लाभ-**

विद्यापीठ अनुदान आयोगाने ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून शिकण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात येत आहे. परंतु भाषेच्या अडचणीमुळे मुलांना MOCCS वगैरे अभ्यासक्रम समजु शकत नव्हते. भारत सरकारने हा अभ्यासक्रम भारतीय भाषांमध्ये भाषांतरीत करुन विद्यार्थ्यांपर्यत पोहचविला आहे. आदिवासी समाजातील विविध घटकांपर्यंत अर्थसहाय्य देण्याचे काम शासन करीत आहे. आदिवासी मुलींना स्वामी विवेकानंद एकल बालीका संशोधनवृत्ती, आचार्य संशोधनाकरीता दिली जाते. नवीन शैक्षणिक धोरण 2020 चा उद्देश सर्व घटकातील मुलांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्याचा आहे. शिक्षण

मंत्रालयाच्या माध्यमातून समग्र शिक्षा योजनेतंर्गत अर्थसहाय्य करुन श्रीमंत गरीबी मधील दरी कमी करण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून केला जात आहे. नवीन शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत आदिवासी समुदायातील मुलांना त्यांच्या प्रगतीकरीता मदत केली जाते. व त्याकरीता स्वतंत्र यंत्रणा तयार करण्यात आली असुन माध्यमीक शाळांमधील मुलामुलींकरीता NCC चे पथक स्थापन करण्यात आलेले आहे. ज्यामुळे ही मुले-मुली भविष्यात सैनिक सेवेत असतील.

## सारांश -

नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून काय साध्य होईल यावर विचार करण्यापेक्षा त्याची सुव्यवस्थीत अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासन, समाज व शिक्षणसंस्था यांनी एकत्रीतरित्या तसा प्रयत्न करण्याची गरज आहे. प्रामुख्याने शिक्षण हे विद्यार्थी केंद्री असणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने जर प्रयत्न झाले तर निश्चितच ही शिक्षणपद्धती देखील उपयुक्त ठरु शकते.

## संदर्भ -


- University News, A weekly Journal of Higher Education Vol.60 No.7, February 14-20, 2022
- University News, A Weekly Journal of Higher Education Vol.60. No.05. 31 January - February 06.2022 https://testbook.com>Blog
- dpsgs.org/sushant -lok/blog/role-of -ict-in-national education policy.


❖❖❖

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विद्यार्थी

**प्रा. चरणदास सोळंके**
या.द.व. देशमुख कला वाणिज्य महाविद्यालय,
तिवसा, जि. अमरावती
भ्रमणध्वनी क्र. ९८९०६१५४६९

शिक्षण हे मानवी विकासाला चालना देणारे मूलमंत्र होय. राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षणाचा पाया सर्वतोपरी मजबूत करणे महत्वाचे आहे. राष्ट्राला अनेक क्षेत्रांमध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना प्रथम दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. उच्च शिक्षणातील अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन ह्या प्रक्रिया अत्यंत महत्वाच्या आहेत. गुणवत्तापूर्ण अध्ययन होण्याकरिता आवश्यक सोयी-सुविधा निर्माण करणे, त्याकरिता शैक्षणिकदृष्ट्या प्रगत असणाऱ्या देशातील शिक्षण विषयक धोरण राबविणे गरजेचे आहे. तेव्हा शिक्षण सर्व दिशांनी विकसित व उपयुक्त होण्यास खरी मदत होईल. आणि उच्च दर्जाची शैक्षणिक व्यवस्था निर्माण होण्याला विलंब लागणार नाही. याकरिता नीतिवान, बुध्दिवान, निस्वा:र्थी व चारित्र संपन्न, व्यक्तिंना उच्च शिक्षणात शिक्षकीपेशात सामाऊन घेण्याचे प्रयत्न व्हावेत. असे शिक्षकच योग्य विद्यार्थी घडवून व त्यांचे पारदर्शी मूल्यमापन करून राष्ट्रविकासाला सहकार्य करू शकतात.

भारतीय समाजाच्या उज्वल भविष्यासाठी युवकांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याकरिता केंद्र व राज्य सरकारांनी शिक्षण क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक वाढवून जीडीपी च्या ६% पर्यंत करण्याचे नमूद केले होते. परंतु आजपर्यंतच्या अर्थसंकल्पात तेवढी तरतूद केलेली नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये १०० विद्यापीठांना कॅम्पस उघडण्याची तयारी दर्शविलेली दिसते. तसेच महाविद्यालयांमध्ये बहुशाखीय शिक्षण देण्याची पूर्वतयारी सुध्दा नियोजित दिसते. सोबतच विदेशी विद्यापीठांना भरतामध्ये त्यांची महाविद्यालये सुरू करण्यासाठी परवानगी असेल. या योगाने दर्जेदार महाविद्यालये आणि विद्यापीठे बनविणे, संस्थांची पुनर्ररचना करणे. त्यांना बळकटी देणे, अशी आणि यासंबंधित प्रभावी व्यवस्थापना सोबतच नेतृत्वही तयार करण्याचा मानस आहे. या धोरणांमध्ये ४०% ऑनलाईन आणि ६०% ऑफलाईन शिक्षण देण्याचे सांगितलेले आहे. शिक्षणासोबतच ५०% विद्यार्थ्यांना व्यवसायिक शिक्षणाची सांगड घालण्याचेही धोरणात सांगितलेले आहे. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थंना ॲटॉनॉमस बॉडी तयार करण्याचे आणि त्यांना अनुदाणे देण्याचे स्पष्ट केलेले आहे.

भारतातील विद्यमान शैक्षणिक स्थितीचा विचार करता असे निदर्शनात येते की, पहिल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणापासून काही तरतुदींची आजपर्यंतही अंमलबजावणी झालेली दिसत नाही. त्यामुळे ग्रामीण, डोंगरी व दुर्गम भागातील लाखो विद्यार्थी आजही उच्च शिक्षणापासून वंचित आहेत. यापूर्वीच्या शैक्षणिक धोरणमध्ये १०+२ असे टप्पे असतांनाही उच्च शिक्षण समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचू शकलेले नाही. आतातर ५ + ३ + ३ + ४ असे टप्पे दिलेले आहेत. तेव्हा पूर्व प्राथमिक शिक्षणापासून दर्जेदार उच्च शिक्षणापर्यंतची सुविधा उपलब्ध करून देणे तारेवरची कसरत असेल. आजही प्राथमिक शिक्षणापासून गळतीचे प्रमाण सुरू झाले त उच्च शिक्षणापर्यंतही थांबलेले नाही. भविष्यात ३००० विद्यार्थी संख्येची अट

सुध्दा महाविद्यालयांच्या संख्येवर आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या शेवटच्या घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दुष्परिणाम करणारी असेल.

विदेशी विद्यापीठे येतील त्यांची महाविद्यालयेही येतील, परंतु या महाविद्यालयांमध्ये आर्थिक व सामाजिक दुर्बल, मागास विद्यार्थ्यांकरिता प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क, शिष्यवृत्या, त्याचप्रमाण इतर शैक्षणिक सवलती व सोयी -सुविधा काय असतील, त्याबाबत धोरण काय असेल ? याचा स्पष्ट उल्लेख नाही. थोडक्यात देशात देशी व विदेशी विद्यापीठीय शिक्षण दर्जेदार जरी असेल पण ते सामांन्यांच्या अवाक्यतील नसेल तर शिक्षणातील समता हे तत्व संपलेले असेल. आणि त्याच्या दुष्परिणामाला सामोरे जाण्याचे आव्हान भरतासमोर असेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, " शिक्षण ही अशी एक गोष्ट आहे, जी प्रत्येकाच्या अवाक्यात आली पाहिजे, म्हणून उच्च शिक्षण हे खालच्या स्तरातील घटकाला शक्य तितके स्वस्त करून देण्याचे धोरण असले पाहिजे. या सर्व समुदायांना समानतेच्या पातळीवर आणायचे असेल तर समानतेचे तत्व अंगिकारणे आणि खालच्या स्तरावर असलेल्यांना अनुकूल संधी देणे, हाच उपाय आहे." द्रष्ट्या बाबासाहेबांच्या विचारानुसार आजही उच्च शिक्षणातील समान संधी सर्वांपर्यंत पोहोचलेली नाही. याउलट उच्च शिक्षण हे खालच्या स्तरापर्यंत यापुढे हे पोहोचेल की नाही हे खात्रीने सांगता येणार नाही. आणि अनेक अडथड्यांमुळे उच्च व दर्जेदार शिक्षण धनदांड्यांच्या मुलांपुरतेच मर्यादित असेल, अशी दाट शक्यता वाटते.

ऑनलाईन शिक्षण हे दुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या मागासवर्गीय, आदिवासी विद्यार्थ्यांकरिता खूप त्रासाचे होऊ शकते. कारण दुर्गम, डोंगराळ भागांमध्ये रेंजची समस्या असते, गरीब विद्यार्थ्यांकडे ॲन्ड्रॉइड मोबाईल नसतात, कधी परिवारामध्ये एकाच मोबाईलवर अनेकांना मधातच कॉल येतात, कधी बॅलेंस टाकण्याच्या समस्या असतात, अशा अनेक समस्यांमुळे ऑनलाईन शिक्षणामध्ये अनेक समस्या निर्माण होऊन शैक्षणिक नुकसान होईल. आणि शिक्षणापासून वंचित राहावे लागेल. ३००० संख्या नसणारे महाविद्यालय दुसऱ्या महाविद्यालयात समाविष्ट केल्याने, ३००० विद्यार्थी संख्येचे महाविद्यालय बऱ्याच लांब अंतरावर असतील, तेव्हा दूरवर ये-जा करणाऱ्या ग्रामीण, दुर्गम व डोंगराळ भागामधील विद्यार्थ्यांना, विशेषत: मुलींना अनेक कारणांमुळे शिक्षण थांबवावे लागेल. आणि या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा सामान्यांना फायदा होणार नाही. उलट शैक्षणिक विषमतेची दरी आणखी खोलावर जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

उच्च शिक्षणामध्ये आजही लाखो विद्यार्थी शिष्यवृत्यांना मुकले आहेत, तासिकांना मुकले आहेत, कारण महाविद्यालयांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचारी, प्राध्यापक यांच्या पदभरत्या नाहीत. अनेक पदे रिक्त आहेत. दुससरीकडे लाखो विद्यार्थी पात्र असे शिक्षण-प्रशिक्षण, व्यवसायिक शिक्षण घेऊनही घरी बसलेले आहेत. स्पर्धा परीक्षा पास होऊन अनेक कारणांमुळे नियुक्त्या नाहीत. हे शिक्षण विभागाप्रमाणेच इतर विभागामध्येही हजारो-लाखो पदे रिक्त आहेत. नोकर भरती नाही, त्यामुळे उच्च शिक्षण घेऊन लाखो युवक-युवतींचे पैशाचे व वेळेचे मोठे नुकसान झाल्याने त्यांच्यामध्ये नैराश्य निर्माण झालेले आहे.

भविष्यात स्वयंअर्थशासीत, संस्था, विदेशी विद्यापिठे, ३००० विद्यार्थी संख्येचे महाविद्यालय, इतर वेगवेगळी खाजगी विद्यापीठे, विद्यापीठ अनुदान आयोगाऐवजी शिक्षण मंत्रालय, ५०% व्यवसायिक

शिक्षण, ५ + ३ + ३ + ४ अशा टप्प्यांवरचे शिक्षण आणि इतर अनेक बदल यशस्वी करण्याचे प्रयत्न होत असतांना भारत शैक्षणिकदृष्ट्या समानतेच्या पातळीवर यशस्वी होऊ शकणार नाही, असे वाटते.

इस्त्रोचे माजी प्रमुख के कस्तुरीनंदन यांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण इतर धोरणांप्रमाणे पूर्णपणे यशस्वी होणे शक्य नसेल.  याचा प्रत्यय भविष्यात येणार आहे.

देशामध्ये आदिवासी विभाग, समाज कल्याण विभाग, शिक्षणाच्या नावावर कोट्यावधींचा निधी खर्च करतात, तर काही ठिकाणी दाखवतात, त्यामुळे आदिवासीसह-दलित, मागासवर्गीय विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू शकलेले नाहीत. आणि म्हणून आदिवासी तर त्यांच्या आरक्षित जागांवर नोकरी करण्यास पोहोचू शकत नाहीत.  राज्यघटनेतील ५ व्या अनुसूचितील परिशिष्ट ५ (१) नुसार अधिसूचना काढूनही अनेक संवर्गातील पदे स्थानिक अनुसूचित जमातींमधून भरण्याचे राज्यपालांकडून निर्णय होतात. परंतु प्रत्यक्षात विलंबानेही अंमलबजावणी होत नाही.  परिणामी आदिवासी विद्यार्थ्यांची प्राथमिक शाळेपासूनच गळती सुरू होते. तर ते उच्च शिक्षणापर्यंत कसे पोहचनार हा मोठा प्रश्न आहे. आणि म्हणून आदिवासी विद्यार्थी उच्च पदावर पोहोचू शकत नाहीत. आणि मग त्यांच्या या आरक्षणाचा गैरफायदा, गैर आदिवासी जामतीचे खोटे प्रमाणपत्र प्राप्त करून नोकऱ्या चोरतात. आणि आदिवासी विकास होण्याऐवजी भकास होताहे.

महाराष्ट्रात बार्टी संस्थेतही पूर्वीप्रमाणे तत्परता व सर्वजाती समावेशकतेचा अभाव दिसतो. बार्टीच्या धर्तीवर महाज्याती संस्थेची स्थापना झाली. पण जिल्हावार शिक्षण केंद्रांचाच अभाव असल्याने इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण-प्रशिक्षण पूर्ण करता येत नाही.  शिक्षण-प्रशिक्षणांच्या बाबतीत ढिम्म कारभार दिसतो. उच्च शिक्षित विद्यार्थ्यांकरिता असणाऱ्या शिष्यवृत्या, योजना कागदावर दिसतात, पण अंमलबजावणी अल्पशी व तेही कासवगतीने असते. नाईलाजास्तव अनेक पदव्या, घेतलेले दरिद्री युवक-युवती शिक्षण क्षेत्रात अल्पश्या मानधनावर, तासिका तत्वावर नोकरी करतात.  तर धनदांडग्यांचे मोठ्या देणग्या देऊन छोट्या मोठ्या पदावर सहज नियुक्त्या मिळवून घेतात.  थोडक्यात पैशावाल्यांचे शिक्षण आणि पैशावाल्यांनाच खाजगी संस्थांमध्ये नोकऱ्या असे चित्र दिसत आहे.

देशामध्ये शिक्षण क्षेत्रात जे जे अपेक्षित बदल करायचे असतील तर त्याकरिता विद्यार्थी, पालक, संघटना, समाज यांनी जागृत व्हायला पाहिजे, आणि आवश्यक तेथे आमूलाग्र बदल घडवून आणण्याकरिता आग्रह-सत्याग्रह करणे अपेक्षित आहे, आणि शैक्षणिक धोरणामध्ये जनहितार्थ सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक, शैक्षणिक संस्था, पदाधिकारी व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी, एकत्र येऊन व अपेक्षित बदलासाठी आग्रह धरणे अपेक्षित आहे.

**संदर्भ :-**

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

२) दैनिक लोकमत पान नं. ०६, दि. १६/०१/२०२३

३) दैनिक लोकसत्ता पान नं. ०४, दि. २१/०१/२०२३

४) दैनिक लोकसत्ता पान नं. ०७, दि. २५/०१/२०२३

५) ग्रामगीता पृ.क्र. १७२ ते १७९

❖❖❖

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (NEP- 2020) डिजिटल मीडियाची भूमिका आणि महत्व

**प्रा. राजेंद्र पुंडलिक पवार**

**समाजशात्र विभाग,**

**वेणूताई चव्हाण कॉलेज, विद्यानगर, कराड**

**जिल्हा - सातारा, महाराष्ट्र ४१५१२४**

Email id - rajendrapawar03523@gmail.com Mobile No. 8668425221

## गोषवारा

भारत सरकारने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 लागू करण्याचा निर्णय घेतलाआणि त्याअंतर्गत सरकारने शैक्षणिक धोरणात अनेक मोठे बदल केले आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मुख्य उद्देश आहे. शिक्षणात डिजिटल माध्यमाचा वापर आधुनिक युगात वेगाने वाढत आहे. व्हर्च्युअल एज्युकेशन सुरू झाल्यामुळे ऑनलाइन क्लासरूममध्ये नवीन डिजिटल प्लॅटफॉर्मचा अधिक समावेश करण्याची गरज निर्माण झाली आहे. वर्ल्ड वाइड वेबच्या आविष्काराने शिक्षण व्यवस्थापन प्रणालीचा विकास केला. 1990 च्या दशकाच्या उत्तरार्धात, इंटरनेट हे संशोधनाचे एक साधन बनले, आणि एक विशाल ग्रंथालय संसाधन म्हणून वापरले गेले.शिक्षणात डिजिटल माध्यमाचा वापर आधुनिक युगात वेगाने वाढत आहे. व्हर्च्युअल एज्युकेशन सुरू झाल्यामुळे ऑनलाइन क्लासरूममध्ये नवीन डिजिटल प्लॅटफॉर्मचा अधिक समावेश करण्याची गरज निर्माण झाली आहे. वर्ल्ड वाइड वेबच्या आविष्काराने शिक्षण व्यवस्थापन प्रणालीचा विकास केला. 1990 च्या दशकाच्या उत्तरार्धात, इंटरनेट हे संशोधनाचे एक साधन ICT ची बनले, आणि एक विशाल ग्रंथालय संसाधन म्हणून वापरले गेले. 21 व्या शतकातील सर्वात महत्त्वाचे धोरण म्हणजे नवीन शैक्षणिक धोरण (NEP) ज्याचा मसुदा 2019 मध्ये तयार करण्यात आला (सुधारित) आणि 29 जुलै 2020 रोजी भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे क्रांतिकारी आणि प्रत्येक बाबतीत दूरगामी आहे. हा पेपर शिक्षकांना मदत करण्यासाठी, विशेषत: भारतासारख्या बहुभाषिक देशात भाषिक अडथळे दूर करण्यासाठी, डिजिटल लायब्ररी निर्माण करण्यासाठी आणि शिक्षक-प्रशिक्षणासाठी तंत्रज्ञानावर आधारित व्यासपीठ उपलब्ध करण्यासाठी माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाची आवश्यकता आणि महत्त्व अधोरेखीत करते. या पेपरमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात डिजिटल मीडियाची भूमिका आणि महत्त्वावर प्रकाश टाकला आहे.

बीजशब्द

डिजिटल मीडिया, शैक्षणिक धोरण, माहिती आणि संप्रेषण, इंटरनेट, वर्ल्ड वाइड वेब, व्हर्च्युअल एज्युकेशन.

